# गच्चीवरील गप्पा


नारायण गोविंद चापेकर

‘ बर्कचें चरित्र ’, ‘ पैसा ’ व ‘ निवडक लेख ’ या पुस्तकांचे कर्ते

बदलापुर ( ठाणें )

विजयादशमी शके १८४८

पुस्तकें मागविण्याचा पत्ताः—आर्यसंस्कृति छापखाना,
६ शुक्रवार पेठ, पुणें.



घर नंबर ६ शुक्रवार, पुणें, येथें आर्यसंस्कृति छापखान्यांत
वासुदेव गोपाळ परांजपे यांनीं छापिलें व बदलापुर येथें
नारायण गोविंद चापेकर यांनीं प्रसिद्ध केलें.

किंमत १ रुपाया प्रति १०००

१४४७०
७५ग

# विषयानुक्रमणिका.


| | |
|---|---|
| उद्घाटन ... ... ... ... ... ... ... | ५–१२ |
| प्रास्ताविक ... ... ... ... ... ... ... | १–४ |
| विवाहपद्धति ... ... ... ... ... ... | ५–१९ |
| १ प्रेम कीं भक्ति? ... ... ... ... ... | ५ |
| २ पढतमूर्खांचे आचार ... ... ... ... | ९ |
| ३ संस्कार कीं सोहळा ... ... ... ... | १३ |
| ४ गृहप्रवेशनीय होम अपरिहार्य नाहीं ... ... | १७ |
| स्त्रियांचें पुंसीकरण ... ... ... ... ... | २०–२२ |
| कुटुंबसंस्था मरेल कां तरेल ? ... ... ... ... | २३–२७ |
| न स्त्री स्वातंत्र्यमर्हति ... ... ... ... ... | २८–३१ |
| गृहिणी गृहमुच्यते ... ... ... ... ... | ३२–३४ |
| हक्क कीं कर्तव्य ? ... ... ... ... ... | ३५–३८ |
| स्त्रियांचें शिक्षण ... ... ... ... ... ... | ३९–४२ |
| विवाहसुख ... ... ... ... ... ... ... | ४३–४७ |
| शारीरिक ऱ्हास ... ... ... ... ... ... | ४८–५३ |
| आर्थिक स्पर्धा ... ... ... ... ... ... | ५४–५९ |
| सन १९४५ ची स्त्री ... ... ... ... ... | ६०–६२ |
| प्रेतापुढें विस्तवाचें मडकें कशासाठीं? ... ... ... | ६३–६७ |
| एकत्र कुटुंबाचे दिवस भरले ... ... ... ... | ६८–७२ |
| वाटपांच्या दाव्याकरतां स्वतंत्र कोर्टें पाहिजेत ... ... | ७३–७७ |
| उथळें युग ... ... ... ... ... ... | ७८–८२ |
| सडका समाज ... ... ... ... ... ... | ८३–८७ |
| शिवाशीव ... ... ... ... ... ... ... | ८८–९१ |
| गणमैत्री आणि राक्षसांचा महादेव ... ... ... | ९२--१०० |

श्री. सौ. गं. पं, वाचनालय
दाखल नं ......
भोर

# उद्घाटन.

बोलूनचालून गप्पाच त्या. गप्पा म्हटल्या म्हणजे त्या जशा साधार असूं शकतात तशा अनाधारहि नसतात असें नाहीं. तथापि विनबुडाच्या गप्पांनीं उद्बोधन तर राहिलेंच पण मनोरंजनहि होईल कीं नाहीं ह्याची वानवाच आहे. प्रस्तुत छोटेखानी पुस्तकांतील गप्पा ह्या कोणत्या सदरांत घालावयाच्या ह्याचा ज्यानें त्यानें आपल्या अनुभवाशीं मेळ घालून ठरविलें पाहिजे. अनुभव हा सत्याचा जनक आहे, पण सध्यांच्या काळांत अनुभवाची धडगत दिसत नाहीं. सर्व जग शब्दांच्या तरांड्यांत बसून हेलकावे खात आहे. शब्दावरचा पापुद्रा फोडून आंतल्याची छाननी करण्यास कोणास फुरसत नाहीं. शिक्षणप्रसारानें प्रत्येकाला विचार करतां यावा ही उत्कंठा; पण ती तृप्त कशी व्हावी ? स्वयंविचारास सवड पाहिजे; पण ती कोठून आणावयाची ? सगळ्या गोष्टी करतां येतात; पण प्रत्येकाच्या पोटाची सोय कोणाला करतां येत नाहीं. उलट हल्लींच्या संस्कृतीनें असें झालें आहे कीं ज्याला पोटाची विवंचना नाहीं असा प्राणी विरळा. त्यामुळें विचाराच्या, विवेकाच्या, बाबतींत सर्वत्र सामान्यजनांत परोपजीवित्व दृग्गोचर होतें. आचारांप्रमाणें विचारांनाहि शिष्टत्व प्राप्त होतें. निरनिराळ्या काळीं निरनिराळे विचार, मतें, शिष्टत्व पावतात. शिष्टांचे विचार झिटकारून स्वयंविचार प्रस्थापित करूं लागल्यास अशिष्टांत गणला जाण्याची प्रत्येकास भीति वाटते. अशा रीतीनें वारंवार शिष्टांच्या अपक्क विचारांचें लोण समाजाच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोकापर्यंत नेलें जातें. हल्लींच्या काळांत स्त्री स्वतंत्रपणें वागण्यास पात्र आहे असा डांगोरा पिटलाच पाहिजे, प्रजासत्ताक राज्यपद्धतिच इरसाल ह्या म्हणण्याला नाक मुरडतां कामा नये. बहुसंख्याकांच्या ऐवजीं अल्पसंख्याकांच्याच हक्कांची बडेजाव ठेवली पाहिजे; कर्मासक्त अज्ञ जनांचा बुद्धिभेद करणें हितावह आहे असें मत प्रदर्शित केलेंच पाहिजे. रूढीच्या गुलामगिरीचा नायनाट केलाच पाहिजे, मग स्वातंत्र्य फैलावून नवीन तऱ्हेची गुलामगिरी

अस्तित्वांत आली तरी हरकत नाहीं. हा मंत्रोच्चार प्रत्येकानें केलाच पाहिजे. अशा अनेक गोष्टी आहेत. ह्या शिष्ट समजुतींच्या विरुद्ध ब्र काढील त्याच्याकरतां वेड्यांच्या गृहाचें द्वार तावडतोब उघडलें जाईल. सारांश आपणांस सध्यां स्वातंत्र्य आहे असें वाटतें तो नुसता भ्रम आहे. जें नाणें प्रचारांत असतें तें जसें आपण वापरतों तसेंच विचारांचें आहे. संभावितांचीं मतें आपण ग्रहण करून त्यांवर आपला वाङ्मय व्यवहार यथास्थित चालवतों. ही झाली विचार न करणारांची स्थिति; विचार करणारांना हें विचारचलन अभिमत नसलें तरी त्याचा स्वीकार करावा लागतोच. नाहीं तर सर्व व्यवहारच बंद होतो. स्त्रियांना कौंसिलमध्यें बसण्याचा अधिकार द्यावा असा ठराव मांडणाराला विरोध करून गांवढळपणाचें प्रदर्शन करण्यास कोण धजावणार? विद्याहीन माणसांना कारकुनाच्या नोकऱ्या देण्याचे ठराव एकमतानें पास नाहीं का होत? स्वातंत्र्याच्या वावदूकत्वाचे हे दिवस आहेत. पण बहुतेक प्राणी बऱ्याच बाबतींत परतंत्र आहेत असाच विचारांतीं सिद्धांत बनतो. आपलें स्वरूप आपल्या ताब्यांत नाहीं, आपला जन्म आपल्या आटोक्याच्या बाहेर. मग स्वतंत्र अशी एक तरी बाब आहे काय? आपण जो पोषाख करतो तो तरी आपण आपल्या निवडीनें करतो काय? आपले पूर्वज, आपलें जातगोत, आपले शेजारी, ह्यांनीं जी तऱ्हा घालून दिली तीच आपण अनुसरीत नाहीं काय? आपल्या आईबापांचीच भाषा आपण उचलतोंना? प्रत्येकाला आपल्या धर्माचा अभिमान असतो तें स्वतंत्र विचाराचें फल म्हणणें शक्य आहे काय? उपजतांच जो धर्म आपणांस आढळला त्यालाच आपण चिकटून राहतो. एवंच आचार, विचार, धर्म, भाषा, पोषाख इत्यादि किती तरी गोष्टींत पारतंत्र्याच्या महाशिलेखालीं आपण दडपलों आहों. विचारवंत युरोपिअन डोक्यावर आपली साहेबी टोपी टाकून ब्राह्मणी पागोटें कां घालीत नाहीं? मारवाड्याचें पागोटें पारशाच्या

मस्तकावर जाऊन कां बसत नाहीं. ? एकाद्या मुसलमानानें गुजरी उष्णीष मस्तकावर धारण कां करूं नये? सुधारलेल्या विद्वान मुसलमानानें प्रेत पुरण्याऐवजीं जाळलें असें कधीं घडलें आहे काय? पुरुषांनीं बायकांचीं लुगडी अथवा झगे ह्यांनीं आपणांस लपेटून घेतलें तर? पण नाहीं. तात्पर्य, मनुष्य बहुंशीं परतंत्रच आहे. पारतंत्र्याच्या वर्तुळांत राहून त्याला स्वातंत्र्य मिळेल तेवढेंच. असें असून स्त्रीजातीच्या परावलंबित्वाबद्दल सध्यां नक्राश्रु ढाळले जात आहेत. व स्त्रीपुरुषांचा समानदर्जा शिष्टसंमत होऊं लागला आहे. ह्या व दुसऱ्या अनेक कारणांनीं समाजांत सारखी खळबळ उडून राहिली आहे.

लहान समाज मोठ्या समाजांत विलीन झाला पाहिजे हा निसर्गनियम आहे. दोन भिन्न संस्कृतीचे समाज शेजारीं सलोख्यानें, सुखानें, नांदावयास पाहिजे असतील तर लहान समाजानें मोठ्या समाजाशीं एकरूप शक्य तेथपर्यंत झाल्याविना गत्यंतर नाहीं. आजपर्यंत लहान समाज असेंच करीत आले. लिंगायत, जैन वगैरे समाज हिंदूंत बहुतेक मिसळून गेले होते. अष्टागरांतील ज्यू लोक पाहाना. ते हिंदु नाहींत हें सांगितल्याशिवाय समजणार नाहीं. भाषा, पोषाख, आचार ह्यांनीं ते हळूहळू हिंदुच बनले. मुसलमानांसंबंधी सुद्धां कांहीं निराळा प्रकार नव्हता. मुसलमानांचें स्वराज्य साम्राज्य असल्यामुळें त्यांच्यामध्यें स्वकीयत्वाचें प्रमाण अधिक राहिलें हें खरें, पण तें पोषाखापुरतेंच होतें, भाषा, आचार, कायदा हें सर्व शेजारच्या हिंदूंचें. दक्षिण हिंदुस्थानांत तरी ही स्थिति आजपर्यंत होती. ह्या वृत्तीमुळें निरनिराळे समाज आनंदानें नांदले. हिंदूंच्या चालीरीति स्वीकारण्याबद्दल हिंद्वितरांवर कोणी जुलूमजबरदस्ती केली नाहीं. हीं स्थित्यंतरें निसर्गनियमाला अनुसरून होत होतीं. पुष्कळ मुसलमान पूर्वीं हिंदूच होते, म्हणून हिंदूंच्या कित्येक विशिष्ट चाली त्यांनीं अद्यापि सोडल्या नाहींत. उदाहरणार्थ, कित्येक

मुसलमान कुटुंबांत पुनर्विवाह रूढ नाहीं. तसेंच अफगाणिस्थानांत जे हिंदू आहेत त्यांच्यांत हिंदुत्वाचा अंश किती असणार ? मुसलमानांच्या धर्तीवर त्यांची चालचर्या जाणें स्वाभाविक आहे. पण हल्लीं पहावें तों समाजशास्त्राच्या नियमांविरुद्ध तत्वज्ञान उपदेशण्यांत येत आहे. अल्पसंख्याकांचे हक्क, आणि बहुसंख्याकांचें काय तर जबाबदारी, हा उरफाटा न्याय कोणत्या गांवचा ? अल्पसंख्याक समाजासंबंधानें बहु-संख्याक समाजावर जबाबदारी आहे खरी; पण ती नैतिक स्वरूपाची होय. अनेक धर्मांचे लोक हिंदुस्थानांत येऊन राहिल्यामुळें त्यांच्या हक्कांचा पुरःस्कार करणें म्हणजे देशांत नेहमीं कलहाग्नि पेटवून ठेवण्यासारखें आहे. पण हें भ्रामक, अचरट, तत्वज्ञान समाजांत शिष्टपणानें वावरत आहे. ह्याच्याविरुद्ध तोंड उघडण्याची छाती कोणाची आहे ? विपरीत मतांचा धुमाकूळ सध्यां आमच्याकडे माजला आहे. कोणत्याहि विचाराला स्थैर्य अथवा निर्विकल्पता नाहीं. पूर्वीच्या अनुभवाची लोकांना किंमत वाटत नाहीं. जणूं काय पुसलेली पाटीच आपल्या समोर असून आपण आतां नवीन सृष्टि बनवीत आहों ! आमची संकृति फार प्राचीन आहे म्हणणें पाश्चात्यांना न रुचणें स्वाभाविक आहे. पण आम्हींसुद्धां तीच समजूत उराशीं घट्ट धरून चालतों ही मोठ्या नवलाची गोष्ट आहे. आम्हीं परंपरेला आजपर्यंत महत्त्व देत आलों त्याचें कारण तींत संग्रहित असलेला हजारों वर्षांचा अनुभव हें होय. अनुभव म्हणजे प्रत्यक्ष ज्ञान. त्यापुढें कल्पनेच्या तात्त्विक भराऱ्या कवडीमोल होत. पण नवीन विटी, नवीन दांडू, ह्याचीच हौस. फार शहाणपणाच्या घमेंडीचे हे सर्व चार आहेत. नवीन, स्वतंत्र, विचारांना आळा घालण्याचें पातक कोण करील ? जुन्या विचारांना तुच्छपणानें लाथाडूं नका इतकाच आग्रह प्रतिपक्षाला धरतां येईल.

ह्याप्रमाणें आमच्या गप्पांच्या झोंताचें स्वरूप होतें. बेजबाबदारपणानें मारलेल्या गप्पांची भाषाहि बेजबादार असणार हें उघड आहे. आमच्या

## उद्घाटन.

गप्पा चालत असत तेव्हां त्या ठशाच्या कोंदणांत बसतील अशी कोणाची अटकल नव्हती. त्यावेळीं कोणी लघुलेखक नव्हता अथवा वर्तमानपत्रांचे रिपोर्टरहि नव्हते. पण आम्हां गप्पा मारणारांशिवाय दिवस दो दिवस राहून जाणारे पाहुणे असत, त्यापैकीं एकाच्या आग्रहावरून हें पांढऱ्यावर काळें करण्यांत आलें आहे. ह्यांपैकीं बऱ्याच गप्पा 'लोकमान्य' वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाल्या होत्या. पुढें तें दैनिक बंद पडल्यावर 'विस्तार', 'मनोरंजन', इत्यादि मासिकांतून अवशिष्ट गप्पा प्रसिद्ध झाल्या. व त्या सर्व आतां एकत्र करून पुस्तकरूपानें पुनः बाहेर पडत आहेत. विषयाची संगति, भाषेची ठाकठिकी, रचनेचें चातुर्य, प्रमाणांची मांडणी हे गुण गप्पांमध्यें आढळणें शशशृंगाइतकेंच अशक्य होय. ' अर्थरि तात्पर्य ' हा न्यायच येथें वाचकांनीं लागू करावा. त्यांत आणखी प्रकाशकाच्या स्वतःच्या प्रमादांची भर पडून साजांत अधिकच उणेंपणा राहणार हें उघड आहे.

ह्या पुस्तकांत प्रदर्शित झालेलीं कांहीं मतें परंपरप्रियता दर्शवितात. एकंदरींत हें गप्पामंडळ अर्वाचीन संस्कृतीच्या मूलभूत सिद्धांतांची पूजा करणारें नाहीं हें खास. एकदां कराराविषयक स्वातंत्र्य ह्यावर गप्पा चालल्या होत्या. पुष्कळ चर्चा झाली. आणि अखेरीस असें ठरलें कीं अडाणी, अशिक्षित, गरजू, अर्धपोटी, उडाऊ, चैनी, चंगीभंगी, परावलंबी, ह्यांना वाटेल तो करार करण्याची मोकळीक देणें म्हणजे त्यांचा सर्वस्वी घात करणें होय. भारतकालाच्या पूर्वीपासून व्याजाचा दर एक रुपाया दरमहा दरशेकडा रूढीनें कायम झाला होता. आतांहि रूढीची गुलामगिरी नाहींशी झाली खरी, पण स्वातंत्र्याची गुलामगिरी तत्स्थानारूढ झाली, ह्याची वाट काय ? करारस्वातंत्र्यानें धूर्त सावकारांचें मात्र फावलें. वाटेल त्या मुदलाचा, वाटेल त्या व्याजाचा करार करून घेणें मोठेंसें अवघड नाहीं. ह्यापायीं पुष्कळ लोक भिकेस लागले. पण थोडे लोक धनाढ्य आणि बहुतेक उपासमार काढीत असलेले, हीच फलश्रुति आधुनिक

संस्कृतीची आहे. हें स्वातंत्र्य लबाडांना फायदेशीर झालें आहे. आणि अखेरीस हें स्वातंत्र्य छाटण्याचे प्रयत्न करणें भाग पडलें हें आपण पहातोंच. राजकीय बाबतींत स्वातंत्र्य देण्यास लायकी लागते. मग बाकीच्या गोष्टींत मात्र पूर्ण मुभा कां असावी ? आणि इतर बाबतींत जर मुभा, तर राजकीय बाबतींत कां नसावी ? असो, एकंदरींत नूतनसंस्कृति जनतेला पूर्वीपेक्षां अधिक सुखी करण्यास समर्थ झाली नाहीं असा ह्या गप्पांचा रोख आहे. आमचा विद्यमान समाज सुबुद्ध अथवा विवेकी नाहीं असें वैवाहिक व और्ध्वदेहिक कर्मांची छाननी करतांना आढळून आलें. तसेंच तो नीतिदृष्ट्या सडका झाला आहे असें व्यवहाराकडे न्याहाळून पाहिलें तर अनुमान करावें लागतें. वैयक्तिक शुद्धाचरणावरून नीतिमत्तेचें सर्टिफिकीट हल्लीं कोणाला मिळणार नाहीं. ते दिवस गेले. सार्वजनिक कृत्यांत जो नीतिमार्गानें चालतो तोच नीतिमान. एकादा मनुष्य दारु पीत असेल अथवा क्वचित् वेश्यागमन करीत असेल, पण तो जर सार्वजनिक कार्यांत अथवा दुसऱ्याशीं संबंध आला असतां निस्पृहपणानें वागेल तर त्याच्या योग्यतेंत फारसा कमीपणा येणार नाहीं. उलट, वैय्यक्तिक नीतिमत्तेंत भरपूर गुण मिळत असूनहि कुलाला फसविणारा, अनाथ अबलांचे केसानें गळे कापणारा, धाकट्या भावांशीं प्रतारणा करणारा, सार्वजनिक फंड गिळंकृत करणारा, असा असेल तर त्याला कोणीहि नीतिमान म्हणणार नाहीं. दुसऱ्याशीं संबंध आला असतां आपण कसे वागतों इकडे इतःपर लोकांचें लक्ष्य लागेल. एकांडी माणसाच्या वागणुकीची चौकशी करण्यास कोणाला वेळ आहे ? व करून उपयोग तरी काय ? म्हणून नीतीच्या कल्पना ह्या पुढें साफ बदलणार. मिनिस्टर झाल्यावर तो आपल्या पगारादाखल मिळणाऱ्या पैशाच्या थैलीकडे पाहतो किंवा जनहिताकडे पाहतो ह्याचा विचार करून लोक नीतिमत्ता ठरवितील. पुढारी म्हणविणारे लोक आपला बडेजाव राखण्याकरतां देशभर भटकतात अगर देशाच्या

कळकळीनें प्रवासाची दगदग सोसतात हीच त्यांच्या नीतिअनीतीची कसोटी होय. निस्पृह, निरभिमानी, शहाणे, कुशल असे पुढारी हिंदुस्थानाला एकाच वेळीं एकाहून अधिक आजपर्यंत मिळाले नाहींत, ह्यावरूनच आमच्या समाजाची अवनति ताडतां येईल. हा नैतिक अधःपात दारिद्र्याचें फळ होय. पण सभोंवार घनघोर दारिद्र्य असतां उधळेपणाचें व्यसन आम्हाला जडलें आहे असा अभिप्राय ह्या गप्पांमध्यें प्रदर्शित केला आहे. मुलांना आम्ही लहानपणापासून चैनीचें बाळकडू पाजतो हा सर्वस्वी आमचा दोष आहे. कॉलेजच्या वसतिगृहांत राहून मुलें खुशालचंद, गाफिल, नादान, मूढ बनतात. ह्याचें सर्व पाप कालेजच्या देवतांकडे आहे. मुलांवर देखरेख नाहीं. अभ्यास करणाऱ्या मुलाला स्कॉलरशिप ठेवण्यापेक्षां मुलांना शिस्त लावणाऱ्या रेक्टरला स्कॉलरशिप कोणी उदारधीनें ठेवली तर त्याचे देशावर फार उपकार होतील. पूर्वीची समजूत अशी कीं, लहानपणीं कष्ट सोसले म्हणजे मध्यमवयांत कोणतेंहि काम करण्यास मनुष्य पात्र होतो. पण हल्लीं सर्व पाहावें तो उरफाटें. लहानपणापासून मातबरीचें वळण ज्यांना लागलें त्यांच्याकडून पराक्रम पुढें काय होणार हें दिसतेंच आहे. प्रत्यक्ष श्रीकृष्ण विद्यार्जनार्थ गुरूच्या घरीं गरीबी स्थितींत राहिले ह्याचें महत्व आमच्या लोकांना वाटत नाहीं. हल्लींची पिढी कर्तृत्वहीन होणें हें त्यांच्या कॉलेजमधील राहणीचें फल होय. पूर्वीच्या पिढींतला करारीपणा, उद्योगशीलता, काटकपणा, इत्यादि गुण चालू पिढींत फारसे आढळत नाहींत, ह्या दुर्गुणांचें खापर कॉलेजच्या अधिकाऱ्यांच्या माथीं फोडण्यांत कांहीं दोष लागणार नाहीं. ब्राह्मणांच्या मुलांना चैनीच्या सवयी लागल्यानें ब्राह्मणसमाजाचा ऱ्हास होत आहे. ब्राह्मणांनीं इतःपर कॉलेजशिक्षण घेऊं नये आणि वसतिगृहांत तर राहूंच नये. शिक्षणानें कांहीं मोक्ष मिळत नाहीं. नोकरी मिळावयाची तीहि आतां बंद झाली. मग ह्या कारकुनी शिक्षणाचा उपयोग काय ? पैशाचा

विनाकारण चुराडा होत आहे. विद्वत्ता नाहीं, शील नाहीं, वळण नाहीं, पैसा नाहीं. मग ह्या कॉलेजशिक्षणाकरितां आम्ही कां हपापतों ? इतक्या दिवस नोकऱ्या मिळत होत्या म्हणून इतके दिवस निभावलें. शिवाय लहानपणापासून आईबापांपासून दूर राहिल्यानें मुलांच्या मनांत मातापितरांविषयीं आपभाव राहात नाहीं. कुटुंबामध्यें तीं परक्यासारखीं होतात. ममता नष्ट होतें. आपलेपणा रहात नाहीं. मग कुटुंबाचीं शकलें पडलीं तर त्यांत आश्चर्य तें काय ? एवढ्यावरच भागत नाहीं. कुलधर्म, कुलाचार, वर्णाश्रमाचार, ह्यांच्यापासून त्यांची फारकत होते. हिंदुसंस्कृतीला तीं पारखीं होतात. हिंदुत्वाचा अंकुरच करपून जातो. शिवाय खेड्यामध्यें जो खरा देश तो त्यांना अपरिचित होतो. त्यामुळें देशाची खरीखुरी स्थिति त्यांस समजत नाहीं. हें अज्ञान पुढें मोठेपणीं सार्वजनिक कार्याच्या आड येतें. सारांश कॉलेजांतील वसतिगृहें आमच्या मुलांना सर्वतोपरी नालायक बनवितात. आणि मुलांना नालायक करण्यास आम्ही अजागळ बाप हजारों रुपये खर्च करतों. हिंदुस्थानांत इंग्लिश लोक नुसते आले इतकेंच नाहीं तर त्यांनीं हिंदुस्थानांत इंग्लंडच आणलें आहे. सारांश, शिक्षण म्हणजे बिनमोबदल्याची बेताल रहाणी; बेताल राहणी म्हणजे विलायती मालाचा खप; आणि विलायती मालाचा खप म्हणजे अधिक दारिद्र्य; अशी ही सारणी आहे. हिंदुसमाजानें बाष्कळ अनुकरण करण्याचें सोडून आपलें घर एकदां तपासून पाहण्याचा काल आला आहे, असा आमच्या गप्पाकारांच्या गप्पांचा आशय दिसतो. पुष्कळांची असले विचार ग्रहण करण्याची अद्यापि तयारी नाहीं. त्यांना ग्रहांच्या वक्रगतीप्रमाणेंच ह्यांत प्रदर्शित केलेल्या विचारांची गति वाटेल. अकालीं "सत्यवाक्यमपि नोच्चरणीयम्". खरें. पण इतकीच विनंति करावयाची कीं विचार करा, मनन करा आणि मग "येनेष्टं तेन गम्यताम्".

---




# प्रास्ताविक.

उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळें कोर्ट कचेऱ्या बंद. तेव्हां ह्या सुटीचा फायदा घेऊन आपल्या शरीराला तशीच मनाला विश्रांति मिळावी म्हणून कोर्टाप्रमाणेंच घरेंहि सोडून मंडळी परठिकाणीं आपल्या स्नेह्या-सोबत्यांकडे जाऊन कांहीं दिवस राहण्याचा परिपाठ पडत चालला आहे तो सर्वथैव इष्टच आहे. त्यांत मी गांवढ्यांत राहणारा असल्यामुळें माझ्या स्नेह्यांनीं माझ्या निमंत्रणाला मान्यता देण्यांत तत्परता दाखविणें स्वाभाविकच आहे. गांवढ्यांत हवा स्वच्छ व शुद्ध जागेची विपुलता आणि शिष्टाचाराच्या बहाण्यानें समाजांत मिरवणारे उमरावी आचार ह्यांचें लोढणें झुगारून देण्यास अनुकूल परिस्थिति, ह्या कारणांनीं वर्तमानपत्रांत

येनकेन प्रकारेण वा यत्रकुत्र नांव आणण्याची ओढाळ हौस ज्यांना नाहीं, अशा सुशील पण बिनडौली शिक्षितांच्या मनाची धांव गांवढ्याकडे असणें स्वाभाविक आहे. त्यामुळें माझ्या दोन विचारशील व भूरिश्रुत मित्रांचा सहवास मला महिनाभर घडला ह्याचा आनंद वाटतो. एक दिलाचीं माणसें एकत्र आलीं म्हणजे आनंदलहरींबरोबरच चर्चालहरीहि उसळ्या मारूं लागतात. तिसऱ्या प्रहरीं चार वाजतां चहाच्या पेल्यांचा चित्ताकर्षक पण प्रकृतिविध्वंसक नाद कानावर पडतांच आम्हीं दररोज दिवाणखान्यांतून उठून गच्चीवर वैठक मारीत असूं. उन्हाळ्यांत अमित्र बनलेल्या मित्राचा ताप निवारण करण्यास आच्छादित गच्ची समर्थ असल्यामुळें पंख तोडलेल्या पक्ष्याप्रमाणें सूर्याची केविलवाणी स्थिति पाहून, मानवी कर्तबगारीच्या अभिमानानें क्षणभर चहाचेंहि आम्हांस विस्मरण होई. मृत राष्ट्राला साजेशी पश्चिमाभिमुखच आमची बसणी असल्यामुळें एवढा प्रखरौजस रवि पण तो आमच्यापाशीं चहाची याचना करीत आहे असा भास होई. डोकावूं पाहणाऱ्या पडत्या काळांत बिचारा दुसऱ्या कशाची अपेक्षा करणार ? असो, आमचा चहा म्हणजे साधें काम नव्हतें. तो आमचे दोन मिनिटांच्याऐवजीं दोन तास घेई. 'मूकं करोति वाचालं' असा आमच्या गच्चीमध्यें पराक्रम होता. अपरिमित, अप्रतिम व ओतप्रोत सभोंवार भरलेलें सृष्टिसौंदर्य, सरित्संपर्कानें आर्द्र व प्रसन्न झालेला मंदगति वायु, वाहनादिकांचा कल्लोल व असंख्य लोकसमूहाचा गलबला ह्यांच्या योगानें शहरांत कदापि अनुभवास न येणारा निवांतपणा हीं वाक्स्फूर्त्युत्पादक नाहींत असें कोण म्हणेल? नियमानें दररोज दोन तास आमचे गप्पांत जात. वेळ कसा गेला ह्याचें आह्मांस भानहि नसे. कोरडवाहु जिभांना चहाचें वंगण मधून मधून मिळालें म्हणजे झालें; मग वाक्प्रवाहाला कांहीं कमतरता नाहीं. आमच्या घरापासून थोड्याशा अंतरावर नदी होती. पण उन्हाळ्यांतील त्या कृशतनूला आमच्या

# प्रास्ताविक.

अलोट वाक्प्रवाहाकडे पाहून मत्सरच उत्पन्न होत असला पाहिजे. आमचा चर्चाप्रदेश अमर्याद. कोणत्याहि विषयाची वगळ नसे. शिवाय चारचौघांत जाहीरपणें बोलावयाचें म्हणजे आपणांस वाटतें तें न बोलणें व वाटत नाहीं तें बोलणें हा समाजमान्य नियम अगर शिष्टाचाराचा धिंगाणा ह्यांच्या पायीं आमच्या मतांची कुचंबणा होण्याचें कांहींच कारण नसल्यामुळें, आमची जिव्हा मनोनिष्ठ राहिली ह्यांत कांहीं विशेष नसलें, तरी अशा वाणीची योग्यता फार आहे हें सांगावयास नको. लोकांना रुचेल असेंच बोलणारी वाणी आणि "वितथैश्चित्ततोषणम्" हें आहे ब्रीद जिचें, अशी बाजारबसवी ह्यांमध्यें मोठ्या कायदेपंडितालाहि भेद दाखवितां येणार नाहीं. मनोनिष्ठ वाणीची तुलना पतिनिष्ठ कुलांगनेशींच करतां येणें शक्य आहे. बरें, ही वाणी नुसती दांभिक नव्हती इतकाच तिच्यांत गुण होता असें नाहीं, तर ती अर्थवतीहि असण्याचा संभव आहे. कारण खेड्यांतील शांत वातावरण गंभीर विचारांची जननीच होय. अलौकिक बुद्धिमत्तेचा उदय शहरांत क्वचितच झाला आहे असें समाजशास्त्रवेत्ते म्हणतात तें कांहीं अगदींच मिथ्या नव्हे. जगांतील सर्व धर्मांची प्रेरणा रानावनांत व डोंगरांतच झाली नाहीं काय? ह्याहीपेक्षां चमत्कार म्हणजे सर्व धर्मसंस्थापक निर्जन प्रदेशांतील विद्या-अदूषित अशीं साधीं-भोळींच माणसें नव्हतीं काय? मोठमोठे शोध गांवढ्यांत लागले, अगर शहरांत राहून लागले? तात्पर्य गांवढ्याकडे क्षुद्र दृष्टि करून कधींहि चालावयाचें नाहीं. गांवढ्यांत धीरोदात्त विचारांना मोल नसलें, तरी अशा विचारांची पैदास तेथेंच होते खास. पण हा नियमच आहे. शेतकरी गांवढ्यांत धान्य पिकवतो; पण त्याचें मोल होण्यास तें शहरांतच न्यावें लागतें. सर जगदीश बोस ह्यांना आपल्या शोधांचें गांठोडें सोडावयास विलायतेस जावें लागतें. येथें सोडूं पाहतील तर 'गांवढ्यापुढें वाचली गीता आणि कालचा गोंधळ बरा होता' असा प्रसंग त्यांच्यावर ओढावयाचा. असो. सांगाव-

# गच्चीवरील गप्पा.

याचा हेतु इतकाच कीं, गांवढ्यासारख्या ठिकाणीं सद्विचारांचें स्फुरण होणें संभवनीय असल्यामुळें, आमच्या गप्पा म्हणजे अगदींच गटार-गप्पांच्या तोडीच्या नव्हत्या. वैशाखमास म्हणजे वधूवरांना विवाहपाशांनीं बद्ध करणारा मास, जगाचें सातत्य राखण्याचे प्रयत्न ज्या महिन्यांत होतात तो हा महिना, तेव्हां आमच्या गप्पांचा पहिलाच विषय आमची विवाहपद्धति हा होणें स्वाभाविक होतें.

# विवाहपद्धति.

## १ प्रेम कीं भक्ति ?

श्री. सो. ग्रं. पं, ... नं ...... भोर

स्त्री व पुरुष हा भेद परमेश्वरानें हेतुपुरःसर निर्माण केला आहे ह्यांत संशय नाहीं. सृष्टीमध्यें खंड पडूं नये म्हणूनच ही योजना केलेली दिसते. इष्टसंततीचेंच बीज गर्भनिविष्ट करूं शकूं असें म्हणणाऱ्या खंडपंडितांची ही केवळ बढाई नसती व त्यांत तथ्याचा अल्पांश तरी असता, तर खडतर असा मुक्तिमार्ग आक्रमण्याचें कधीं प्रयोजनच पडलें नसतें. इष्टसंतानक्लृप्ति जर यशस्वी ठरेल, तर शंकराचार्यादि वादविवाद्यांना आपआपल्या पोथ्या गुंडाळून ठेवाव्या लागतील. अल्पकालांत सर्व जग निर्मानुष होईल. मग शास्त्रीय शोधांचा निदिध्यास, राजकीय सुधारणांचा धिंगाणा, सामाजिक सुधारकांची आतुरता ह्यांची जरूरी काय ? परमेश्वरा-विरुद्ध बंड उभारणाऱ्या ह्या कल्पकांची कीर्ति दिगंत होईल. कारण परमेश्वर ह्या कामांत चारी मुंडे चीत झाला अशीच कोणीहि ग्वाही देईल. परंतु सध्यां तरी हीं सुखस्वप्नें पडण्याचीं लक्षणें कितीहि न्याहाळलें तरी दिसत नाहींत. तेव्हां आहे हीच स्थिति चिरकाल राहील हें धरून चालणें भाग आहे आणि म्हणून लिंगभेद करण्यांत प्रजोत्पादन हाच हेतु प्रामुख्यानें ईश्वराच्या मनांत होता, ही गोष्ट संदेहातीत दिसते. ह्यानंतर “ प्रजोत्पादनाय तुभ्यमहं संप्रददे ” हा आमच्या विवाहकर्मांतील संकल्प अप्रयोजक, अनुचित व अवास्तव असें कुत्सितपणें प्रतिपादन करण्याचें कोण साहस करील ? गुणवान, नीतिमान, प्रभाववान आणि वीर्य-

11 JAN 1994
11 JAN 1994

वान अशी संतति निर्माण व्हावी अशी इच्छा असेल, आणि तशी इच्छा असलीच पाहिजे, तर विवाहित स्त्रीपुरुष एकजीव, समरस व समोद्दिष्ट असणें अपरिहार्य नाहीं काय? "अर्धांगी"ची पौराणिक कल्पना हेंच ध्येय सूचित करतें; पण हे मनांतील मांडे खाऊन कोण सुखी होणार? परमेश्वराचा उद्देश सफल होण्यास परमेश्वरानें मनुष्यास कोणतेंहि साधन उपलब्ध करून ठेवलें नाहीं ह्याबद्दल परमेश्वरास दूषणें देण्यास जीभ लांब झाली, तर त्यास कांहीं अगदींच वावगें म्हणतां येणार नाहीं. अनुरूप स्त्रीपुरुषांची सांगड कशी घालतां येईल ह्याचा विचार करून अखेरीस मोठमोठ्या ज्ञान्यांनींहि हात टेकले. मनुष्याचें ह्या कामांत कांहींहि चालूं द्यावयाचें नाहीं असा परमेश्वरानें जणूं काय चंग बांधला आहे असें वाटतें. एवढेंच नव्हे तर विसदृश, अननुरूप किंवा भिन्न रुचीचीं अशींच जोडपीं बनावींत असें परमेश्वराचें अकटोविकट प्रयत्न चालूं असावेत असा भास होतो. निदान हें दैवी गूढ उकलण्यास मानवी बुद्धि असमर्थ आहे खचित.

प्रेमाच्या चुनेगच्ची पायावर विवाहवास्तु उभारली म्हणजे तो संबंध सुखावह होईल व ग्रंथि अभेद्य राहील ही पाश्चात्यांची कल्पना किती फोल आहे हें हरघडीस होणाऱ्या असंख्य घटस्फोटांवरून सिद्ध झालें आहे. पाश्चात्यांचें आंधळें अनुकरण करून आम्हीहि आतां प्रेम म्हणून टाहो फोडूं लागलों आहों. पण ह्यामध्यें आपण आपली नुसती फसवणूक करून घेत आहों. मातेचें आपल्या मुलावर मात्र उपजत, सहज, अहेतुक व उत्कट असें प्रेम असतें. मूल कितीहि कुरूप असो, मुलगी असो वा मुलगा असो, इष्ट असो वा अनिष्ट असो, त्या शेंबड्या, रोगी, पाप्याचें पितर बनलेल्या मुलाचें त्याची माता प्रेमाचें भरतें येऊन जेव्हां चुंबन घेते, एकनिष्ठतेनें जेव्हां त्या अनाथ तान्ह्याला स्तनपान देते व रात्रीचा दिवस करून त्याची शुश्रूषा करते, त्या वेळेस मात्र खऱ्या स्वर्गीय प्रेमा-

चा अनुभव येतो. ह्याव्यतिरिक्त प्रेम ही वस्तु कोठेंहि अस्तित्वांत असलेली आढळणार नाहीं. ह्या नाटकी व फोल प्रेमाचा वावर नाटक कादंबऱ्यांत ठीक आहे. व्यवहारांत उपरिनिर्दिष्ट अपवाद खेरीज करून प्रेमाला कोठेंहि ठाव नाहीं. आपण ज्याला प्रेम समजतों, तें वस्तुतः प्रेम नसून ती केवळ कामासक्ति, विषयलोलुपता होय. खरें प्रेम अव्यभिचारी असतें. मग प्रेमावगुंठित युग्माचीं शकलें कशीं होतात? तसेंच प्रेम हें निरक्षेप आहे. मातेचें प्रेम अर्भकाच्या प्रेमावर अवलंबून नसतें व प्रेमभाव त्या अर्भकांत जागृतहि झालेला नसतो. पण विवाहांत पुरुषाचें स्त्रीवर आणि स्त्रीचें पुरुषावर असें उभयविध प्रेम असेल, तरच तो प्रेमप्रेरित विवाह म्हणतां येईल. पण ही गोष्ट शक्य तरी आहे काय? प्रेम हें सहज असतें, किंवा आगंतुक असतें? सहज असणें शक्यच नाहीं. मूल जन्मल्यावरोबर मातेच्या स्तनांत ज्याप्रमाणें दुधाचा प्रादुर्भाव होतो त्याप्रमाणें तिच्या मनांत मुलाविषयीं प्रेमोद्भव होतो. असा प्रकार वैवाहिक प्रेमाच्या संबंधानें घडणें संभवत नाहीं. पंगु बालकाला आईच्या निरपेक्ष प्रेमाची ज्याप्रमाणें जरुरी आहे, त्याप्रमाणें स्त्रीपुरुषांची पदरगांठ बांधण्यास नाहीं. ह्या कार्याकरितां परमेश्वरानें कामदेवाला मुद्दाम सृष्टीच्या आधीं निर्माण केला. त्याच्याकडून तें कार्य नीट होत असतां प्रेमाची योजना करण्याचें परमेश्वरास प्रयोजन काय? तात्पर्य प्रेम हा विवाहाचा पाया ठरत नाहीं. स्त्रीपुरुषांचें परस्पर प्रेम त्यांच्या जन्मावरोबरच जर विधात्यानें उत्पन्न केलें असेल, तर प्रत्येक स्त्रीपुरुषानें सर्व जगभर आपलें प्रेमपात्र हुडकून काढण्यांत हिंडलें म्हणजे झालें. ब्रह्मदेवानें योजलेल्या वधूवरांची दृष्टादृष्ट होतांच दोघांच्या अंतःकरणाला प्रेमाची पालवी फुटून, आपणच तीं, अशी ओळख पटून एकमेकांनीं एकमेकांच्या गळ्यांत माळ घातली म्हणजे झालें. पण असें स्वयंभू प्रेम जर असतें, तर कोर्टिंगची आवश्यकता कोठें होती? म्हणून आमच्या विवाहांत प्रेमाला अवसर

नाहीं हें युक्तच आहे. प्रेम कीं भक्ति ह्या प्रश्नाला भक्ति हेंच उत्तर आमच्या इकडील विद्वानांनीं ठरवून ठेवलें आहे. सीतेचें रामावर प्रेम नव्हतें. तिची आपल्या पतीच्या ठिकाणीं एकनिष्ठ भक्ति होती. तेव्हां आमच्या तरुणांनीं प्रेम ह्या पोकळ शब्दाला भुलून कुकल्पनांचें वारें आपल्या मनांत शिरूं देऊं नये. वस्तुतः पाहतां परमेश्वराचें आपल्या भक्तावरील प्रेम, मातेचें तनुजप्रेम आणि रमणरमणीप्रेम ह्यांमध्यें मूलतः भेद आहे. हे तीन मनोभाव प्रदर्शित करण्यास भाषेमध्यें निरनिराळे शब्द असूं नयेत ही चमत्कारिक, तशीच दुःखाची गोष्ट होय. पतिपत्नीभावाचें पावित्र्य सुरतशास्त्रांतील प्रेम शब्दानें डागाळणें चांगलें नाहीं. 'स प्रेमा भेदरहितं यूनोर्यद्भावबंधनम्' ही कामशास्त्राची प्रेम ह्याची व्याख्या 'कुट्टनीमतम्' नामक ग्रंथांत दिली आहे. ह्या व्याख्येप्रमाणें प्रेम हें तारुण्यावरच तरतें. पण पतिपत्नीसंबंध तारुण्यव्यतिरिक्त अवस्थेंतहि कायम असतो. तसेंच ह्या रतिप्रेमांत अभेदबुद्धि असते; पण भक्ति भेदभाव सुचविते. देवासमान पति मानल्यावर भक्तिशब्दानें पतिपत्नीचें नातें शब्दित करणें उचित होय. नवविधा भक्तींत आत्मनिवेदन ही अखेरची भक्ति सांगितली आहे, व "भक्त म्हणजे विभक्त नव्हे" असें रामदासस्वामींनींहि म्हटलें आहे, ही गोष्ट खरी. तथापि ज्ञान्यांच्या अद्वैतासिद्धांताहून भक्तियोग कमी योग्यतेचा नाहीं. हें सिद्ध करण्याच्या लालसेनेंच ही नववी भक्ति पूर्वींच्या आठांत सामील झाली. यौवनजन्य प्रेमाचा यौवनाबरोबर ऱ्हास झाला म्हणजे प्रत्येक नवरा-बायकोनें काडी मोडून दूर व्हावें कीं काय?

---

## २ पढतमूर्खांचे आचार.

तारुण्योल्लसित प्रेम हें बाह्योपाधींवर अवलंबून असल्यामुळें कोणत्या उपाधींनीं वधूवरांच्या प्रेमाचा अगर सात्त्विक आसक्तीचा परिपोष होईल हें जाणण्याची शक्ति अजाण व अल्लड तरुणांपेक्षां त्यांच्या अनुभवी, प्रौढ, प्रजाहितदक्ष व विवेकी मातापितरांनाच अधिक असली पाहिजे. ह्या दृष्टीनें विचार करतां मुलानें आपली वधू पसंत करण्यांत पाश्चात्यांचें खुळचट अनुकरण आमच्याकडून जें करण्यांत येतें तें आमच्या विवेकहीनतेचें निदर्शक होय. धर्म, अर्थ आणि काम हे तीन पुरुषार्थ विवाहानें साधावयाचे असतात. नुसत्या विषयोपभोगाकरितां विवाहसंस्था अस्तित्वांत आली नाहीं. कामसंतर्पण हाच जर लग्न करण्याचा ऐकांतिक हेतु असता तर त्याला विवाहसंस्थेची आवश्यकता मुळींच नव्हती. कामाकडे भूतमात्रांची स्वयमेव प्रवृत्ति असते. पण ह्या पाशवीवृत्तीला नियंत्रित करणें, सन्मार्गाला लावणें आणि ती सात्विक सुखप्रसू होईल असें करणें हाच विवाहाचा उच्चतर हेतु होय. हा हेतु सफल करतां येईल अशी तयारी विद्यार्थ्यांची मनानें, शिक्षणानें आणि अनुभवानें झालेली नसते. त्यामुळें मुलांनीं मुलगी पाहण्याची चाल विशेष समंजसपणाची आहे असें म्हणतां यावयाचें नाहीं. बाकीच्या गोष्टी तर राहोत, पण मुलांना सात्त्विक व सहज सौंदर्य म्हणजे काय ह्याची जाणीवहि नसते. चट्टीपट्टी करून दिखाऊ पोषाखांत आणि आकर्षक स्वरूपांत सिनेमांतल्या पडद्यावरील चित्राप्रमाणें क्षणभर दृष्टीसमोर येऊन जाणारी मुलगी चतुर्भुज होण्यास आतुर झालेल्या मुलावर दुसरा कोणता परिणाम करणार?

मुलांनीं मुलगी पाहणें म्हणजे पाप होय असें कांहीं कोणी म्हणत नाहीं. पूर्वीच्या काळीं सुद्धां वधूनिरीक्षणविधि करण्याची आवश्यकता भासली, तर आधुनिक कालीं ती अधिकच तीव्रतेनें भासणार. एकादा द्रव्यलोभी बाप आपल्या सुलक्षणी मुलाच्या गळ्यांत एकादी घोरपड बांधणार नाहीं कशावरून ? पण हें अपवाद होत. असले प्रकार कितीहि निंद्य असले तरी निदान विस्मयावह नाहींत. परंतु स्वातंत्र्याचें, सुविचारांचें आगर म्हणून गर्जत असलेल्या ख्रिस्ती राष्ट्रांत प्रत्यक्ष तरुणतरुणी आपण होऊन आपल्या गळ्यांत केवळ पैशाकरितां घोरपडी बांधून घेतात हे प्रकार मात्र विशेष आश्चर्यकारक खरे; असो. मुलगी पाहणें म्हणजे सामान्यतः तिचें स्वरूप पाहणेंच होय. तिच्या गुणांचें मापन करण्यास सध्यां तरी कोणतेंहि साधन उपलब्ध नाहीं. व त्यामुळेंच विवाह म्हणजे जुगार अशी यथार्थ समजूत होत चालली आहे. रूपाप्रमाणें कन्येचें शील व बुद्धि पहाण्याविषयीं शास्त्रकारांचा आग्रह आहे, पण “ दुर्विज्ञेयानि लक्षणानि ” असे निराशाद्योतक उद्गार त्यांनींच काढले आहेत. आमच्या गप्पांमध्यें असंख्य उपाय सुचविले गेले, पण अखेरीस सूत्रकारांबरोबर आम्हांलाहि हात टेकावे लागले. विवाहानंतर “ गृहिणी सचिवः सखी मिथः प्रियशिष्या ललिते कलाविधौ ” असें पुरुषाला आपल्या सहचरीसंबंधानें म्हणतां यावें, त्याचप्रमाणें पिता सोडून पति वरल्यावर ‘ अहो वृत्तमहो रूपमहो धनमहो कुलं ’ असे इलेप्रमाणें नवपरिणत वधूच्या मुखांतून हर्षोद्गार निघावे अशी अपेक्षा प्रत्येकजण करणार. पण ह्या सुखाच्या शोधाचा हव्यास सोडून देऊन आमचा वाक्प्रवाह विवाहांगभूत व्यावहारिक आचारांकडे वळला.

आमच्या लग्नांतील सध्यां शिष्ट मानल्या जाणाऱ्या चालींवरून अभिमानशून्यतेचें व बेअकलीपणाचें बिनचूक माप करतां येतें. मंगल कार्यामध्यें ताशा बेणबाजांसारख्या रणवाद्यांचा उपयोग करून आपणच

आपल्या हातानें आपल्या तोंडाला अपशकुनाचें काजळ फांसून घेतों. पण शिवाय हीं वाद्यें लावून आम्हीं पूर्वी मुसलमानांचे गुलाम होतों, सध्यां इंग्रजांचें गुलाम आहों असें आढ्यतापूर्वक वाजतगाजत निर्लज्जपणानें जगजाहीर करतों असें होत नाहीं काय ? पण इतका विचार कोणी करावा ? कोण ही अभिमानलुप्तता ? आतां आमचें स्त्रीदाक्षिण्य पहा. मुलाच्या बापानें मुलीस पाहण्यास बोलाविलें नाहीं तर मग मुलाचा बाप बनण्यांत अर्थ काय ? आगगाडीच्या खेंचाखेंचीत, रात्रीचें जागरण करून आज येथें तर उद्यां शंभर मैलांवर असा प्रवास उपवर झालेल्या मुलींना करावा लागला म्हणून त्याची थोडीच खंत मुलाच्या बापाला वाटणार ! स्त्रीदाक्षिण्य हा विषय घेऊन अघळपघळ व्याख्यान देण्यास पुनः तयारीच. पूर्वींचे "अशिक्षित" लोक मुलीला आपलें घर सोडावयास लावणें हें अकुलीनतेचें लक्षण समजत. पण सध्यांच्या "शिक्षितां"च्या कुलीनताविषयक कल्पनाहि विकल्प पावल्या आहेत. विवाह मुलीकरितां आहे. मुलाला त्याची आवश्यकता बिलकूल नाहीं अशा समजुतीवर आम्ही सध्यांच्या चालींची उभारणी केली आहे. हुंड्याचीच गोष्ट घ्या, मुलाच्या बापानें असा कोणता पराक्रम केला असतो कीं, मुलीच्या बापाकडून त्यास पैसे उकळण्याचा हक्क उत्पन्न व्हावा ? हुंडा घेण्याचा मोह कोणासहि सुटत नाहीं. ही एकच गोष्ट आमच्या शिक्षणाचें वैय्यर्थ्य सिद्ध करण्यास पुरेशी आहे. हुंडा घेतला नाहीं तर पाप घडत नाहीं, अधर्म होत नाहीं, कोणी वाळीत टाकीत नाहीं. असें असून सुद्धां ज्यांना हा पेंढारीपणा करण्यांत भूषण वाटतें त्यांनीं आपआपले डिप्लोमा समुद्रांत एकदांचे बुडवून तरी टाकावेत. हुंड्याच्या विरुद्ध ठराव करणाऱ्या सामाजिक सभांचें किती सभासद ठरावाची अंमलबजावणी करणारे आढळतील ? "दोष ठेवी पुढिलासी । तेचि स्वयें आपणांपासी ॥ ऐसें कळेना जयासी । तो एक पढतमूर्ख ॥" असें पढतमूर्ख दरवर्षी शेंकड्यांनीं बनविण्याचा कारखाना विश्वविद्यालयानें

घातला आहे यांत संशय नाहीं. लग्न म्हणजे काय ह्याची कल्पनाहि आमच्या सुशिक्षितांना नाहीं. विवाह म्हणजे कन्यादान जो करतो त्याच्याचकडे मुख्यतः सर्व कृत्य असें असून वराचा बाप वधूकडील मंडळीस आपल्या गांवीं खेंचून आणून लग्न लावण्यास भाग पाडतो हें किती आश्चर्य? एखाद्यानें आपलें घर दान करण्यास निघावें, पण दान घेणारानें आग्रह धरावा कीं, ' मी तुझ्या घरीं येणार नाहीं. माझ्या घरीं येऊनच तूं माझ्या हातावर उदक सोड '. असें उद्दामपणाचें उत्तर देणाऱ्या प्रतिग्रह घेणाऱ्या ब्राह्मणाहून मुलाचा सुशिक्षित बाप अधिक सालस ठरेल काय?

---

## ३ संस्कार कीं सोहळा.

सोहाळ्यांचें जळमट चिकार पसरल्यामुळें आंत गुरफटलेला धार्मिक संस्कार कोणालाच दिसेनासा झाला आहे. विवाह हा संस्कार आहे हें ज्ञान असणारा जाडा विद्वान् मानला जातो अशी स्थिति येऊन ठेपली आहे. मिरवणुकी व मेजवान्या याच्या दंगलींत बिचाऱ्या अग्नीची वास्तपुस्त कोण करणार? "विचित्राः खलु वासनाः". धर्मप्रवणतेची जागा सुखलोलुपतेनें पटकावली म्हणजे दुःखांत पर्यवसान होणार हें ठरलेलेंच. म्हणून अनावश्यक आचारांना फांटा देऊन धर्मविधि पाळण्याचा प्रयत्न केला तर त्रिवर्गसाधनाचें यश संपादितां येतें. विवाह म्हणजे काय ह्याचा उद्बोध झाला म्हणजे आवश्यक व आनुषंगिक विधि यांची विभागणी करणें फारसें अवघड नाहीं. वाग्दान, कन्यादान आणि होम हीं विवाहाचीं मुख्य अंगें होत. पण त्यांतहि आणखी विचार केला तर असें दिसून येईल कीं, कन्यादानपूर्वक होम म्हणजेच विवाह. इतर कृत्यांप्रमाणें वाग्दान हेंहि विवाहांगभूत आहे. निदान संकल्प तरी तसा सोडतात. पण एका दृष्टीनें पाहिलें असतां वाग्दान हें विवाहविधीपासून अलग, स्वतंत्र असें आहे. आणि म्हणूनच आश्वलायन गृह्यसूत्रांत वाग्दानाचा समावेश केलेला नाहीं. 'वाग्निश्चय झाल्यावांचून विवाहच संभवत नाहीं.' हें नारदस्मृतींतलें वचन यथार्थ आहे, (स्त्रीपुंसयोस्तु संबन्धे वरणं प्राग्विधीयते। वरणाद् ग्रहणं पाणेः संस्कारो हि द्विलक्षणः ॥). तथापि वाग्दान हा कांहीं संस्कार नाहीं हें निश्चित. हल्लीं सोडमुंज मुंजीबरोबरच उरकून घेण्याचा प्रघात पडला आहे, अशा स्थितींत

तर वाग्निश्चयविधि केला नाहीं तरी कोणताहि प्रत्यवाय नाहीं. ह्या विधीमध्यें वेदमंत्र म्हणावयाचे नसतात ह्यामुळें तो कृताकृत आहे असेंच सिद्ध होतें. घटकेनें पुढें प्रत्यक्ष विवाहच होणार तर मग वाग्निश्चय विधिपूर्वक करण्यांत स्वारस्य तें काय ? परिशिष्टांत हा विधि सांगितला असल्यामुळेंहि त्याचें गौणत्व अनुमित होतें.

वाग्दानाला फांटा दिला म्हणजे कन्यादान आणि विवाहहोम ह्या दोन गोष्टी राहतात. कन्यादान झालें तरी भार्यात्व प्राप्त होण्याला सप्तपदींत विवाह होण्याची आवश्यकता असते. तेव्हां कन्यादान आणि विवाहहोम म्हणजेच लग्न होय. हीं यथासांग, अवधानपूर्वक आणि सुमुहूर्तावर करण्याची दक्षता घ्यावी. परस्परनिरीक्षण ह्यालाच सध्यां आपण लग्न म्हणून समजतों. त्यामुळें वधूवरांनीं परस्परांच्या गळ्यांत माळ घातली म्हणजे कार्यसिद्धि झाली, गंगेंत घोडे न्हाले, असें वाटून पुढच्या मुख्य गोष्टीकडे साहजिक दुर्लक्ष केलें जातें. हें प्रयोगकारांचें "परस्परनिरीक्षण" सूत्रग्रथित नाहीं. मोठेसें अन्वर्थकहि नाहीं. व त्यांतच लग्नाचें सर्व सार आहे अशी भ्रामक समजूत दृढ होऊन बसल्यामुळें हा विधि अजिबात गाळून टाकावा हेंच युक्त होय. सूत्रकारांनीं सांगितल्याप्रमाणें " अलंकृत्य कन्यामुदकपूर्वां दद्यात् " असें म्हणून एकदम कन्यादानालाच आरंभ करावा. ब्राह्मविवाहानें आपलीं लग्नें होतात. ह्या विवाहाचें वैशिष्ट्य म्हणजे अलंकारयुक्त कन्येचें उदकपूर्व दान करणें. " अद्भिरेव द्विजाग्र्याणां कन्यादानं विशिष्यते " असें मनुवचन आहे. सध्यां उदकपूर्व कन्यादान होतें. पण सालंकार कन्यादान होत नाहीं. तेव्हां ह्याला ब्राह्मविवाह कसें म्हणतां येईल ? मासा दोन मास सोनें अगर रुपें अंगावर कन्यादानाच्या वेळीं ठेवल्यानें अलंकृत कन्येचें दान म्हणतां येणार नाहीं. ही नुसती फसवणूक आहे. आतां हुंड्याच्या नांवाखालीं पैसे उकळणारे पशुसम वरपिते जोंपर्यंत समाजांत आहेत तोंपर्यंत हा फसवाफसवीचा प्रकार

वधूच्या पित्याकडून होत असलेला क्षम्यच गणला पाहिजे. पण ज्यांना विवेकपूर्व कर्म करण्याची इच्छा असेल त्यांनीं तरी नवीन पायंडा पाडावा. म्हणजे मुलाच्या बापानें हुंडा घेऊं नये व मुलीच्या बापानें आपल्या ऐपतीप्रमाणें सालंकृत कन्यादान करावें. ह्यांत धर्माची हानि न होतां वरपित्याचा स्वार्थहि बुडत नाहीं. पण तनुविक्रय करणाऱ्या वेश्यांना भाड्यानें जागा देणाऱ्या घरवाल्यांची चतुराई व दक्षता दाखवणाऱ्या वरपित्यांना ह्या धर्माच्या सात्विक गोष्टी सांगून कोणता फायदा होणार? तान्प्रति नैष यत्नः.

कन्यादानानंतर कन्या भार्यापदारूढ होण्याकरितां विवाहहोम विहित आहे. शिवाय अग्नि सिद्ध करणें हें गृहस्थाश्रम्याचें आद्य कर्तव्यहि आहे. विवाहहोमांत पाणिग्रहण आणि सप्तपदी हे दोन विधि फार महत्वाचे आहेत. "गृभ्णामि ते सौभगत्वाय हस्तं" असें म्हणून वर वधूचें पाणिग्रहण करतो. सप्तपदीपर्यंत तर विवाहग्रंथि अभेद्य होतच नाहीं. सप्तपदीनंतर वधूचें जन्मांतर पूर्ण झालें असें शास्त्र आहे. " स्वगोत्राद् भ्रश्यते नारी विवाहात् सप्तमे पदे " अशी यमस्मृति आहे. आपल्याबरोबर सात पावलें चालणारा आपला मित्र होतो ही कल्पना फार प्राचीन आहे. अथर्ववेदांत वरुण आणि अथर्वन् ह्यांच्या संभाषणांत मी तुझा सप्तपदसखा आहे असें एकानें दुसऱ्याला म्हटलें आहे. " देहि नु मे यन्मे अदत्तो आसि युज्यो मे सप्तपदः सखासि । " अर्थः—मला दिलें नाहींसें तें दे. सात पावलें बरोबर चालल्यामुळें तूं माझा योग्य मित्र झाला आहेस. " ददामि तत् यत् ते अदत्तो अस्मि युज्यस्ते सप्तपदः सखास्मि " अर्थः—मी न दिलेलें तुला देतों. मी तुझा योग्य असा सात पावलें चाललेले सखा आहे. (५–११–९–१०). ह्याप्रमाणें सप्तपदीनंतर विवाहग्रंथि कायमची बांधली जाते. करतां कन्यादानापासून सप्तपदीपर्यंत सर्व विधि लक्ष्यपूर्वक व श्रद्धायुक्त अंतःकरणानें करण्यांत यावेत. सध्यां हें कृत्य



17 MAR

म्हणजे लग्नाचा नीरस अवशेष मानण्यांत येतो. परस्परनिरीक्षणाला अनुचित प्राधान्य प्राप्त झालें आहे. परंतु परस्परनिरीक्षणविधींत वधूवर विवाहाची पहिली पायरीहि चढत नाहींत. म्हणून कन्यादानापासूनच ज्यांना सुरवात करावयाची असेल त्यांनीं " तुभ्यं विप्र मया दत्ता पुत्रपौत्रप्रवर्धिनी " हे शब्द उच्चारतांच लग्न लागलें म्हणून समजावें व त्या वेळेसच मंगलवाद्यांच्या घोषांत सुमुहूर्तावर वधूवरांनीं एकमेकांच्या गळ्यांत पुष्पहार—लग्नाच्या बिड्या—घालाव्या व नंतर पानसुपारी वाटण्यांत यावी. कन्यादानानंतर विवाहहोमाला वधूपित्याची गरज नसते तेव्हां तो आगतांचा सत्कार करण्यास मोकळाहि होतो.

कन्यादान आणि विवाहहोम ह्यांत मोठा भेद आहे. कन्यादान हें वधूच्या पित्याचें कर्म असतें. ह्या पुण्याचा धनी तो. पण कोणी आपली कन्या दुसऱ्याला दिली म्हणजे तेवढ्यावरून ती त्याची भार्या कशी होणार? भार्यात्वाचा संस्कार तिच्यावर झालाच पाहिजे. कन्यालाभावांचून भार्यात्वसिद्धि नाहीं. पण कन्यादान होऊन एकदां कन्या प्राप्त झाली म्हणजे तिच्या ठिकाणीं भार्यात्व सिद्ध करणें हें एकट्या वराचें काम आहे. कन्यादान करून विवाहहोम केला नाहीं तर तसेंच कन्यादानाशिवाय नुसतां विवाहहोम केला तर तें कायदेशीर लग्न होणार नाहीं. कन्याविषयक दानप्रतिग्रहानें विवाहाची पूर्तता होणार नाहीं. 'प्रतिगृहीतायामस्यां वध्वां भार्यात्वसिद्धये गृह्याग्निसिद्धये च विवाहहोमं करिष्ये' हा संकल्प फार महत्त्वाचा आहे. एकादी स्त्री कायदेशीर रीतीनें आपल्या ताब्यांत आली म्हणजे ती आपली भार्या झाली असें होत नाहीं. तात्पर्य कन्यावरण, कन्यादान आणि भार्याकरण अशा ह्या विवाहांतील तीन पायऱ्या आहेत. कन्यावरण मुलाचा बाप करितो. कन्यादान मुलीचा बाप करतो व भार्याकरण स्वतः नवरा करतो.

---

## ४ गृहप्रवेशनीय होम अपरिहार्य नाहीं.

विवाहहोमानंतर गृहप्रवेशनीय होम हें फार महत्त्वाचें कृत्य आहे. 'गृह्याग्नि सिद्ध करण्याकरतां मी विवाहहोम करतों' असा संकल्प केल्यावर गृहप्रवेशनीय होम अवश्य केलाच पाहिजे. कारण विवाहाग्नीवरच तो होम करावयाचा असून त्याच्याशिवाय गृह्यत्वासिद्धि होत नाहीं. परंतु गृहप्रवेशनीय होम हा वरघरीं करावयाचा असून सांप्रत वधूच्या घरींच केला जातो हें आमच्या विचारशून्यतेचें द्योतक होय. ज्यांना विचार-पूर्वक कर्मे करण्याची इच्छा असेल त्यांनीं ही गैरशिस्त चाल प्रथम सुधारावी. किंजवडेकर व गोरे शास्त्री यांनीं ह्या मूर्खपणाच्या आचाराचा तीव्र निषेध केला आहे तो अगदीं योग्य आहे. गृहप्रवेशानंतर लक्ष्मी-पूजनादि बंडें काढून टाकून त्यांच्या ऐवजीं गृहप्रवेशनीय होम करावा. गृहस्थानें स्मार्ताग्नि बाळगावा हें युक्त होय. हा नष्ट झालेला आचार पुनः सुरु करावा. त्यामध्यें दौष्कर्य नाहीं. कालक्षेपहि विशेष नाहीं. उलट स्त्रियांस धर्माचरण करण्याची सुसंधि मिळते. "पाणिग्रहणादि गृह्यं परि-चरेत्स्वयं पत्न्यपि वा पुत्रः कुमार्यन्तेवासी वा" पाणिग्रहणापासून स्वतः, पत्नीनें, मुलानें, मुलीनें अथवा शिष्यानें अग्निसेवा करावी. इतक्या सव-लती असतां ह्या नष्टाचाराचें पुनरुज्जीवन करण्याचें कोणाच्या मनांत येऊं नये ही आश्चर्याची गोष्ट आहे. ह्या धर्माचरणांत स्त्रियांची उन्नति आहे म्हणून त्यांनीं ही गोष्ट मनावर घ्यावी. द्रव्याच्या अभावीं दानधर्माचें पुण्य मिळणें शक्य नाहीं; निरामयतेच्या अभावीं व्रतादिकांचें आचरणहि हातून घडत नाहीं; ह्यास्तव अग्निसेवेचा उपक्रम सर्व द्विजांनीं करावा. पण विशेषतः स्त्रियांनीं ह्याचा विचार करावा. मूर्तिपूजेपेक्षां अग्निपूजा बरी.

परंतु इतकें करणेंहि दुर्घट वाटत असेल व अग्निसेवेचा पुनरुद्धार करण्याचें जर समाजाला पटत नसेल तर गृहप्रवेशनीय होम तरी करण्याचें कारण काय ? विवाहहोमानें विवाहकार्य होतें. " भार्यात्वसिद्धये विवाहहोमं करिष्ये " इतकाच संकल्प सोडावा. " गृह्याग्निसिद्धये च " हे शब्द उच्चारूंच नयेत. म्हणजे गृहप्रवेशनीय होमाचा प्रश्नच उरत नाहीं; आणि आपल्या बेअकलीपणाचें प्रदर्शनहि होणार नाहीं. गृह्यसूत्रांत " विवाहाग्निमग्रतोऽजस्रं नयन्ति " असें सांगितलें आहे. हा विधि नाहीं. केवळ पूर्वापार रूढि निवेदन केली आहे. विवाहाग्नि नेहमीं पुढें नेतात हा ह्या सूत्राचा अर्थ आहे. विवाहाग्नि न्यावा असें सूत्रकार सांगत नाहीं. म्हणून " इह प्रियं प्रजया ते समृध्यताम् " असें म्हणून गृहप्रवेश करावा. तात्पर्य गृह्याग्नीचें पुनरुत्थापन करावयाचें असेल तरच विवाहाग्नि गृहप्रवेशाच्या वेळीं न्यावा. गृह्याग्निसिद्धि हें कांहीं विवाहांगभूत कर्म नव्हे. विवाहानंतर गृह्याग्नि सिद्ध करण्यास अधिकार प्राप्त होतो इतकेंच. त्या दोहोंमध्यें अवयवावयविभाव नाहीं, कार्यकारणभाव आहे, हें विसरतां कामा नये. सारांश कन्यादान, विवाहहोम आणि गृहप्रवेश हीं विवाहाचीं प्रमुख अंगें होत. गृहप्रवेशाबरोबर लग्नविधि संपूर्ण होतो.

वरील विवेचनावरून आपोआपच सिद्ध होतें कीं, लग्नांतील बाकीचे असंख्य विधि अनावश्यक होत. ग्रहमख, देवप्रतिष्ठा, सीमंतपूजन, वाङ्निश्चय, मधुपर्क, पुण्याहवाचन, ऐरणीदान, ऐरणीपूजन, प्रारंभींचें पत्रिकापूजन वगैरे विधि वैकल्पिक आहेत. ज्यांना वेळ असेल, हौस असेल, त्यांनीं हे विधि करावे. बाकीच्यांनीं त्यांना संक्षेप द्यावा हेंच उत्तम. घाणा, उष्टी हळद, रुखवत, मांडवपरतण, आंबोण इत्यादि आचार तर सध्यां निरर्थक भासतात, एवढेंच नव्हे तर आमच्या बुद्धिमांद्याची ती एक ध्वजाच आहे, असें म्हटलें असतां यत्किंचितहि अतिशयोक्ति होणार नाहीं. मुलीच्या बापाला आपल्या गांवीं खेंचून आणून परत त्याच्या-

कडून सीमंतपूजन व मांडवपरतण घेणाऱ्या शिक्षितांच्या वेवकूबतेची तारीफ करावी तेवढी थोडीच. हा नुसतां प्रतिष्ठित लुटारूपणा होय. कन्यादानानिमित्त कन्येचा बाप आप्तेष्टांना पानसुपारी देतो हें ठीक आहे. पण मुलाच्या बापाकडूनहि मुलीच्या मांडवांत पानसुपारी वांटण्याचा व अत्तरगुलाब देण्याचा प्रचार कां पाडावा तें समजत नाहीं. मुलाच्या बापाचा अज्ञानजन्य अहंभाव हेंच कारण असावें दुसरें काय ?

लग्नाच्या बाबतींत पुष्कळच सुधारणा करणें इष्ट आहे. प्रथम प्राचीनकाळची कन्यावरणाची चाल अस्तित्वांत आणावी. ऋतुप्राप्तीपूर्वी विवाह झालाच पाहिजे असा नियम असल्यामुळें मुलीच्या लग्नाची घाई करण्याचें कारण पडलें. पण ही मर्यादा अतउत्तर राहिली नाहीं. तेव्हां मुलीच्या बापाला तिच्या लग्नाचें एवढें चिंतन कशाकरतां ? म्हणून मुलाच्या बापानें मुलीकरितां मागणी करावी म्हणजे मुलींची प्रवासाची दगदग वांचेल. तसेंच लग्नसमारंभ मुलीच्या गांवींच व्हावा. हुंडा न घेतांना सालंकृत कन्यादान व्हावें. कन्यादान, विवाहहोम आणि गृहप्रवेश ह्याव्यतिरिक्त कोणताहि विधि करूं नये. जेवणावळी फक्त दोन व्हाव्याः एक वधूकडील व एक वराकडील. असें केलें असतां ‘ कन्यापितृत्वं खलु नाम कष्टम् ” असे शोकाकुल उद्गार मुखावाटे काढण्याचा प्रसंग कोणावरहि ओढवणार नाहीं.

---

# स्त्रियांचें पुंसीकरण.

विवाहगत आवश्यक धार्मिक कर्मांचा खल केल्यानंतर वैवाहिक सुखाकडे आमच्या भाषणाचा ओघ स्वभावतः वळला. स्त्रीपुरुषांना संसारसुख अधिकांत अधिक कोणत्या उपायांनीं प्राप्त होईल हा आमच्या गप्पांचा आतां विषय झाला. सर्व जगांत प्रस्तुतकालीं हा अत्यंत महत्वाचा विषय होऊन बसला आहे. समाजघटना झपाट्यानें बदलत आहे. पूर्वीची बसलेली घडी सध्यां उलगडत चालली आहे. प्रत्येक रूढी क्रांतीच्या जळजळीत तव्यावर पडून द्रवीभवनाच्या मार्गाला लागली आहे. आणि ह्या सर्वाला कारण स्त्री आहे. पुरुष पूर्वीं होता तसाच सध्यांहि आहे. पण स्त्रीचें मात्र पुरुषीकरण होऊं पहात आहे. आपण पुरुष व्हावें अशी उत्कंठा त्यांस लागून राहिली आहे. " तस्मात्सर्व परित्यज्य पातिमेकं भजेत्सती " असलें सतीत्व स्त्रियांस मानेनासें झालें आहे. पुरुषांप्रमाणें स्त्रियांस जगांत अप्रतिहत वावर करावयास पाहिजे आहे. सारांश, पुरुष जरी अद्यापि पुरुषच राहिला असला तरी स्त्री स्त्री राहिली नाहीं. संसार हा स्त्रीपुरुषांचा आहे. पुरुष–पुरुषांचा नाहीं. तेव्हां पुरुष व पुरुषी स्त्रिया ह्यांचा संसार विघटित झाल्यास आश्चर्य तें काय ? स्त्रीपुरुषवादाला समान हक्काचा लढा असें स्वरूप देण्यांत येतें. परंतु हेंहि ह्या वादाचें यथार्थ वर्णन नाहीं. आजपर्यंत कुटुंबांत अथवा समाजांत पुरुषांचें जें स्थान होतें तें स्थान पटकावण्याची हांव स्त्रियांनीं धरली आहे. कुटुंबाचा मेढा पुरुष आहे ती स्त्री कां नसावी ? जगांत सर्वत्र पुरुषांचाच गाजावाजा चालला आहे, स्त्रियांचा कां नसावा ? अनेकविध धाडसी धंद्यांत पडून पुरुष नांव मिळवितात. स्त्रियांनाहि तसें कां करतां येऊं नये ? विवाहोत्तर

# स्त्रियांचें पुंसीकरण.

पतीमध्येंच पत्नीनें लीन कां म्हणून व्हावें ? पत्नीमध्येंच पतीनें जिरून जाण्यास प्रत्यवाय कां असावा ? विवाहानंतर तिचें नांव बदलण्याची वहिवाट काय म्हणून ? अशा ह्या विचाराच्या भोंवऱ्यांत आधुनिक स्त्रिया सांपडल्या आहेत. आमच्याकडेहि इंग्रजी शिक्षणाबरोबर ह्या विचारांचा फैलाव अधिकाधिक होणार ह्यांत शंका नाहीं.

आमच्यापैकीं एकजण " सर्वसत्वरुतज्ञ " म्हणजे सर्व जीवांची भाषा जाणणारा होता. त्यानें ही विद्या एका पिशाच्च्यापासून संपादन केली होती. गाईबैलांमधला संवाद त्यानें ऐकला होता, तो ह्यावेळीं त्यानें आम्हांस आपल्या विनोदी भाषेंत कथन केला. गाय बैलाला म्हणते कीं, तुम्हां बैलांनाच नांगराला, गाडीला जुंपण्यांत येतें तें काय म्हणून ? आम्ही असें कोणतें पाप केलें आहे कीं, आमचा उपयोग ह्या कामांकडे लोकांनीं करूं नये ? बैलानें उत्तर दिलें कीं, माझीहि तक्रार तीच आहे. तुम्हां गाईंचीच पूजा लोक कां करतात ? कामधेनु म्हणून तुमचाच बहुमान कां करतात ? लोकांची पायेवासना तुम्हांलाच भागवितां कां यावी ? आमच्यामध्येंच तें सामर्थ्य कां नसावें ? वगैरे. ह्या संवादांत प्रस्तुत स्त्रीपुरुषवादाचें रहस्य प्रतिबिंबित झालें आहे, हें कोणालाहि दिसून येईल.

आजपर्यंत सर्व राष्ट्रांत स्त्रिया अबला असें समजून त्यांच्या संरक्षणाची जबाबदारी आपणावर आहे अशा समजुतीनें स्त्रियांची वागणूक ठरली गेली होती. पण अबला म्हणून घेण्याचें स्त्रियांस आतां लांछनास्पद वाटूं लागलें आहे. सर्व देशांतील मध्ययुगीन समाजघटना, स्त्रीपुरुषांचा लिंगभेदजनित नैसर्गिक स्नेहाकर्षणधर्म व पुरुषांच्या मानानें स्त्रियांचा नैसर्गिक दुबळेपणा ह्या दोन तत्त्वांवर उभारली होती. म्हणून स्त्रीपुरुषांच्या प्रकृतिधर्माप्रमाणें त्यांचे भिन्न व्यवसाय ठरले गेले. त्याचप्रमाणें स्त्रीपुरुषांचा मिश्र समाज हा अशिष्टाचार मानला गेला !

आज हिंदुस्थानांत स्त्रिया ज्या तऱ्हेनें वागतात अगर त्यांस ज्या तऱ्हेनें वागविलें जातें तशीच हुबेहुब ग्रीक स्त्रियांचीहि वागणूक असे. कुमारी-विवाह प्रचारांत असून गृहव्यवस्था हाच त्यांचा मुख्य व्यवसाय असे. घराच्या बाहेर पडणें त्यांस फारसें माहीत नव्हतें, घरांतहि स्त्रियांच्या व पुरुषांच्या बैठकी वेळवेगळ्या असत. नवऱ्याच्या परोक्ष परपुरुषाशीं संभाषण करणें म्हणजे त्यांस मोठा अनाचार वाटत असे. पुरुष पाहुणा असला तर त्या पंक्तींत भोजनास बसत नसत. पतिनिष्ठा हा त्यांच्या समजुतीनें मोठा सद्गुण असे. ख्रिस्ती राष्ट्रांतील स्त्रियांनींहि थोड्या वर्षां-पूर्वींपर्यंत आपल्या स्त्रीत्वाचा त्याग केला नव्हता व अद्यापहि फ्रान्स व जर्मनींतील स्त्रियांनीं "पुंसीभवनाचा" मार्ग फारसा आक्रमला नाहीं. व्हिक्टोरिया राणीलाहि आपल्या सिंहासनाची मनापासून चिळस वाटे. हे पुरुषी धंदे बायकांना युक्त नाहींत असें तिचें मत होतें. "I am every day more convinced that we women, if we are good women, feminine, amiable and domestic are not fitted to reign......We women are not fit for governing—and if we are good women we must dislike these masculine occupations."

( Letters, Vol II )

ख्रिस्ती लग्नविधींत मी पतिपरायण राहीन अशीच शपथ वधूला घ्यावी लागते. पण अलीकडे कांहीं ख्रिस्ती राष्ट्रांनीं मी पतीच्या अर्ध्या वचनांत राहीन अशा तऱ्हेची नवऱ्याची ताबेदारी पतकरावयास लावणारी शपथ काढून टाकून तिच्या ऐवजीं तोलास तोल देण्यास लावणारी शब्दयोजना करून नवीन शपथ ( ? ) बनवली आहे. सारांश, 'कोणाची होऊं नये बायको' ही जुनी म्हण अमलांत आणण्याचा विडा सध्यां स्त्रियांनीं उच-लला आहे. स्त्रिया म्हणजे काव्य, मग कवींप्रमाणें स्त्रियाहि निरंकुश अस-ण्यांत चुकलें कोठें ?

———

# कुटुंबसंस्था मरेल कां तरेल ?

स्त्रियांच्या पुंसीभवनाचा उद्भव व्यक्तिस्वातंत्र्याच्या कल्पनेंत झाला आहे हें उघड आहे आणि व्यक्तिस्वातंत्र्याचा फैलाव सार्वत्रिक शिक्षणाच्या प्रसारावरोबर होणें अपरिहार्य आहे. आतां शिक्षणाचा संकोच करणें कोणासहि इष्ट वाटत असलें तरी तें अतःपर अशक्य, अव्यवहार्य व सर्वथैव असंमत असेंच होणार. पुरुष सुशिक्षित असण्याची आवश्यकता कोणासच अमान्य करतां येणें शक्य नाहीं, आणि सुशिक्षित भार्या असावी असें वाटणें ह्यांतहि कांहीं अस्वाभाविक आहे असें म्हणतां येणार नाहीं. परंतु दोन तुल्य–पदस्थ पण भिन्न रुचींचीं, भिन्न प्रकृतींचीं व भिन्न स्वभावाचीं माणसें आमरण सुखासमाधानानें एकत्र नांदणें शक्य आहे काय ? शिक्षणानें रुचिवैचित्र्य, मतवैचित्र्य, स्वभाववैचित्र्य ह्यांचें वाढतें प्रमाण असतें. दोन सुशिक्षित माणसांत एखाद्या विषयासंबंधानें मतभेद झाला तर एकाचें संमीलन दुसऱ्यांत कसें व्हावें ? बरें एकाच मताच्या स्त्रीपुरुषांचा संबंध घडला तरी स्वभाव जुळणें ही कांहीं सोपी गोष्ट नाहीं. न जुळत्या स्वभावाच्या दोन माणसांनीं जन्मभर एकत्र कां म्हणून राहावें हा विचार शिक्षणामृत-[ ? ] पान केलेल्या स्त्री-पुरुषांच्या मनांत घोळल्यावांचून राहणार नाहीं. तेव्हां असुखकर असें वैवाहिक संबंध भराभर तोडून आपल्या नशिबाची पारख इतरत्र पाहण्याकडे स्त्री-पुरुषांची प्रवृत्ति होणार. पुरुषी धंदे करूं पाहणाऱ्या स्त्रिया विवाहशृंखला पतकरण्यास तयार होणार नाहींत. परंतु पुष्पधन्व्याच्या शरताडनानें लाचार होऊन पुरुषाबरोबर अवैवाहिक संबंध करून त्यांना आपली विषयतृप्ति करून घ्यावी लागेल.

अशा प्रकारानें कुटुंबसंस्था अर्थातच नष्ट होणार. आतां एवढें खरें कीं, स्त्रियांनीं पुरुषी धंदे करण्यास नुकताच उपक्रम केला असल्यामुळें ही आपत्ति ओढण्यास थोडा कालावधि लागेल. तथापि सुशिक्षित स्त्रीपुरुषांची वैवाहिक ग्रंथि आजन्म अभेद्य ठेवणें दुःसह होईल. दोन पुरुष अथवा दोन स्त्रिया आयुष्यभर सुखासमाधानानें एकत्र राहिल्याचें उदाहरण क्वचित् सांपडेल. तोच प्रकार स्त्रीपुरुषांच्या संबंधानेंहि होणार व मग सांप्रत शब्दांत प्रचलित असलेल्या काडीमोडीचा प्रघात सरसहा सुरूं होणार. हा नुसत्या कल्पनेचा खेळ नव्हे, फक्त कालाचा प्रश्न आहे. अल्पकालीन संबंधापासून झालेल्या प्रजेची काळजी सरकारास घ्यावी लागेल. मुलें आईबापांचीं नसून सरकारचीं होतील व त्यामुळें सर्व समाजघटनाच बदलेल. मुलें सरकारला पोसावीं लागलीं कीं, सर्व इस्टेट ही वारसादाखल सरकाराकडेच गेली पाहिजे. राष्ट्राचा घटक कुटुंबाच्या ऐवजीं व्यक्ति होईल. पण सरकारकडून सर्व मुलांची योग्य जोपासना कशी व्हावी ? त्यांस योग्य शिक्षण कसें मिळावें ? प्रजासत्ताक राज्यकारभार असल्यास ह्या गोष्टी कशावशा तरी पार पडतील, निदान सुप्रजा करण्याचे प्रामाणिक प्रयत्न तरी केले जातील. पण एकसत्तात्मक राज्यव्यवस्थेंत त्या पद्धतीला पोषक असेच गुण मुलांमुलींत येतील अशी खबरदारी घेण्यांत येईल. असें राष्ट्र हीनतेज होण्यास विलंब किती लागणार ? ह्याप्रमाणें स्त्रियांचें पुंसीभवन म्हणजे समाजाची अधोगति होय. अमेरिकेंत काडीमोडीचें प्रमाण फारच मोठें आहे. युरोपखंडांतहि कांहीं कमी नाहीं. अगदीं ताजें उदाहरण म्हणजे केमलपाशाचें. सुशिक्षित स्त्रीबरोबर प्रेमविवाह होऊन थोडे दिवस गेले नाहींत तोंच उभयतांना परस्परांचा वीट आला. एका म्यानांत दोन सुऱ्या राहात नाहींत. लग्नानंतर स्त्रीपुरुषांचा मिलाफ होण्याच्या ऐवजीं थोडक्याच दिवसांत हळुहळू खिंडारें पडण्यास सुरवात होते. निकटसांनिध्यानें एकमेकांचें दोष

मात्र प्रामुख्यानें दिसतात. गुणांकडे दुर्लक्ष्य होतें. ह्यानंतर, औदासीन्य, असंतोष, व विरोध ह्या गोष्टी क्रमप्राप्तच होतात. अखेरीस विवाहग्रंथि छेदून टाकून असंतोषाचें शिखर गांठलें जातें. हा प्रकार ज्या राष्ट्रांत प्रेमजन्य विवाह होतात त्यांत घडून येतो हें विसरतां कामा नये. आमच्या जुन्या विवाहकल्पनेंत आणि आधुनिक पाश्चात्य विवाहकल्पनेंत मोठा फरक आहे हें येथें ओघानें आल्यावरून नमूद करणें जरूर आहे. हल्लीं प्रेम हें विवाहाचें कारण आहे. एकमेकांवर प्रेम असेल तरच विवाह करावा, अन्यथा केला असतां तो अशुद्ध विवाह होय, अशी सध्यां सुशिक्षितांची समजूत झालेली आहे. पण आमच्यामध्यें प्रेम हें विवाहाचें कार्य आहे, कारण नाहीं. विवाहानें आपण एकमेकांशीं बद्ध झालों आहों, ह्यामुळें एकमेकांवर प्रेम करणें आपलें कर्तव्य आहे, तो आपला धर्म आहे, असें आम्ही मानतों. परंतु अलीकडे प्रेमाला कार्याच्या ऐवजीं कारण बनविण्याची धडपड चालू आहे. सारांश स्त्रीसंबंधाचा प्रश्न समाजशास्त्राचें अध्ययन करणाराला अत्यंत महत्त्वाचा पण तितकाच बिकट आहे. शिक्षणाबरोबर विचारस्वातंत्र्य, विचारस्वातंत्र्याबरोबर अभिमान, व्यक्त्यभिमानाबरोबर दुसऱ्याविषयीं पूज्यबुद्धीचा अभाव, अशी ही परंपरा आहे. ह्याचा परिणाम कौटुंबिक सुखाचा अभाव. स्त्रीपुरुषांत दुसरा एक भेद आहे तोहि विचारांत घेण्यासारखा आहे. आर्थिक स्वातंत्र्यानें स्त्रियांमध्यें विवाहपराङ्मुखता बळावते असा अनुभव आहे. पण पुरुषामध्यें मात्र धनसंचय हा विवाहप्रवणतेला कारणीभूत होतो. ह्याचा उघड अर्थ असा दिसतो कीं, श्रीमंतीच्या उपभोगाची पूर्तता होण्यास पुरुषाला स्त्रीची आवश्यकता वाटते. पण एवढेंच असतें तर पुरुष विवाहाच्या भानगडींत पडताना. विवाहव्यतिरिक्त मार्गानें त्याला विषयसेवन करतां आलें असतें. परंतु ज्याअर्थी तो लग्नाची घोरपड आपखुषीनें पतकरतो त्याअर्थी तो कुटुंबसुखाची लालसा धरून असतो असें

म्हणावें लागतें. पण मग विषयसुखाहून भिन्न असें जें कौटुंबिक सुख त्याविषयीं पुरुषांपेक्षां स्त्रिया स्वभावतःच कमी उत्सुक असतात कीं काय ? स्त्रीस्वातंत्र्य व कुटुंबसंस्था ह्यांचें साहचर्य संभवतें काय ? हा समाजापुढें सध्यां प्रश्न आहे. त्याचप्रमाणें कुटुंबसंस्था मोडली तर मुलांचें संगोपन करून त्यांना उत्तम नागरिक बनवण्याची जबाबदारी सरकारला झेपेल काय, हाहि दुसरा प्रश्न त्यानंतर उद्भवलाच पाहिजे. आपलें राष्ट्र परांकित होऊं नये, आपल्यालाच उच्च संस्कृति लाभावी, परमेश्वरानें आपणांस जन्म दिल्याचें सार्थक व्हावें, अशी महत्त्वाकांक्षा बाळगणाऱ्या राष्ट्रानें शरीरानें सुदृढ, मनानें निष्पाप, आणि बुद्धीनें चौकस अशी प्रजा ज्या योगानें निर्माण होईल अशाच संस्था अस्तित्वांत आणल्या पाहिजेत. कुटुंबसंस्था विलयाला गेली तरी सुद्धां अशी संतति जन्मास येईल अशी हमी देण्यास कोणी तयार आहे काय ? इतर प्राण्यांहून मनुष्याची गोष्ट निराळी आहे. इतर प्राण्यांत नरमादीचा संयोग केवळ आत्मतृप्तीकरतां असतो. पुढें प्रजा कशी होईल ह्याची कल्पना त्यांना कधींच शिवत नाहीं, व मनुष्येतर जीवसृष्टींत जसा एक प्राणी तसाच दुसरा अशी स्थिति असते. परंतु मनुष्यांत मन आणि बुद्धि हीं श्रेष्ठ प्रतीचीं असल्यामुळें एक मनुष्य दुसऱ्या माणसासारखा नसतो. कधीं कधीं दोन माणसांत जमीनअस्मानाचें अंतर असतें. गांधी आणि जवळकर ह्या दोन माणसांत शरीरसादृश्याशिवाय कांहीं तरी साम्य आहे काय ? आतां गांधीसारखी नररत्नें आपल्या कुलांत निपजावी अशी प्रत्येक आईबापाची उत्कट इच्छा असली पाहिजे. तेव्हां भावी संततीविषयीं विचार न करतां स्त्रीसमागम करणें म्हणजे पाशवी वृत्तीचा अंगीकार करणें होय. ही आपत्ति टाळण्याकरितांच विवाह व कुटुंबसंस्था अस्तित्वांत आल्या. ‘ ददातु वीर शतदायमुक्थ्यम् ’ (अथर्ववेद ६।४९)–संपन्न, विख्यात आणि पराक्रमी असा पुत्र देवो–अशी परमेश्वराची प्रार्थना करून व अशी प्रबल

इच्छा मनांत धरूनच मनुष्यांमध्यें स्त्रीपुरुष संयोग होत असतो; निदान तसा होणें अत्यंत अगत्याचें आहे. कारण हा व्यक्तीचा प्रश्न नसून राष्ट्राचा आहे. मनुष्यांचें राष्ट्र बनतें, जनावरांचें बनत नाहीं. दुसऱ्या राष्ट्रानें आपणांस खाऊं नये असें वाटत असल्यास पशुकोटींतून मनुष्य-कोटींत आपणांस आलेंच पाहिजे. नुसत्या विषयानंदाकरतां स्त्रीपुरुष-संयोग होण्यानें मनुष्यत्वाची हानि होते. जनावरांमध्यें आणि मनुष्यां-मध्यें कांहीं भेद रहात नाहीं. अपत्यप्रेम हेंच स्त्रीपुरुषांस एकत्र ठेवूं शकतें. " अंतःकरणतत्त्वस्य दंपत्योः स्नेहसंश्रयात् । आनंदग्रंथिरेकोऽय-मपत्यमिति बध्यते " ॥

---

# न स्त्री स्वातन्त्र्यमर्हति.

स्त्रियांना अबला ही दिलेली संज्ञा सार्थ आहे. नुसत्या शरीररचनेचा विचार केला तरी सुद्धां असें दिसून येईल कीं, स्त्रियांचें शरीर कोमल तर पुरुषांचें राठ; पुरुषांप्रमाणें स्त्रिया कणखर क्वचित असतात. हा भेद मनुष्यांतच असतो असें नव्हे. पशुपक्ष्यांतहि हीच स्थिति अनुभवास येते. मनुष्यांत कृत्रिम बंधनांमुळें पुरुषांप्रमाणें स्त्रियांची वाढ होत नाहीं असें म्हणतां येण्यासारखें आहे. पण पशुपक्ष्यांत तर पूर्ण स्वातंत्र्य आहेना ? मग तेथें ह्या भेदाची उपपत्ति कशी लावणार ? बैल व रेडा हे जितकें ओझें वाहूं शकतील तितकें गाय व म्हैस ह्यांना सहन होत नाहीं; म्हणूनच गाडीला गाय अगर म्हैस कोणी जुंपीत नाहीं. बरें एखाद्या बुद्धिवाद्या तार्किकानें असा प्रयोग करून पाहिला तर त्यास काय अनुभव येईल ? गाय व म्हैस ह्यांच्याकडून कमी काम होईल व शिवाय दोहनकर्माला त्या अपात्र होतील. म्हणजे एकंदर दुहेरी नुकसान होईल. गायीला बैली धंदा करावयाला लावून गायीमधला गायपणा आपण नाहींसा करतों, आणि मिळवतों काय ? कांहीं नाहीं. अशी कल्पना करा कीं, जगांतील सर्व गायीम्हशींना आपण बैलरेड्यांच्या ऐवजीं उपयोगांत आणलें. आतां ह्या सुधारणेनें जगाचें कल्याण होईल, असें गुळमुळीत तरी म्हणावयास कोणी धजावेल काय ? जी गोष्ट गायीम्हशींची तीच मानुषस्त्रियांची. पुरुष जातीपेक्षां स्त्रीजात शरीरानें निसर्गतःच निर्बल असते ह्यांत संशय नाहीं. ह्याचें एक कारण असें आहे कीं, स्त्रियांपेक्षां पुरुषांत कामोद्भव उत्कट असतो. पुरुषांत कामाची तडफ स्त्रीपेक्षां अधिक व्यक्त असते. त्यामुळें पुरुषांचीं सर्व इंद्रियें व अवयव ह्यांचें विकसन जास्त होतें. कारण

कांहींहि असो, पुरुषापेक्षां स्त्रीचें शरीरसामर्थ्य कमी असतें ही गोष्ट खरी. क्षणभर अशीहि कल्पना करूं कीं, स्त्री व पुरुष हीं शरीरसामर्थ्याच्या बाबतींत समबल आहेत. तथापि गर्भावस्थेंत व प्रसूतिसमयीं स्त्रिया परवश होतात ह्याविषयीं शंका येण्याचें कारण नाहीं. स्त्रियांच्या आयुष्यांतील हा पंगुपणाचा काल थोडाथोडका असतो असेंहि नाहीं. अशा वेळीं संरक्षणार्थ स्त्रिया अन्यगतिक बनतात ह्यांत आश्चर्य तें काय? रोगग्रस्त पुरुषहि हतबल होऊन परतंत्र होतो, अशा विचारानें वरील प्रमेय बाधित होत नाहीं. व्याधिजन्य पराधीनता स्त्री--पुरुषांस सारखीच आहे. शिवाय व्याधिपीडा ही आगंतुक असते. ती प्रकृति नव्हे. ती विकृतावस्था होय. पण गर्भावस्था हा स्त्रीत्वाचा नैसर्गिक परिणाम आहे. प्रजोत्पादन व प्रजासंगोपन ह्यांकरितांच स्त्रीचा जन्म आहे. तेव्हां स्त्रीची परवशता स्वभावसिद्ध आहे, हेंच सिद्ध होतें. नऊ महिने गर्भधारणा व व तीन महिने प्रसूतावस्था ह्याप्रमाणें एक वर्ष दर बाळंतपणामागें स्त्रिया नियंत्रणाखालीं असतात. ह्या कालांत कोणताहि व्यवहार आणि तोहि अप्रतिहतपणें करतां येईल इतका त्यांच्यामध्यें शरीराचा सुटसुटीतपणा अगर मनाचा चलाखपणा असूं शकत नाहीं. एवढेंच नव्हे तर अन्य व्यवसायांत लक्ष्य घातल्यास त्याचा अनिष्ट परिणाम गर्भपोषणक्रियेवर झाल्यावांचून राहात नाहीं. त्याचप्रमाणें प्रसूतीनंतर शिशुपानाचें कामहि एकट्या स्त्रियांवरच पडतें व हाहि कालावधि एका वर्षाहून कमी नसतो. ह्या कालमर्यादेंतहि स्त्रीच्या हातून कोणताहि स्वतंत्र व्यवसाय होण्यासारखा नसतो. सारांश, एका मुलाच्या मागें स्त्रीची दोन वर्षें जातात व दोन वर्षांनीं पुनः गर्भधारणेचा प्रसंग येतो. तेव्हां वयाच्या सोळा वर्षांपासून सुमारें पंचेचाळीस वर्षेपर्यंत स्त्रियांचें आयुष्य मुलांच्या पायीं खर्च होतें. पण ह्यांत कांहीं अयोग्य आहे हें ध्वनित करणेंहि मूर्खपणाचें होईल. कारण अभिजात संतति निर्माण करणें हें प्रत्येक देशप्रेमी

गृहस्थाचें आद्य कर्तव्य आहे. आणि स्त्री ही संततिनिर्मितीचें साधन आहे. तथापि स्त्रियांचा हा आयुष्याचा काळ परावलंबनांत जातो हेंहि सूर्यप्रकाशाइतकेंच स्पष्ट आहे. असें असतां स्त्रीपुरुषांना एकाच दावणींत गोवून पुरुषांप्रमाणेंच स्त्रिया स्ववश आहेत अशी अयथार्थ कल्पना करून पुरुषी धंदे करण्यास स्त्रियांना सवलत देणें हें पोरकटपणाचें व उथळपणाचें द्योतक नाहीं काय ? मनु हा मोठा समाजशास्त्रज्ञ होता. स्त्रियांना स्वातंत्र्य देणें राष्ट्रीयदृष्ट्या हितावह नाहीं हा त्याचा सिद्धांत आधुनिक उसन्या विचारांच्या पावशिक्षितांना मानवत नाहीं ह्यांत त्या महानुभावाचा काय दोष ? स्त्रीस्वातंत्र्य म्हणजे वंशक्षय; आणि वंशक्षय म्हणजे राष्ट्रक्षय. प्रजोत्पादनकालीं स्त्रियांना कोणताहि व्यवसाय स्वतंत्रपणें करतां येत नाहीं हें आपण पाहिलेंच आहे. तेव्हां अर्थातच स्त्रीस्वातंत्र्य आणि प्रजोत्पादन यांचें साहचर्य असणें शक्य नाहीं. पुरुषव्यापार करणाऱ्या स्त्रिया प्रजोत्पादनपराङ्मुख असतात असा अनुभवहि आहे. म्हणून पुरुषांचे धंदे स्त्रिया करूं लागल्या कीं राष्ट्र खड्ड्यांत गेलेंच म्हणून समजावें. "स्त्री पुंवच्च प्रभवति यदा तद्धि राष्ट्रं विनष्टम्" हें कांहीं खोटें नाहीं. स्वतंत्र धंदे करून आपली उपजीविका करूं पाहणाऱ्या स्त्रिया अविवाहित राहतील अथवा संतति न होण्याच्या मार्गाचा अवलंब करतील. ह्याचा परिणाम राष्ट्रावर काय घडेल हें आपणांस आज फ्रान्सच्या उदाहरणावरून समजण्यासारखें आहे. स्त्रीपुरुषांना एकत्र स्नान करतां येईल अशीं सार्वजनिक स्नानगृहें उघडावीं अशा सूचना प्रजनना-नाच्या उत्तेजनार्थ आज फ्रान्समध्यें मोठ्या विद्वानांकडून होत आहेत. स्त्रियांना स्वतंत्र धंदे करूं देणें म्हणजे त्यांना आर्थिक स्वातंत्र्य देणें होय व त्याचाच अर्थ विवाहसंस्था नष्ट करणें होय.

विवाहसंस्थेबरोबर कुटुंबसंस्थाहि लुप्त होणार. ह्यासाठींच मनूनें स्त्रियांना स्वातंत्र्य देऊं नये असें म्हटलें आहे. पण हल्लींच्या बायकांना

# न स्त्री स्वातंत्र्यमर्हति.

ह्या गोष्टी रुचत नाहींशा झाल्या आहेत. म्हणून त्यांचे उन्नतीचे मार्गेहि निराळेच. "नवाङ्गनानां नव एव पन्थाः". प्रजननाच्या कामीं पुरुषांची जरी आवश्यकता असली तरी तो तें कर्म करून कोणताहि धंदा करण्यास मोकळा असतो. म्हणजे पुरुषाचें स्वयंभू स्वातंत्र्य निर्बाधित राहतें. परंतु स्त्रिया मात्र स्वयंभूच परावलंबी असतात. कारण गर्भधारणा म्हणजे परावलंबन होय. आतां स्त्रियांना स्वातंत्र्य नाहीं ह्याचा अर्थ त्यांना प्रत्यक्ष कृतींत गुलामाप्रमाणें वागवाव्या, त्यांना हाणमार करावी, अगर त्यांची आबाळ करावी, असा होत नाहीं. ज्या मनूनें स्त्रीला स्वतंत्रता युक्त नव्हे असें लिहिलें त्याच मनूनें जेथें स्त्रिया पूज्य मानल्या जातात तेथेंच देवता सुख पावतात असें लिहिलें आहे, ह्यांत कोणतीहि विसंगति नाहीं. तात्विक दृष्ट्या स्त्रियांची परवशता मान्य करून स्त्रियांना जितकें स्वातंत्र्य देतां येईल तितकें देणें हें आपलें कर्तव्य आहे असा मनूचा आशय. पण स्त्रिया जर स्वभावतःच परवश आहेत, स्त्रीत्वाला अनुरूप असें परमेश्वरनियोजित कार्य पार पाडण्याकरतां परावलंबित्व पतकरणें जर त्यांचें मुख्य कर्तव्य आहे, तर एकाच पतीवर आजन्म विसंबून राहणें हेंच योग्य ठरत नाहीं काय ? पण ह्या मुद्याचा विस्तार पुढें करतां येईल. सध्यां स्त्रीची सहजपंगुता निदर्शनास आणणें हेंच आपलें काम आहे.

---

# गृहिणी गृहमुच्यते.

स्त्रियांना पुरुषी शिक्षण दिल्यानें विवाहाचा फांस आपल्या मानेभोंवती लावून न घेण्याकडे त्यांच्या मनाचा कल होतो. अविवाहित म्हणजे पुरुषी स्त्रिया. अविवाहित राहून स्त्रिया पुरुषसंख्येंत भर घालतात. जगाला आरंभ असेल तर आपणांस अनुभवावरून असें म्हणतां येतें कीं, आदिकालापासून आजवर सर्व पृथ्वीवर परमेश्वर स्त्री व पुरुष यांस समप्रमाणांत जन्मास घालतो. म्हणजे एका पुरुषाला एक स्त्री असावी असा परमेश्वरी हेतु दिसतो. आतां अविवाहित स्त्रियांनीं आपणांस जर पुरुषजमा करून घेतलें तर निसर्गप्रमाण चळतें. पुरुषांवरहि अविवाहित राहण्याचा प्रसंग येणार. स्त्री व पुरुष मिळून एक घटक अशी मूळची परमेश्वरी योजना. पण स्त्रिया पुरुष बनल्यानें पुरुषाचें तसेंच स्त्रीचें मनुष्यत्व विकल होतें. स्त्री-पुरुषांच्या व त्यांच्यावरोबर समाजाच्या उन्नतीला अथवा उत्कर्षाला विवाह मुख्यत्वेंकरून कारणीभूत होतो. परंतु अविवाहित अतएव अपूर्ण अशा पुरुषाकडून अगर स्त्रीकडून समाजहित कसें साधणार? आतां पुरुषी शिक्षण घेतलेल्या स्त्रिया विवाहबद्ध होतात अशी कल्पना केली तरी त्यांच्यामध्यें संसार चालवण्याची किंवा बालसंगोपन करण्याची पात्रता त्या शिक्षणानें येतें असें कसें म्हणतां येईल? बुद्धि प्रगल्भ होईल, बहुश्रुतपणा उत्पन्न होईल, तसेंच मनुष्यस्वभावाचें ज्ञान होईल, पण इतक्यानें संसाराशिक्षणाची पूर्तता होणार नाहीं. पुरुषी शिक्षणांत आयुष्य वांया जाऊन आवश्यक शिक्षणाच्या अभावीं संसाराचा गाडा रेंगाळत चालला तर त्यांत नवल तें काय?

# गृहणी गृहमुच्यते.

संतानोत्पादनाकरितांच स्त्रीचा जन्म असल्यामुळें गृह हेंच काय तें तिचें कार्यक्षेत्र बनणें स्वाभाविक आहे. गृह आणि स्त्री ह्यांचें इतकें तादात्म्य आहे कीं, "गृहिणी गृहमुच्यते" ह्या उक्तीची यथार्थता कोणाहि विचारवंताला पटल्यावांचून राहणार नाहीं. घरीं स्त्री आणि बाहेर पुरुष ही योजना जणूं काय निसर्गसिद्धच दिसते; व अशा ह्या विभागणीनें स्त्रीला कोणत्याहि प्रकारचा कमीपणा वाटण्याचें कारण नाहीं. उलट गृहिणी ह्या बहुमानपूर्ण पदाची प्राप्ति करून घेण्याची तिला महत्त्वाकांक्षा असली पाहिजे. राज्यव्यवस्था व गृहव्यवस्था ह्यांमध्यें स्वरूपतः कांहीं भेद नाहीं; म्हणून राज्यव्यवस्थेच्या कामीं जें चातुर्य, जी दक्षता, व जो चतुरस्रपणा लागतो त्या सर्व गुणांची गृहव्यवस्थेच्या कामींहि आवश्यकता असते. ह्याकरितां हे गुण ज्या शिक्षणाच्या योगानें स्त्रियांत अवतरतील असें शिक्षण त्यांस मिळालें पाहिजे. विवाहित स्त्रियांनीं द्रव्यार्जन केलें असतां त्यांची नवऱ्याजवळ प्रतिष्ठा राहील व त्यांना ओशाळगतीनें वागण्याचें प्रयोजन राहणार नाहीं, ही मिलची विचारसरणी हास्यास्पद व मूर्खपणाची आहे. मिलचे विचार उथळ असून त्याच्या लेखांचा परिणाम आमच्याकडे गेल्या पिढीवर झाल्यामुळें आमच्याहातून आमच्या राष्ट्राचें अनहित होत आहे. नवराबायकोचा अथवा पतिपत्नीचा समसमान दर्जा आणि अधिकार पाहिजे, दोघांना सारखे हक्क पाहिजेत, त्याशिवाय या स्त्रीपुरुषांचा संसार सुखावह होणार नाहीं, ह्या मताचा पुरस्कार कांहीं पाश्चात्य पंडितांनीं केला व तेंच तुणतुणें आम्हीं पण वाजवीत बसलों आहों. पण हा माभळभट्टी युक्तिवाद कोणाचें समाधान करूं शकेल ? समान हक्काच्या वायफळ गोष्टी बोलणारांना आपण काय म्हणतों हे तरी समजतें कां ? नवऱ्याविरुद्ध स्त्रीचा हक्क ! स्त्रीविरुद्ध नवऱ्याचा हक्क ! असे हक्क असले म्हणजे त्यांचें अतिक्रमण हरघडी होणार. कारण नवराबायकोचा परस्परसंबंधच तशा प्रकारचा आहे आणि मग

काय पुसावें ! नवराबायकोंना अर्धे आयुष्य फौजदारी कोर्टांतच घालावें लागेल. एकमेकांविरुद्ध हक्क असलेल्या दोन व्यक्ति गुण्यागोविंदानें एकत्र नांदणें अशक्य आहे. नवराबायको म्हणजे कांहीं जॉइंट स्टॉक कंपनी नव्हे. एकमेकांच्या गळ्यांत माळ घातलेल्या स्त्रीपुरुषांना समसमान हक्क आहेत असें मानणें म्हणजे त्या दोन व्यक्ति स्वतंत्र व अलग करणें होय. आतां पुराणमतवादी अशा स्त्रीपुरुषांचें तादात्म्य मानतात. हें तादात्म्य पृथक्त्वापेक्षां अधिक श्रेयस्कर नाहीं काय? तादात्म्यांत स्वतंत्र हक्कांना जागा कोठें आहे? ‘ शिवस्य हृदयं विष्णुः विष्णोश्च हृदयं शिवः ’ ही स्थिति स्त्रीपुरुषांच्या संबंधानें असली पाहिजे. स्त्रीपुरुष एकजीव होणें ही कल्पना उदात्त आहे, पण उदात्त असो वा अनुदात्त असो, उपयुक्त व सुखपर्यवसायी आहे ह्यांत संदेह नाहीं. हक्क आले म्हणजे हक्कांचें अतिक्रमणहि होणारच. आणि अतिक्रमण झालें कीं वाद उत्पन्न झालाच. अशा स्थितींत विवाहित स्त्रीपुरुष सुखी राहतील ही अपेक्षा कोणी करावी? स्त्रीपुरुषांचें परस्परांवर इतकें प्रेम असतें कीं, त्या प्रेमाला अतिरेक हा ठाऊकच नसतो. अशा प्रेमबद्ध, अगर प्रेमांध जोडप्याला आपआपल्या परस्परविरोधी हक्कांविषयीं जागृत रहा असा इशारा देणें हें वावळेपणाचें व अरसिकतेचें द्योतक होय. आतां एकजीव होणें ह्याचा अर्थ काय? दोन निरनिराळीं शरीरें विवाहरूपी जादूच्या कांडीनें एकत्र होतात, दोन शरीरांचें एक शरीर बनतें असें थोडेंच आहे. तेव्हां दोघांचे हितसंबंध एक असणें म्हणजेच एकजीव होणें होय. पण दोघांची मालमत्ता निरनिराळी असली तर हितसंबंधहि निरनिराळे होणार. मग शरीर निराळें, विचार निराळे आणि हितसंबंधहि निराळे. अशा ह्या दोन विचित्र व्यक्तींचें ऐक्य राहील काय? सारांश विवाहावस्थेंत म्हणजे निदान पति जीवंत आहे तोंपर्यंत तरी स्त्रीला पृथक् हक्क देण्याच्या वल्गना करणें बालिशपणाचें आहे.

# हक्क कीं कर्तव्य ?

स्वतंत्र हक्क देण्यानें नवरा–बायकोंत भिन्नभाव उत्पन्न होतो. पण भिन्नभावापेक्षां ऐक्यभाव प्रस्थापित करणेंच हितावह आहे. हा ऐक्यभाव निर्माण करणें म्हणजे नवराबायकोंपैकीं एकानें दुसऱ्यांत लीन होणें होय. आतां स्त्रीपुरुषांच्या कार्यव्यासीचा विचार करतां स्त्रीनेंच आपले हातपाय आंखडून घेणें राष्ट्रीय दृष्टया बरें. कारण स्त्री स्वभावतःच परावलंबी असून पुरुष मात्र निसर्गतःच स्वतंत्र आहे. म्हणून ह्या हक्कदानाच्या वल्गना स्त्रीपुरुषांच्या ऐक्यभावाला विघातक आहेत. जुन्या चाली तेवढ्या वाईट असल्याच पाहिजेत असें मानणें मूर्खपणाचें आहे. " पुराणमित्येव न असाधु सर्वम् ". नेपोलिअनचेंहि असेंच मत होतें. तो म्हणतो. It is ridiculous to say that nothing is right but what is new.

असो. हल्लीं ज्याच्या त्याच्या तोंडांत हक्क हा शब्द आहे. आपल्या हक्कांचें डोळ्यांत तेल घालून संरक्षण करण्यांत सर्व जनता गर्क झाली आहे. हें हक्कांचें वेडें पीक पश्चिमेकडून पूर्वेस आलें आहे. अर्वाचीन संस्कृतीचा तो एक आधारस्तंभ आहे. सुखावाप्ति हा प्रत्येक क्रियेचा हेतु असतो. आपल्या हक्कांचें उल्लंघन दुसऱ्याला न करूं देण्यानें व दुसऱ्याच्या हक्कांची पायमल्ली आपण न केल्यानें एकंदर जनता सुखी होईल असा आधुनिक पंडितांचा सिद्धांत आहे. पण इतर सिद्धांताप्रमाणें हाहि चुकीचा ठरेल ह्यांत संदेह नाहीं. अनुभवहि तसाच येऊं लागला आहे. हक्क ह्या शब्दांत उन्माद उत्पन्न करण्याचें सामर्थ्य असल्यामुळें अलीकडे सर्वच लोक उन्मत्त म्हणजे रजोगुणी दिसतात. सात्विक गुण सध्यां समाजांत लुप्तप्राय झाला आहे. लोकशाहीच्या युगांत हा विपर्यस्त

देखावा दिसावा हें खचित विस्मयावह आहे. वास्तविक पाहिलें तर अनियंत्रित सत्तेच्या युगांत हक्काचा दिमाख चालावा. पण कदाचित् असेंहि असूं शकेल कीं, एका मोठ्या हक्काच्या खालीं बाकीचे हक्क चिरडून जातात. उलट लोकशाहींत घोडहक्कांचें मर्दन झाल्यामुळें चिमुकले हक्क डोकें वर काढतात, हाच तर्क खरा असावा. कारण सांप्रत सर्वत्र हक्कांची चकमक झडत असलेली पाहण्यांत येतें. त्यामुळें चालू युगाला कलि–अथवा कलह–युग म्हणण्यांत औचित्यच आहे. समाजाची उभारणी हक्कावर करण्यांत येत आहे. पण हा प्रयत्न अपेशी झाल्यावांचून राहणार नाहीं. हक्काची मुहूर्तमेढ रोवलेल्या समाजांत प्रत्येकाला शस्त्रपाणि असावें लागतें. अशा समाजांत व्यक्तीला सुखोपलब्धि कशी व्हावी? हक्क म्हणजे दुसऱ्याला ज्याच्यापुढें मान वांकविली पाहिजे, ज्याच्यापुढें दुसऱ्याचें कांहीं चालावयाचें नाहीं असा एखादें कृत्य करण्याचा अधिकार अथवा दुसऱ्याला एखादें कृत्य ज्याच्यायोगानें करतां येणार नाहीं असा आपले ठिकाणीं असलेला अधिकार. ही नवीन कल्पना सध्यां लोकाचाराच्या न्याय्यान्याय्यत्वाची कसोटी बनूं पहात आहे. ही कल्पना मायावी, अतएव मोहक, पण सुखाला मात्र दूर दूर सारणारी आहे. ही कल्पना हल्लीं हक्क ह्या शब्दानें व्यक्त केली जाते. पण हक्क शब्दाचा हा कांहीं मूळचा अर्थ नव्हे. मनुष्यप्राणी हक्क घेऊन जन्मास आला नाहीं. ऋण घेऊन आला आहे.

हक्क हा शब्द संस्कृत किंवा मराठी नसून अरबी आहे. ह्या शब्दाचा प्रतिवाचक शब्द उभ्या संस्कृतमराठींत आढळत नाहीं. आमच्या प्राचीन विद्वानांच्या मतें समाजघटना धर्मावर म्हणजे कर्तव्यावर झाली पाहिजे. प्रत्येक मनुष्याचें तो ज्या परिस्थितींत आणि अवस्थेंत असेल त्या अवस्थेला अनुसरून सहज कर्तव्य असतें. आपआपल्या धर्माप्रमाणें, कर्तव्याप्रमाणें प्रत्येकानें वागलें पाहिजे. तेथें हक्काची बात नाहीं. प्रत्येकाच्या मागें

कर्तव्य लागलें आहे; त्याची जाणीव त्याला असली पाहिजे; हक्काची नको. आमच्या भाषेंत पतिधर्म, स्त्रीधर्म, राजधर्म, प्रजाधर्म, भृत्यधर्म, इत्यादि शब्द आहेत. हक्क अगर तत्सदृश शब्द कोठेंच नाहीं. राजालासुद्धां हक्क नाहीं, धर्म आहे. राजा हक्कविभूषित नसतो, तो धर्मवश असतो. राजानें आपला हक्क गाजवावयाचा नसतो. त्याला धर्मप्रमाणें वागावयाचें असतें, त्याला आपलें कर्तव्य करावयाचें असतें. प्रजा आपल्या धर्माप्रमाणें वागली नाहीं तर प्रजेला धर्माप्रमाणें वागवावयास लावणें अथवा अधर्माचरणाबद्दल शासन करणें हा राजाचा हक्क नव्हे, धर्म आहे. सारांश, राजापासून रंकापर्यंत कोणालाच हक्क नाहींत. सर्व कर्तव्यबद्ध आहेत. अशा दृष्टीनें आपण आपले व्यवहार केले म्हणजे सर्वांत सात्विक गुणांचा उत्कर्ष होतो; जगांत सुखशांति नांदते; कलहाग्नि पेटत नाहीं; उद्दामपणा अंगीं येत नाहीं. म्हणून सुखप्राप्तीचा हेतु सफल व्हावा अशी इच्छा असल्यास आपल्या कर्माचा प्रेरक हक्क न मानतां कर्तव्यच मानलें पाहिजे. जन्म घेणें अगर न घेणें हें आपल्या स्वाधीन नाहींत. तसेंच अमुकच ठिकाणीं अमुकच कुलांत अमक्याच्याच पोटीं मी जन्मास येईन असें म्हणण्याइतकें स्वातंत्र्य आपल्यामध्यें नाहीं. ह्या सर्व गोष्टी आपल्याकरतां परमेश्वर ठरवतो. तेव्हां आपणांस जन्म देण्यांत परमेश्वराचा कांहीं तरी उद्देश असलाच पाहिजे. हा उद्देश काय आहे तें समजून घेऊन तो तडीस नेणें हेंच आपलें कर्तव्य होय. ह्याचा अर्थ असा कीं, कर्तव्य आपल्यामागें ईश्वरानें लावून दिलें आहे व तें पार पाडणें ह्यांतच जन्माचें सार्थक आहे.

ह्यावरून हें उघड दिसतें कीं, स्त्रियांचे हक्क ही भाषाच निरर्थक आहे. स्त्रियांनीं आपल्या हक्कांबद्दल अकांडतांडव न करतां कर्तव्याची चर्चा करावी हें चांगलें. स्त्रियांप्रमाणें पुरुषांनाहि हक्क नाहींत हें विसरतां कामा नये. म्हणून पुरुषांप्रमाणें आम्हांला हक्क कां नाहींत हा प्रश्न असमंजसपणानेंच विचारला जातो. तात्पर्य, पतीनें आपल्या धर्माप्रमाणें वागावें.

स्त्रीनें आपल्या धर्माप्रमाणें वागावें. हक्कांबद्दल हाणामाऱ्या होतात तशा धर्माबद्दल होत नाहींत. धर्म, कर्तव्य, ह्यांविषयीं निष्ठा, भक्ति उत्पन्न होते. हक्कांविषयीं अभिमान उत्पन्न होतो, समाजामध्यें नेहमीं खळबळ चालू असते, असंतोष माजतो आणि खालपासून वरपर्यंत सुख कोणाच्याच वांट्यास येत नाहीं. परंतु हक्कदृष्टि निवळून कर्तव्यदृष्टि प्राप्त झाली कीं, असंतोषाचें बजिच नाहींसें होतें. अधिक हक्काच्या माणसाबद्दल मत्सर उत्पन्न होतो, पण अधिक कर्तव्याच्या माणसांविषयीं तितका हेवा वाटत नाहीं. पण ही हक्काची बडबड बंद कधीं होणार ?

---

# स्त्रियांचें शिक्षण.

स्त्रियांनीं लग्न करणें हें समाजदृष्ट्या जितकें इष्ट आहे तितकेंच निसर्गतः तें आवश्यक आहे. लग्नोत्तर प्रजोत्पादन व प्रजासंगोपन हीं त्यांच्या मागें लागलींच; व हे दोन व्यवहार असे आहेत कीं, स्त्रियांचे पाय घरांतच अडकले पाहिजेत. म्हणजे स्त्रियांना दाराच्या बाहेरचा कोणताहि व्यवसाय करतां येणें शक्य नाहीं. सृष्टिक्रमाच्या विरुद्ध जाऊन जर त्यांनीं बाह्योद्यम आरंभला तर रोडावलेल्या स्त्रियांच्या हाडकलेल्या पिशाच्च-रूपी मुलांनीं सर्व देश व्यापून जाईल आणि अशा मेषपात्र बनलेल्या राष्ट्राला कोणालाहि सहज लाथाडतां येईल. आणि मग शिशुसप्ताहा-सारखीं सोंगें असंख्य काढलीं तरी तेजस्वी राष्ट्र होणें शक्य नाहीं. हीं आपत्ति टाळावयाची असेल तर स्त्रियांनीं आपलें बुद्धिसामर्थ्य शिशुवर्धनां-तच खर्चीं घातलें पाहिजे. शिशुवर्धन व गृहव्यवस्था हीं दोन कृत्यें चोख रीतीनें करण्याची पात्रता सध्यां स्त्रियांच्या अंगांत नसल्यामुळें एखादें नमुनेदार कुटुंब पाहण्यास किती प्रवास करावा लागेल कोणाला ठाऊक ! सांप्रत तर आमच्या कुटुंबांची स्थिति चमत्कारिक झाली आहे. स्त्रियांचा उपयोग ह्या दोनहि कामीं व्हावा तसा होत नसल्यामुळें त्यांचें काम पुरु-षांनाच करावें लागतें. ह्याचा परिणाम असा होतो कीं, कोणतेंच काम चांगलें होत नाहीं. मुलांकडे दुर्लक्ष झाल्यामुळें ती सुविनीत होत नाहींत. तसेंच कामाच्या दुहेरी बोजामुळें यजमान अकालीं मृत्युमुखीं पडतो; आणि घरांत पैशाचा धूर निघत असला तरी टापटिपीसंबंधानें म्हणाल तर आंवळ्याएवढें पूज्य ! हल्लींचीं मुलें आईपेक्षां बापाभोंवतींच अधिक असतात ह्याचा विचार केला म्हणजे आमच्या आयांचीं कर्तव्य-पराङ्मुखता चांगलीच प्रत्ययास येते. हल्लीं कुटुंब म्हणून ज्याला म्हण-

तात तें आमच्याकडे नाहींच म्हटलें तरी चालेल. मग कुटुंबसुखाची गोष्टच काढावयाला नको. ह्या सर्वांचें कारण हल्लींच्या अशिक्षित अथवा विशिक्षित स्त्रिया होत. गर्भधारणा व प्रसूति ह्यांकरतां पुरुषांपेक्षां स्त्रियांना गृहाची जरूरी अधिक भासते. पुरुषांचें काय ? ' घर ना दार, देवळीं बिऱ्हाड ' अशी स्थिति असणें अशक्य नाहीं. तेव्हां हें घर स्त्रीस पतीपासून प्राप्त होतें. तसेंच स्त्रियांचें नैसर्गिक दौर्बल्य विचारांत घेतां त्यांच्या जीवाच्या व अब्रूच्या संरक्षणाची जबाबदारी आयतचि त्यांच्या पतीवर पडते. स्वातंत्र्योन्मुख स्त्रियांनीं या गोष्टीचा नीट विचार करावा. असो. घरकारभार व मुलांचें पालनपोषण हीं चांगल्या रीतीनें करतां येण्यास स्त्रियांना योग्य व चांगलें शिक्षण मिळणें अवश्य आहे. मराठी स्त्रियांविषयींच बोलावयाचें झालें तर प्रत्येक स्त्रीला मराठीचें पूर्ण ज्ञान झालें पाहिजे. मराठी भाषेचें शास्त्र या दृष्टीनें तिनें अध्ययन केलेलें असावें. मराठीमधील उत्तम ग्रंथांचें परिशीलन असणें अगत्याचें आहे. संस्कृतांत तिची बरीच प्रगति झाली पाहिजे म्हणजे; कोशाच्या साहाय्यानें प्रत्येक स्त्रीला पुराणग्रंथ वाचतां आले पाहिजेत. संस्कृत व मराठी वाङ्मयाच्या इतिहासाची थोडीबहुत माहिती असलीच पाहिजे. इंग्रजीचें ज्ञान कामचलाऊ असलें तरी पुरें आहे. पण हल्लीं इंग्रजीला फाजील महत्त्व दिलें जातें हें सर्वथैव अनिष्ट होय. सांप्रत हिंदु स्त्रियांना उपयुक्त अशी कोणतीहि शिक्षणसंस्था कीं जिला हिंदुशिक्षणसंस्था म्हणतां येईल अशी अस्तित्वांत नाहीं. हिंदु स्त्रियांकडून धर्मशास्त्रें म्हणजे स्मृतिग्रंथ वाचून घ्यावयास नको काय ? त्याचप्रमाणें ज्योतिषशास्त्राचेंहि सामान्य ज्ञान त्यांस कां नसावें ? संस्कृताच्या अध्ययनानें मनुष्य कर्मठ व संकुचित वृत्तीचा बनतो असा समज आमच्यापैकीं कित्येक विश्वविद्यालयांतील पंडितांचा झालेला आहे. पण हा ग्रह साफ चुकीचा आहे. उलट संस्कृत ग्रंथांच्या अध्ययनानें मनुष्य नास्तिक बनण्याचीच भीति कित्येकांना

वाटते. हिंदूंचें सर्व आयुष्य धर्मकृत्यांत जात असून हिंदु स्त्रियांना त्याविषयीं कांहीं माहीत नसावें हें किती अजब आहे बरें? आजच्या विद्वानांना पुराणांत शिमगा दिसतो. पण शिमगा टाकून वैशाख असेल तो घेण्यास तर हरकत नाहींना? पुराणांत उदात्त नीतितत्त्वें, धर्मशास्त्राचे नियम, इतिहास, इत्यादि अनेक विषय ग्रथित केले आहेत. त्या सर्वांचा इष्ट परिमाण वाचकांवर झाल्यावांचून राहणार नाहीं. नुसत्या भारताचें अध्ययन आमच्या स्त्रियांनीं केलें तरी, बहुश्रुतपणा, विद्वत्ता, विवादकौशल्य, इत्यादि अनेक गुण त्यांच्या ठिकाणीं अवतीर्ण होतील. नंतर सर्व धर्मांचा इतिहासहि त्यांस अवगत असावा. हिंदुस्थानचा इतिहास, जगाचा भूगोल, आजपर्यंत होऊन गेलेल्या साम्राज्यांचा त्रोटक इतिहास, ह्यांचें अध्ययनहि स्त्रियांना अनावश्यक नाहीं. शिवणकाम, कशिदा, गायनवादन, चित्रकला ह्यांच्याप्रमाणें वैद्यशास्त्राचा अभ्यासहि प्रत्येक स्त्रीनें केलाच पाहिजे. इतिहासाबरोबर प्रचलित राजकारणाची माहिती बहुधा होतेच. मुलांच्या विचारांना योग्य वळण लावण्यास राजकीय विषयांचें ज्ञान स्त्रियांना फारच उपयुक्त होतें. तसेंच आरोग्यशास्त्र, वनस्पति-व रसायनशास्त्रांचीं मूलतत्वें ह्यांवांचून तरी स्त्रियांचें—गृहिणींचें—कसें चालणार?

वरील कसोटी लावली असतां हल्लींच्या स्त्रिया किती मागसलेल्या आहेत ह्याची कल्पना करतां येते. स्त्रीजातीचे जन्मतःच असलेले दुर्गुण अर्धवट क्षिक्षणानें द्विगुणित मात्र होतात. सध्यां पुरुषांना स्त्रियांपासून कसलेंहि साहाय्य मिळत नाहीं. एवढेंच नव्हे तर पुरुषांचें आयुष्य दुःखी, कष्टी आणि अल्पकालीन करण्यालाच त्या कारणीभूत होतात. सर्व स्त्रिया हल्लीं ऐदी, चैनी, अविचारी, डामडौली व पतिसुखाविषयीं बेफिकीर अशा बनत चालल्या आहेत. ह्यामध्यें त्या बहुतांशीं पुरुषांचा कित्ता गिरवीत आहेत हें मात्र खरें. घरामधील सर्व कृत्यांची जबाब-

दारी पुरुषावरच पडते. ह्याचा स्पष्ट अर्थ असा कीं, पुरुषाला आपलीं कामें संभाळून शिवाय वायकांचींहि कामें करावीं लागतात. त्यामुळें पुरुष लवकरच मेटाकुटीस येतो. “संनद्धातिथिसत्कृतौ ग्रहभरे नैस्तन्द्रमाविभ्रती” असें विद्यमानकालीं किती स्त्रियांच्यासंबंधानें म्हणतां येईल? ज्या योग्यतेचा पाहुणा येईल त्याचा त्याच्या योग्यतेनुरूप आदरसत्कार किंवा विचारपूस स्त्रियांकडून होते काय? असल्या गोष्टींकडेहि पुरुषांनाच स्वतः लक्ष घालावें लागतें. पाहुण्याचा औत्सुक्यानें सत्कार करणारी मावली तर सध्यां विरळाच दिसते. कोणत्याहि वायकोला नोकरांना सांभाळून घेतां येत नाहीं. हाताखालीं कोणीहि माणूस न टिकणें हें आमच्या स्त्रियांच्या दुःस्वभावाचें निदर्शक नाहीं असें कोण म्हणेल? कोणत्याहि घरांत जा,–विशेषतः नोकरचाकर नाहींत अशा–तेथें स्वच्छता तुम्हांला आढळणार नाहीं; टापटीप निदर्शनास येणार नाहीं; वक्तशीर कामें झालेलीं दिसणार नाहींत; जागच्या जागीं वस्तु ठेविली जाते असा अनुभव येणार नाहीं; सौंदर्यशास्त्र पाळलें जातें असा प्रत्यय मिळणार नाहीं. ह्याचा सर्व दोष स्त्रियांच्या माथीं मारणें अनुचित होणार नाहीं. सर्व घर हंसतमुख दिसलें पाहिजे. घरांत गेल्याबरोबर आनंदवृत्ति उल्लसित झाली पाहिजे. कुटुंब पृथ्वीवरील स्वर्ग होय. आणि हा स्वर्ग तादात्म्याशिवाय वनत नाहीं. पण हक्काचें बीज पेरल्यानें कुटुंबसुखाचा विध्वंस झाला आहे. सध्यांचें आमचें कुटुंब म्हणजे त्याला धर्मशाळा पाहिजे तर म्हणा, पाहिजे तर खाणावळ म्हणा, पण ह्याहून त्याची वरची पायरी लागणार नाहीं. “क्रोशन्तः शिशवः सवारि सदनं पङ्कावृतं चाङ्गणं। शय्या दंशवती च रूक्षमशनं धूमेन पूर्णं गृहम् ॥ भार्या निष्ठुरभाषिणी प्रभुरपि क्रोधेन पूर्णः सदा। स्नानं शीतलवारिणा हि सततं धिग्धिग् गृहस्थाश्रमम्। हाच प्रकार थोड्या फार फरकानें सर्वत्र हल्लीं दृष्टीस पडतो.

---

# विवाहसुख.

—:*:—

ज्या शिक्षणाचा वर निर्देश केला आहे तें अर्थात्च विवाहित स्त्रियांचें शिक्षण होय. अविवाहित अथवा गतभर्तृका स्त्रिया पुरुषवजाच समजल्या पाहिजेत; व त्या जर संतानहीन असतील तर त्यांचा स्त्रिया म्हणून विचार करण्याचें वस्तुतः कारणच नाहीं. सध्यांच्या काळांत सुशिक्षित स्त्रियांची आवश्यकता नाहीं हें म्हणणें साहसाचें होईल. देवानें ज्यांना बुद्धि दिली आहे अशा मनुष्यजातीपैकीं निम्मी जात अज्ञानांत ठेवून मानवी प्रगतीला खीळ घालण्यास कोणीच उद्युक्त होणार नाहीं; शिवाय कुटुंब व संसार चालवण्यास उपरिनिर्दिष्ट शिक्षणाची जरूरी आहेच. पण हींहि कारणें बाजूस ठेविलीं तरी पुरुष विद्यासंपन्न झाल्यावर निरक्षर अशा सहचरीवर त्याचें मन कसें बसावें? पति व पत्नी ह्यांमध्यें शिक्षणविषयक अंतर जर फार असेल तर दोघांचीं अंतःकरणें एकमेकांना न समजल्यानें घरांत नेहमीं घासाघीस होईल. " देव म्हणे, सुदति, वृथा वरिलें मातें अलोकरीतीनें" असें कृष्णानें थट्टेनें रुक्मिणीस म्हटलें आहे. पण हा प्रश्न प्रत्येक नवरा आपल्या बायकोस गंभीर वृत्तीनें विचारावयाला गेला तर नवऱ्याची योग्यता अक्षरशून्य बायको कशी ओळखणार? " गुणी गुणं वेत्ति न वेत्ति निर्गुणः ". म्हणून संसार सुखजनक होण्यास स्त्रिया सुशिक्षित असणें अवश्य आहे.

मागें सांगितल्याप्रमाणें विवाहोत्तर—विवाहापूर्वी नव्हे—स्त्रीपुरुषां-मध्यें अनन्य प्रेमभाव उत्पन्न झाला पाहिजे. ह्याकरतां प्रथम पुरुषानें पुरुषत्व कमावलें पाहिजे. आपण पशुयोनींतून मनुष्ययोनींत आलों आहों; तेव्हां पशुकार्य करण्याचें सामर्थ्य आपल्या अंगांत असलें पाहिजे.

आणि हें सामर्थ्य असेल तरच मनुष्यत्व आपसांस प्राप्त करून घेतां येईल. अलीकडे तरुणांना त्यांच्या नटवेपणावरून व चारगट आचरणावरून वायका होण्याची हौस वाटत आहे असा भास होतो. पण हें संसारसुखाला फार घातक होतें. सिंहाची शक्ति आपल्या अंगांत आणण्याचा हव्यास प्रत्येक तरुणानें वाळगला पाहिजे. शास्त्राच्या भाषेंत बोलावयाचें म्हणजे प्रत्येक पुरुष प्रथम रतिसमरशूर असला पाहिजे. पति रतिशूर, गुणी व सज्जन असा असून स्त्री सहजसुंदर, पतिवश, बुद्धिमती व संसारदक्ष अशी असली तर त्या भाग्यशाली जोडप्यास संसारसुख लाधण्यास अडचण पडणार नाहीं. " प्रजां प्रजनयावहै संप्रियौ रोचिष्णू सुमनस्यमानौ जीवेव शरदः शतम् " (आपण प्रजा उत्पन्न करूं, एकमेकांवर प्रीति करूं, आपण एकमेकांस आवडतीं होऊं, आपलीं मनें परास्परांविषयीं निष्कलंक राहतील असें आपण करूं आणि अशा रीतीनें शंभर वर्षें जगूं,) हा जो मंत्र विवाहाच्या वेळेस म्हटला जातो त्यांतलें इंगित प्रत्येकानें मनांत बाळगलें पाहिजे. विवाह होतांच आपण प्रेमानें वागूं असा निर्धार वधूवरांनीं केला पाहिजे. विवाह ही वधूवरांची निर्गांठ आहे, निसरगांठ नाहीं हें कोणीहि विसरतां कामा नये. विवाहबंधनें ताडकन तोडतां येतात असें झालें तर प्रेमाचा विस्तार होण्यास योग्य मनोभूमि मिळणार नाहीं. " न निष्क्रयविसर्गाभ्यां भर्तुर्भार्या विमुच्यते ". एकदां घडलेला संबंध मोडतां येत नाहीं असा मनूनें निर्बंध घातला आहे तो विचारपूर्वक घातलेला दिसतो. हा मानसशास्त्राचा, मनुष्यस्वभावाचा, विषय आहे. झालेला विवाह मोडतां येण्यासारखा असला म्हणजे परस्परांना आवडतीं होण्याचा प्रयत्न कोणाकडूनच कसून होत नाहीं. ह्यावरून असें दिसून येतें कीं, विवाहसुखाला आवश्यक अशी पहिली गोष्ट म्हणजे विवाहग्रंथि अभेद्य पाहिजे. अलीकडे लग्न हें कराराच्या स्वरूपाचें आहे असें मानण्याकडे लोकमत झुकत चाललें आहे. नवीन संस्कृतींतील हें

एक मुख्य तत्त्व आहे. पूर्वीं युरप खंडांतसुद्धां विवाह हा संस्कार आहे, अशीच भावना होती. रशियांतील विवाहपद्धतीचें वर्णन तर आमच्या पद्धतीशीं पुष्कळ हिश्शांनीं जुळतें.

"I should also add that marriage in Russia is entirely indissoluble, that no kind of relationship within the fifth degree is permitted......that a priest can never marry a second time, so that a priest's wife is as much cherished as any other thing that cannot be replaced." ( A Residence on the Shores of the Baltic, Vol. III, 84. )

विवाहनिवृत्तीचा हक्क स्त्रियांना न दिल्यानें कांहीं स्त्रियांना आयुष्य कंठणें असह्य होईल हें नाकबूल करणें शक्य नाहीं. पण तसा हक्क दिल्यानें बहुतेक स्त्री-पुरुष असंतुष्ट राहतील त्याची वाट काय ? मनोविकार परिस्थितिप्रमाणें बनत असतात. लग्नविमोचनाचा हक्क स्त्रियांस दिल्यानें त्यांना स्वातंत्र्य अधिक मिळतें ह्यांत संदेह नाहीं, पण मग कुटुंबस्थैर्य राखतां येणें शक्य नाहीं. ह्यावर तुमच्या कुटुंबाकरतां आमचा बळी कां घेता, असा सवाल स्त्रियांकडून येण्याचा संभव आहे. त्याचें उत्तर हेंच कीं, तुमच्या ऐवजीं कुटुंबाचा बळी दिला तरी पण तुम्हांला सुख लाभत नाहीं तें नाहींच. मग कुटुंबाला लाथ मारून राष्ट्रवैकल्याला कारणीभूत तरी कां होता ? स्त्रियांना पुरुषांनीं परतंत्र केलें हा आरोप वृथाभिमानाचा आहे. परमेश्वरानेंच स्त्रियांचें स्वातंत्र्य हिसकावून घेतलें आहे, ही गोष्ट दृष्टिआड करून आपली निष्कारण फसवणूक कां करून घ्यावी ? एकंदरींत वैवाहिक सुखाला विवाहसंबंध कायमचाच पाहिजे. नाहींतर लग्नमंडप घरासमोर कायमचे उभारून ठेवावे लागतील. "उत्पादनमपत्यस्य जातस्य परिपालनं" ह्याकरतां आजन्म एकच कुटुंब करून राहण्यांत स्त्रियांचें कल्याण आहे.

आतां वैवाहिक सुखोत्पादनाला सुशिक्षित स्त्री अपरिहार्य असल्यामुळें लग्नाचा काल वाढविणें रास्त आहे. आठ वर्षांच्या मुलीचें लग्न करणें तत्वतः कितीहि शहाणपणाचें असलें तरी आजच्या समाजाला पूर्व-स्थितीवर जाणें शक्य नाहीं. करतां आठाच्या जागीं अठराची मर्यादा घालणें क्रमप्राप्त आहे. ह्या वयापर्यंत वर सांगितल्याप्रमाणें मुलीचें शिक्षण पूर्ण करतां आलें पाहिजे. मुलाचेंहि तेविसाव्या वर्षापर्यंत लग्न होऊं नये ही वयोमर्यादा शिक्षणाकरतां अवश्य आहे.

गृहव्यवस्थेचीं सर्व अंगें स्त्रियांनीं आपल्या शिरावर घ्यावीं हें उचित होय व पुरुषांनींहि त्यांच्यावर तीं सोंपविणें जरूर आहे. मनूनेंसुद्धां असाच पोक्त सल्ला दिला आहे. तो म्हणतो " अर्थस्य संग्रहे चैनां व्यये चैव नियोजत् । शौचे धर्मेऽन्नपक्त्यां च परिणाह्यस्य वेक्षणे " पतीनें मिळविलेला पैसा राखणें; खर्च करणें; गृह स्वच्छ ठेवणें; धार्मिक कृत्यांविषयीं दक्षता बाळगणें; स्वयंपाक करणें आणि घरांतील चीजवस्तूंवर लक्ष्य ठेवणें, हीं कामें पुरुषाच्या मदतीशिवाय स्त्रियांनीं केलीं पाहिजेत. शिवाय मुलांच्या प्राथमिक शिक्षणाचा बोजाहि सर्वस्वीं स्त्रियांनींच उचलला पाहिजे. ह्यांपैकीं एकहि काम सध्यां स्त्रियांकडून केलें जात नाहीं. " पत्नी-मूलं गृहं पुंसां " ( दक्षस्मृति ), गृह हें पत्नीमूलक आहे, हें लक्षांत ठेवावें. पत्नी ही गृहस्वामिनी होय. पण आपल्या घरांत काय आहे हें एका तरी बायकोला हल्लीं सांगतां येईल काय ? घरांतील कामचलाऊ व शिलकी सामानाची यादी एखाद्या स्त्रीनें करून ठेवल्याचें कोणास माहीत आहे काय ? एकातरी कुटुंबामध्यें बजेट करण्याची रीत आढळेल काय ? संसार चालविणें म्हणजे छोटेसें राज्य चालविणें होय. पण ह्याची कल्पनाहि हल्लींच्या स्त्रियांना नाहीं. घरांत कोठेंहि सुव्यवस्थितपणा दिसावयाचा नाहीं. उलट सर्णीं धुगऱ्या व अवादिशीं पुऱ्या असाच अनुभव प्रायः सर्वत्र येण्यासारखा आहे.

## विवाहसुख.

शेवटीं, पत्नीनें पतिवश झाल्याविना विवाहसुख उभयतांपैकीं कोणालाहि मिळणार नाहीं. पतिवत्नी स्त्रीनें देशहिताच्या मिषानें जगभर सैरावैरा हिंडत सुटणें हा पत्नीधर्म कोणत्या शास्त्रांत सांगितला आहे ? क्षणभर शास्त्राची कोणी परवा करणार नाहीं म्हणून तेंहि सोडून देऊं. आणि केवळ उपयुक्ततेच्या दृष्टीनें विचार करूं. घराच्या बाहेरील गोष्टींत अशी स्त्री पडली कीं, कुटुंबाला ती आंचवलीच. म्हणजे एका कुटुंबाचा विघात झालाच. पति पत्नीविरहित राहणार; मुलांच्या शिक्षणाची आबाळ होणार. बरें कुटुंबविघात करणारी ही स्त्री देशहित किती करणार ? त्याकरतां पुरुष नाहींत काय ? कुटुंबांत राहून कौटुंबिक जबाबदारी पूर्णपणें संभाळूनच साधेल तें देशहित करणें हें स्त्रियांचें कर्तव्य. प्रसंगांतीं स्त्रियांनीं पुढें येऊन पुरुषी कामें केल्यास तें युक्तच होईल. पूर्वीच्या काळीं झांशीच्या लक्ष्मीबाईनीं नाहीं कां तरवार पाजळून पुरुषांकडून होईना तो पराक्रम करून दाखविला ? पण प्रसंगाभावीं, पुरुषाचें उच्चाटण करून पुरुषी कामें करूं लागल्यानें सामुदायिक कल्याणांत भर पडली असें म्हणतां येणार नाहीं. उलट पतीकडे दुर्लक्ष्य केल्याचें पातक मात्र पदरीं पडणार. पूर्वी पतीलाच स्त्रिया तीर्थ म्हणून मानीत. तर आतां तरी पतीलाच देश म्हणून त्यांनीं कां मानूं नये ? पतीच्या द्वारें देशहित करण्याला काय थोडा अवसर आहे ? पण " नवनवगुणरागी प्रायशः सर्वलोकः "

---

11 JAN 1994

# शारीरिक ऱ्हास.

समाज करून राहण्याचा हेतु इतकाच कीं, प्रत्येक व्यक्तीची बौद्धिक आणि सात्त्विक उन्नति शक्य तितकी पूर्णांशानें व्हावी. समाजाशिवाय अशी उन्नति होणें शक्य नाहीं; आणि हेंच कार्य सिद्धीस नेण्यास समाजांतर्गत कुटुंबसंस्था उत्कृष्ट प्रकारानें सहाय्य करते. आईबापाचे रोग दोन पिढ्या सोडून पुढल्या संततींतहि प्रादुर्भूत होतात. ही गोष्ट शास्त्रसिद्ध व अनुभवसिद्ध आहे. " यदेनसो मातृकृताच्छेषे पितृकृताच्च यत् ": आई बापांच्या दुराचणामुळें तुला जी व्यथा झाली आहे, (ती मी दूर करतो, ) असा एक वैदिक मंत्र आहे. आईबापाचे रोग जर पुढील पिढीला बाधा करूं शकतात तर मातापितरांची निरामयता भावी संततीचें हित कां करूं शकणार नाहीं? तेव्हां ह्या आनुवंशिक संस्काराचा लाभ संततीस मिळवून देण्यास कुटुंबसंस्थेवांचून दुसरें उत्तम साधन नाहीं. पण कुटुंबसंस्थेचें मूल दृढबद्ध होण्यास विवाहसातत्य आवश्यक आहे. तथापि विवाहसुखाशिवाय विवाहसातत्याची किंमत नाहीं; आणि विवाहसुखावाप्ति पतिपत्नींचा परस्परांविषयीं आदरभाव असेल तरच शक्य आहे. भार्या ही सर्वस्वी पतिवश असावी, पतिसेवा हाच तिचा धर्म, हें जसें स्मृतिकारांनीं सांगितलें आहे तसेंच पतीनेंहि आपल्या भार्येशीं आदरपूर्वक वागावें असा निर्बंध घालून दिला आहे. " शोचन्ति जामयो यत्र विनश्यत्याशु तत्कुलम् " (मनु): जेथें स्त्रियांना दुःख होतें तें कुल तत्काल नष्ट होतें. व्यास म्हणतात, सदाचारी भार्येचा त्याग करणारा पति धर्मभ्रष्ट होतो (सद्वृत्तचारिणीं पत्नीं त्यक्त्वा पतति धर्मतः). कात्यायन आणि दक्ष यांच्या मतें पत्नीची अवहेलना करणारा पुरुष अन्यजन्मीं स्त्रीच होतो. स्त्रियांच्या जन्मागत पारतंत्र्यामुळें त्यांना सन्मा-

... वाचनालय, ...


नपूर्वक वागविण्याची जबाबदारी पुरुषांवर अधिकच पडते. म्हणून याज्ञवल्क्यानें घरांतील प्रत्येक माणसाची स्त्रियांसंबंधानें पूज्यबुद्धि असावी, असें सांगितलें आहे. " भर्तृभ्रातृपितृज्ञातिश्वश्रूश्वशुरदेवरैः । बन्धुभिश्च स्त्रियः पूज्या भूषणाच्छादनाशनैः ॥ " येथें याज्ञवल्क्यांनीं पूज्य शब्द वापरला आहे. स्त्रिया अंलकारांनीं आनंदित कराव्या असें म्हटलें नाहीं हें ध्यानांत ठेवावें. स्त्रियांनीं पुरुषांचा मान ठेवावा व पुरुषांनीं स्त्रियांचा ठेवावा. त्यामध्यें बलाबलाचा विचार नाहीं, असें हें तत्वज्ञान आहे. व ह्या तत्वज्ञानानेंच समाजाचें खरें कल्याण होतें. निदान सुख मिळतें खास. हिंदुमुसलमानांच्या लढ्यांत, मुसलमानांनीं हिंदूंना चांगलें म्हणावें आणि हिंदूंनीं मुसलमानांस सावरून घ्यावें ही वागणूकच दोनहि समाजांत सलोखा व प्रेमभाव राखण्याचें उत्तम साधन होय. परंतु गांधींच्या ह्या उदात्त तत्वज्ञानाची जाणीव हिंदूंनाहि नाहीं, तशीच मुसलमानांनाहि नाहीं. तुमचा ओढा मुसलमानांकडे आहे म्हणून हिंदू गांधींची निर्भर्त्सना करणार, तर गांधींच्या सर्टिफिकीटानें मुसलमान बेहोष शेफारून जाणार. बिचाऱ्या गांधींच्या हेतूंचें आकलन करण्याचें सामर्थ्य कोणामध्येंच नाहीं. ' लोकोत्तराणां चेतांसि को हि विज्ञातुमर्हति.' दोन लहान मुलांचें भांडण झालें तर त्यांच्या आया—दोनहि सुशील असतील तर—आपआपल्या मुलाला रागें भरतील, आपल्या मुलाचा कैवार घेऊन दुसऱ्या मुलाला शिव्याशाप देणार नाहींत. मग अन्याय कोणाचाहि असो. सारांश एकानें दुसऱ्याच्या हक्कांचें संरक्षण करावें हीच सर्वोत्कृष्ट नीति होय. कोणत्याहि उन्नीत समाजांत कोणीहि आपल्या हक्कांचें परिपालन करण्याच्या भानगडींत पडत नाहीं. तो दुसऱ्याच्या हक्कांबद्दलच सदैव जागृत असतो. हाच परमसुखाचा परममार्ग आहे. पण हा धडा विद्यमान कालीं शिकवणार कोण आणि गिरवणार कोण ? " शत्रोरपि गुणा वाच्याः" शत्रूचे सुद्धां गुण गावे, अशा मताच्या माण-

साची योग्यता ओळखणारा शत्रु हुडकला असतांहि सध्यां आढळणार नाहीं.

स्त्रियांच्या कर्तृत्वाला आमच्या समाजांत वाव नाहीं असा एक आरोप वारंवार केलेला आढळतो. व नुसत्या शब्दांनीं झुकणारे अप्रबुद्ध लोक समाजांत बरेच असल्यामुळें ते स्त्रियांना "हक्क" देण्यास तयार होतात; व अशा रीतीनें आपल्या उदार मताचें प्रदर्शन करण्याची संधि ते वायां दवडीत नाहींत. आतां कर्तृत्व हें शारीरिक, मानसिक अथवा नैतिक, तसेंच बौद्धिक असें त्रिविध असूं शकतें. आतां गृहाला चिकटून स्त्रियांना नैतिक उन्नति करून घेण्यास व आदर्शभूत असें नैतिक आचरण ठेवण्यास अवसर नाहीं असें कोण म्हणेल? शारीरिक उन्नति करून घेण्याच्या कामीं तरी स्त्रियांच्या आड कोण येणार? आजच आमच्या महाराष्ट्र स्त्रियांची अवस्था चिंताजनक झाली आहे. एक मूल झालें नाहीं तोंच यमदूताचा पाश त्यांच्या मानेभोंवतीं बसतो. क्षयरोगादि विकारांना बळी पडणाऱ्या तरुण बालिकांची संख्या कोणाचेंहि हृदय विदारून टाकील. तारुण्याचा तजेला कोणत्याहि मुलीच्या चेहऱ्यावर दिसत नाहीं. नवतीच्या बहराची उणीव भपकेबाज वस्त्रांनीं भरून काढावी लागते. हिमकालांतील शुष्कलतांप्रमाणें रसहीन असलेल्या ह्या बालिका गृहिणीधूं झेपण्यास अपात्र होतात हें स्वाभाविकच आहे. जिवंत कशा राहतील हीच जेथें काळजी, तेथें गृहिणी कशा निपजतील हा विचार अप्रस्तुतच समजला पाहिजे. आरोग्य ही संपत्ति आहे. माणसानें काम करणें म्हणजे पैसे मिळवणें होय. पण रोगी माणसाच्या हातून काम कसें व्हावें? "मृतकल्पा हि रोगिणः": रोगी म्हणजे मृत्यूच्या मार्गाला लागलेलीं माणसें. अशी कल्पना करा कीं, मुंबई इलाख्यांत दररोज सरासरीनें दहा हजार माणसें आजारी असतात. आतां हीं माणसें आजारी नसती तर ह्या दहा हजार माणसांच्या श्रमाचें मोल किती झालें असतें ह्याची कल्पना सहज होण्यासारखी आहे. अर्थात् आजार म्हणजे द्रव्यहानि

होय, एवढेंच नव्हे तर आजारी मनुष्य हा हिणकस (depreciated) नाण्याप्रमाणेंच होय. कारण त्याचा आजार जाण्याकरतां आणखी पैसे ओतावे लागतात. एवढ्या मोठ्या प्रचंड शक्तीचा प्रत्यहीं व्यय होऊं देणें हें राष्ट्रीय दृष्ट्या अत्यंत अनिष्ट होय. जन्ममृत्यूच्या संख्येबरोबर आजाऱ्यांची संख्या लोकांना कळण्याचें साधन असतें तर बरें झालें असतें. वर्षांतून दोन तीनदां आजाऱ्यांची गणती सरकारनें कां करूं नये? मुंबई इलाख्यांत पन्नास हजार खेडीं आहेत असें म्हणतात. तेव्हां दरदिनीं पन्नास हजार माणसांकडून होणाऱ्या कामाला आपण मुकतों. एका खेड्यांत एकच मनुष्य आजारी असतो असें एथें धरलें आहे. हें प्रमाण अगदींच कमी आहे ह्यांत शंका नाहीं. तरी सुद्धां एका माणसाची रोजची उत्पादनशक्ति चार आणे किंमतीची आहे असें मानलें असतां फक्त मुंबई इलाख्याचें रोजचें साडेबारा हजारांचें नुकसान होत आहे. असें अनुमान करण्यास प्रत्यवाय नाहीं. ह्या आर्थिक हानीचें भयंकर स्वरूप बघून तरी आजारी न पडण्याचा प्रयत्न करणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. अलीकडे मुलांमुलींचा शारीरिक ऱ्हास झपाट्यानें होत आहे. निःसत्व, खुजी, मरणकळा आलेलीं अशीं माणसें कोणता पुरुषार्थ साधणार? राजकीयदृष्ट्या सुद्धां हें आमच्यांत मोठेंच वैगुण्य आहे. आह्मां बुटबैंगणांचें वजनच साहेबांवर पडत नाहीं. आमच्या शब्दाला साहेबांनीं वचकावें असें वाटत असेल तर त्या शब्दाचें अधिष्ठानहि दहशत बसेल असेंच पाहिजे. उंच बांधा, धिप्पाड, पीळदार व कणखर शरीर, बळकट स्नायु, उमदा चेहरा, आणि बुद्धिमत्ता–व निग्रहदर्शक मुद्रा अशा साधनांनीं युक्त असलेलीं माणसेंच आपली छाप दुसऱ्यावर बसवूं शकतात. म्हणून उत्तम शरीर हें स्वराज्यप्राप्तीचें प्रमुख साधन मानलें पाहिजे. तात्पर्य, शब्दाची किंमत शरीरावर असते म्हणून शरीराची हेळसांड करणें मूर्खपणाचें आहे. स्वराज्य असतें तर आमच्या शारीरिक

ऱ्हासाच्या कारणांचा विचार करण्यास कमिशन बसलें असतें. 'विकृतिः प्रकृतिः शरीरिणाम्' असा सध्यां नियमच होऊन बसला आहे.

दुखण्याची जबाबदारी आपल्यावर नाहीं अशीच प्रायः बहुतेकांची समजूत असते. ती एक दैवी आपत्ति आहे असें आपण मानतों. पण हा चुकीचा समज आहे. दुखणें म्हणजे आपल्या प्रमादांचा परिणाम होय. तेव्हां दुखणें आलें असतां आपणांस त्याची लाज वाटली पाहिजे. दुसऱ्याला आपल्या दुखण्याची कहाणी सांगतांना आपण आपल्या पापांचीच वस्तुतः कहाणी सांगत असतों. परंतु ही जाणीव पुष्कळांस नसते. सांसर्गिक रोग वगळले तर आपलें कोठें तरी चुकल्याशिवाय दुखणें येत नाहीं आणि सांसर्गिक रोगाचें वीं सुद्धां आपण पोंखरून ठेवलेल्या शरीरांतच प्रवेश करूं शकतें. करितां दुखण्याची सर्व जबाबदारी आपणांवर आहे हें विसरतां कामा नये. विषयातिसेवन, अव्यवस्थित खाणेंपिणें, पौष्टिक अन्नाची कमतरता, व्यायामाचा अभाव, पोटाची चिंता, गुलामगिरीची नामुष्की, इत्यादि अनेक कारणांनीं स्त्रीपुरुषांची शारीरिक अवनति झाली आहे. गृहस्थाश्रम्यांकडून ब्रह्मचर्य पाळलें जात नाहीं. स्त्रीसंग हा प्रजोत्पादनाकरतां आहे, तेव्हां प्रजोत्पादनाचा संभव नसतां स्त्रीसमागम करणें म्हणजे व्यभिचार होय. तसेंच क्षुधा नसतांना वाटेल त्या वेळीं व वाटेल तेथें खाणें ह्यानेंहि शरिरांत विकार उत्पन्न होतात. आहारासंबंधानें अत्यंत नियमितपणा ठेवावा लागतो. पण हल्लींच्या पिढीला कोणत्याहि गोष्टींत नियमितपणानें वागणें माहितच नाहीं. मध्यम वर्गांतील स्त्रिया तर जगतात कशा ह्याचेंच आश्चर्य वाटण्यासारखें आहे. स्वयंपाकघरांतून ओटीवर येण्याचा सुद्धां प्रसंग साऱ्या जन्मांत येणें कठीण. त्यामुळें स्त्रियांना शुद्ध मोकळी हवा मिळणें म्हणजे गरीबाला विमानांत वसण्यास मिळण्याइतकें दुर्घट कर्म झालें आहे. घरांतलें काम करण्यांत कमीपणा वाटूं लागला; व्रतादिकांवरचा विश्वास उडाला; आणि सहल आदि

नवीन आचार स्वीकारण्याची धमक अंगांत आली नाहीं. बरें, मन हर्षभरित राहील म्हणावें तर शिक्षणाच्या अभावीं कोणतेंहि साधन उपलब्ध नाहीं. अशा स्थितींत कुरठलेल्या स्त्रियाच सर्वत्र दिसल्या तर त्यांत नवल तें काय ?

# आर्थिक स्पर्धा.

स्त्रियांच्या आरोग्याकडे लक्ष्य द्यावयास पाहिजे तितकें दिलें जात नाहीं. सुशिक्षित स्त्रिया परीक्षा पास होण्याच्या चिंतेनें मरगळतात, तर अक्षरहीन स्त्रिया आपल्याच मूर्खपणामुळें यमाधीन होतात. ह्यांना स्वतः अक्कल नाहीं, पथ्यापथ्य हितानहित समजण्याची कुवत नाहीं, आणि दुसऱ्याचें ऐकण्याइतका अंगीं नरमपणा नाहीं. सध्यां आमचा समाज अराजक स्थितींत आहे. घरांत काय किंवा घराच्या बाहेर काय, कोणाच्याहिबद्दल, मग तो कितीहि विद्वान असो, कितीहि अनुभवी असो, कितीहि सच्छील असो, कोणालाहि आदर वाटत नाहीं. ह्याचा परिणाम म्हणजे प्रत्येकाचें मनसोक्त वर्तन होय. ह्या दृष्टीनें विचार करतां सध्यां शिक्षणाचा प्रसार न होतां संकोचच झाला आहे असें म्हणावें लागतें. शाळेच्या बाहेर शिक्षण मिळविण्याचे आजपर्यंत जे असंख्य मार्ग होते ते सर्व बंद झाले. पूज्यबुद्धि अनुकरणशीलता उत्पन्न करते, म्हणून विद्यायुतांच्या विद्येचा लाभ अविद्यांना सहजासहजीं मिळतो. आणि अशा रीतीनें अशिक्षितांवरहि विद्यार्जनाच्या चकारींतून गेल्यावांचून विद्येचे संस्कार घडत असतात. ह्या लाभाला आजचा समाज मुकला आहे. दुसऱ्याच्या ज्ञानाच्या अनुभवाचा फायदा घेण्याची बुद्धि तरुण मुलांमुलींना होत नाहीं. त्यामुळें अपरंपार अनर्थ समाजावर ओढवत आहेत. त्यांपैकीं शारीरिक ऱ्हास हा एक होय. शरीरसामर्थ्य वाढवावें कसें हें जसें शास्त्र आहे तसेंच शरीरहानि कशी होऊं देऊं नये हें शास्त्र आहे. पण इकडे कोणाचें लक्ष्यच नाहीं. व्यायामादि उपायांनीं शरीरबल वाढविलें तरी पण अनाचारांनीं शरीरहानीचा ओघ उतरवट प्रणालिकें-

तून जोरानें जात असेल तर त्याचें पर्यवसान कशांत होणार हें न सांगतांहि समजण्यासारखें आहे. प्रथम शरीरसंरक्षण आणि नंतर शरीरसंवर्धन. हौदांत एका तोटीनें पाणी घ्यावें, पण पाणी घालवण्याकरतां दोन तोट्या लावल्या तर हौद भरेल कसा? तसाच हा प्रकार आहे. व्यायाम घेणारे, दिसण्यांत सशक्त असणारे तरुण हल्लीं अकालीं मरणांगणावर जातात ह्याच्या कारणांचा सूक्ष्म विचार करतां आयापेक्षां व्यय अधिक होतो अशीच खात्री होईल. 'विषय हे इंद्रियांचें तेज हरण करतात' ( इंन्द्रियाणां जरयन्ति तेजः ) हें उपनिषद्वाक्य अर्थपूर्ण आहे. तेज ह्यालाच इंग्रजींत Vitality म्हणतात. हें तेज जर शरीरांत नसलें तर मनुष्य बाह्यतः पुष्ट दिसला तरी कोणत्या रोगाला केव्हां बळी पडेल ह्याचा नियम नाहीं. म्हणून विषयासक्तीनें स्त्रीपुरुषांनीं आपल्या तेजाची हानि करूं नये. सुतासाठीं मणी फोडणें केव्हांहि शहाणपणाचें होणार नाहीं.

असो. स्त्रियांना आजमित्तीस स्वच्छ हवेची आणि व्यायामाची जरूरी फार आहे. पांढरपेशांच्या बायकांकरतां व्यायामाची कांहींहि सोय कोठें केलेली नाहीं. व तिकडे समाजाचें अद्यापि लक्ष्यहि गेलें नाहीं. खेड्यापासून तों शहरापर्यंत प्रत्येक ठिकाणीं पोहण्याकरतां जलाशय व क्रीडाविनोदादिकांकरतां प्रशस्त उद्यान, इतकी योजना झालीच पाहिजे. गरीब स्थितींतल्या स्त्रियांना कामें करावीं लागतातच; पण मुबलक शुद्ध हवा त्यांस मिळत नाहीं. प्रत्येक स्त्रीपुरुषाला पोहतां आलेंच पाहिजे. स्त्रियांना पोहण्यानें एक कला तर अवगत होतेंच; पण शिवाय उघड्या हवेंत व्यायाम घेतां येतो. पुण्यासारख्या ठिकाणीं सुद्धां स्त्रियांकरतां स्वतंत्र उद्यान नाहीं, अथवा पोहण्याची सोय नाहीं, ह्यावरून स्वतंत्र विचारांचें बीं अद्यापि आमच्याकडे रुजत नाहीं, असेंच सिद्ध होतें. रामायणभारतकालीं गांवोगांवीं अशीं उद्यानें असून स्त्रिया त्यांचा उपयोगहि करीत. " श्रमो हि सर्वो विफलः सुखैषिणां विना विहारोपवनानि निश्चितम् ".

जागेचें आणि मनुष्यसंख्येचें प्रमाण कायद्यानें ठरलें नसल्यामुळें नाकपुडीएवढ्या जागेंत मानवी दसकडीला निर्वाह करावा लागणें हें ह्या औद्योगिक युगांत अपरिहार्य तर खरेंच, पण आरोग्याला अत्यंत अपायकारक आहे. त्यांतहि ही रहाणी फारच अपायकारक होते. कोंदट हवेंत जन्म कंठणाऱ्या स्त्रिया प्रसन्नमुख कशा राहणार? शहरापेक्षां खेडेगांवची स्थिति कांहीं बरी. पण खेड्यांतहि अलीकडे स्त्रियांना मोकळी हवा मिळत नाहीं. घराच्या पुढील अंगण पुरुषांकरितां व मागील स्त्रियांकरतां अशी जुनी वहिवाट, पण दारिद्र्यामुळें अंगनांच्या अंगणावर सुद्धां पुरुषांचें अतिक्रमण होऊं लागलें. तात्पर्य, स्त्रियांच्या शरीरसंपत्तीचा ऱ्हास होऊं न देणें हें अत्यंत आवश्यक आहे. परंतु ह्याबद्दल दुमत असण्याचा संभवच नाहीं.

स्त्रियांच्या शारीरिक व नैतिक विकसनाला पुरा वाव आहे तसा बौद्धिक उन्नतीला नाहीं काय? वस्तुतः बौद्धिक उन्नतीचें प्रस्थ ह्या व्यापारी युगांत फाजील माजलें आहे. आत्मोन्नतीला अथवा समाजस्थैर्याला मानसिक किंवा नैतिक विकसनाची जितकी आवश्यकता आहे तितकी बौद्धिक वाढीची नाहीं. बुद्धिमेधा (Intellect) हें इंद्रिय शारीरिक सुखांकरतां परमेश्वरानें मनुष्यास दिलें आहे. बुद्धीच्या योगानें आपणांस पोट भरतां येतें इतकेंच. निर्बुद्ध अथवा असंस्कृत बुद्धीचीं माणसें सुशील असूं शकतात. अर्थात् बुद्धि हें साधन आहे, साध्य नाहीं. पण साधनांचेंच सध्यां स्तोम माजवण्यांत येत आहे. साध्याविषयीं घातकी बेफिकिरी दिसण्यांत येते. बुद्धीचा उपयोग आपला व्यवहार आपणांस कुशलतेनें करतां यावा हा आहे. आतां स्त्रियांचें नियोजित कार्य जर शिशुसंवर्धन आणि गृहव्यवस्था हें आहे, तर त्यांनीं एतद्विषयक नैपुण्य कमावण्याचा अट्टाहास धरला पाहिजे. पण सध्यां विपरीत भावना स्त्रियांमध्यें उत्पन्न झाली आहे. कोणी बी. ए. होतील; कोणी एम्. ए. होतील; कोणी एल. एल. बी. होतील. शिक्षणाकरतां सध्यां मुली शिकत नाहींत; मग

कृपया पुस्तके जपून वापरा

# आर्थिक स्पर्धा.

उपयुक्त शिक्षणाचा विचार तर बाजूसच राहिला. मुलांपेक्षां आम्ही सूतभरहि कमी नाहीं हें दाखविण्याच्या ईर्ष्येनेंच त्या शिकत असतात. प्रो. कर्वे यांची उपयुक्त संस्था सोडून पुरुषी कालेजांत मुलींची जी रेटारेटी होत आहे ह्यावरून वरील अनुमान दृढ होतें. ह्या बी. ए. झालेल्या मुली आपल्या नवऱ्यांबरोबर शेक्सपीअरच्या गुणावगुणांची चर्चाच करीत बसणार काय? ह्याच शिक्षणाची कां समाजाला आज जरूरी आहे? पुरुषांचा मार्ग वेगळा, स्त्रियांचा वेगळा. मग दोघांची एकाच रुळावरून गाडी नेण्यांत कोणतें हित आपण साधतों? पुरुषी कालेजांत गर्दी करणाऱ्या मुलींच्या सुशिक्षित पित्यांच्या बुद्धिमांद्याचें आणखी बलवत्तर प्रमाण तें काय पाहिजे? 'गतानुगतिको लोकः न लोकः पारमार्थिकः' हें त्रिकालाबाधित सत्य दिसतें. कित्येक लोक आपल्या मुलीस श्रीमंत स्थळ मिळावें एवढ्याच उद्देशानें एम ए. करतात. जणूं काय श्रीमंत अगृही आणि संतानहीनच असावयाचे.

युरोप व अमेरिका खंडांत स्त्री ही पुरुषांप्रमाणें स्वतंत्र आहे अशा कल्पनेनें ती पुरुषाबरोबर आर्थिक स्पर्धा करीत असते. व ह्या पैसे मिळविण्याच्या झटापटींत यश येण्याकरतांच पुरुषाप्रमाणेंच ती बौद्धिक शिक्षणाच्या मार्गे लागतें. आतां विवाह व संसार हेंच जर स्त्रियांचें अंतिम साध्य, आणि विवाहोत्तर स्त्रियांचा आर्थिक पृथक्पणाच जर रहात नाहीं, तर स्त्रियांनीं ह्या उदरंभरी विद्येचा हव्यास तरी कां धरावा? विवाहसमयीं स्त्रीच्या जीवनाची हमी पुरुष घेतोच. विवाह होतांच पोट कसें भरेल ह्या चिंतेतून ती कायमची सुटते. असें असतां नोकरी करून पोट भरण्याचे ढंग स्त्रियांना कां सुचावेत हें कोडें सुटत नाहीं. आमच्या स्त्रियांचीहि ह्या मोहानें फसगत होणार आहे. स्त्रियांना प्रथम नोकऱ्या द्या; ह्या गरभार राहिल्या म्हणजे त्यांस काम न करतां पगार द्या; प्रसूतीनंतर त्यांना फुकट पोसा; असें एक ना दोन किती कायदे करावे लागणार?

मग त्याच्यापेक्षां पुरुषांनाच दुप्पट पगार कां देऊं नये? आपलें घर सोडून बायकोला दिवसभर बाहेर काम करावयाला लावणें ही कोणत्या जातीची संस्कृति? पुरुष बेकार म्हणून उपाशी मरतात आणि स्त्रियांना काम मिळतें, असा विलक्षण देखावा सध्यां दिसत आहे. कोणत्याहि कामाला पुरुष बेसुमार मिळत असतां स्त्रियांनीं तीं कामें करण्यास पुढें येण्याचें वस्तुतः कारणच नाहीं. पण अशा अस्वाभाविक कृत्यांनींच बेकारीचा प्रश्न उत्पन्न झाला आहे. पुरुषांनीं करावयाच्या कामांत स्त्रियांचा प्रवेश जर असाच चालू राहील तर बेकारीचा प्रश्न कधींच सुटणार नाहीं. स्त्रियांना सरकारी, निमसरकारी वा कंपनीची नोकरी मिळतां कामा नये, अशा धर्तीचा कायदा केला तरी समाजाचें अनहित न होतां कल्याणच होईल. घर संभाळून घरांतल्या घरांत स्त्रियांना करतां येतील असे शेकडों धंदे आहेत. स्वतंत्र धंदे करण्याचा उद्देशच मुळीं असा कीं, पुरुषांवर आपणांस अवलंबून राहणें भाग पडूं नये. जगांत स्त्रीसाम्राज्य स्थापावें असें त्यांस वाटतें. सर्व आपत्तीचें मूळ ह्यांतच आहे. स्त्रियांना शिक्षण नको असें कोणीच म्हणत नाहीं. पण ज्या शिक्षणाच्या योगानें त्यांना घरांतून बाहेर पाय काढावा लागेल अशा प्रकारचें शिक्षण नको इतकेंच. बौद्धिक शिक्षण बरेंचसें पोट भरण्याकरितां असतें. तें स्त्रियांना देऊन तरी काय करावयाचें? एकादी स्त्री उत्तम वकील होण्यासारखी असली, निसर्गाची देणगी तिला तशा प्रकारची असली आणि असें असून सुद्धां समाज तिला वकील होऊं देत नाहीं, तरी त्यांत बिघडलें कोठें? जगाचें तिच्या वकिलीवांचून एवढें कोठें अडून राहणार आहे? तें काम करण्यास पुरुषांची गर्दी काय कमी आहे? म्हणून स्त्रियांच्या बुद्धीचा भरपूर उपयोग समाजानें करून घेण्याचें नाकारिलें तरी त्यांत सामुदायिक नुकसान काडीचेंहि नाहीं. स्त्रियांच्या बुद्धीचा व्यय होत आहे ही हकाटी असमंजसपणाची आहे. सुमाता व सुगृहिणी कर-

णारेंच शिक्षण आज आमच्या स्त्रियांस हवें आहे. हिंदुस्थानसारख्या विपन्न देशाला तरी अशाच स्त्रियांची अपेक्षा आहे. केवळ ग्रॅजुएट स्त्रियांची नाहीं.

# सन १९४५ ची स्त्री.

नैतिक उन्नति हें मनुष्याचें ध्येय. देहपुष्टता ही या ध्येयाला साधनीभूत होते. निरोगी व सशक्त शरीर असेल तर मानसिक स्वास्थ्य मिळतें. आणि तद्द्वारा मनाची उन्नति करून घेतां येते. ज्यांची देहयष्टि सुदृढ असते ते लोक मनानें मोठे असतात. रोगट, दुर्बल व लुसकान माणसें बहुधा कुत्सित, कपटी, कावेबाज, लफंगी अशीं असतात. शारीरिक ओजानें, सिध्या रस्त्यानें, जें त्यांना करतां येत नाहीं तें युक्तिबाजपणानें, लपंडाव खेळून, त्यांना करावें लागतें. सैन्यांतील जातिवंत शिपाई कसा वागतो हें लक्षांत घ्यावें म्हणजे वरील विधानाची सत्यता प्रत्ययास येईल. स्त्रीपुरुषांच्या स्वभावांमध्यें जो भेद दिसतो त्याचें कारणहि स्त्रियांचा स्वाभाविक कमकुवतपणा हेंच होय. पुरुषसुद्धां तारुण्याची तडफ असते तेव्हां उदारधी असतात. पण वयाच्या उतराईत हिकमती बनतात. तात्पर्य, दैहिकप्रकर्ष हा मानसिक उन्नतीला साहाय्यप्रद आहे. पण हा प्रकर्ष आपोआप होत नाहीं. नुसतें शरीरसंरक्षणहि अन्नावांचून होत नाहीं; आणि अन्न तर श्रम केल्याविना प्राप्त होत नाहीं. अन्नप्राप्तीला शारीरिक श्रमापेक्षांहि बौद्धिक श्रमाची अपेक्षा जास्त असते. आणि बौद्धिक श्रम करण्याची पात्रता येण्याकरतां आपण विश्वविद्यालयाचें शिक्षण घेण्याची धडपड करीत असतों. आपणांस जगतां यावें, सुखानें जगतां यावें, एवढ्यासाठीं हा सर्व खटाटोप मनुष्य प्राणी करीत असतो. पाश्चात्यांनीं आपली प्रगति–बौद्धिक प्रगति–करून घेतली. पण ती कशाकरतां ? बौद्धिक शर्यतींत मागें राहिलेल्यांना अंकित करून त्यांना स्वतः सुखानें जगतां आलें. बौद्धिक प्रगतीनें मानवी सुखांत भर

पडते ह्यांत संशय नाहीं. परंतु हें सुख म्हणजे शरीरसुख होय. तेव्हां बौद्धिक उन्नतीनें शारीरिक उन्नति होते. आणि शारीरिक उन्नतीनें नैतिक उन्नति होते. अर्थात् बौद्धिक उन्नति हें साधनांचें साधन आहे. अशा ह्या दुय्यम प्रतीच्या साधनालाच सर्वस्व कल्पून स्त्रिया मोहित झाल्यामुळें त्या समाजघटना विघटित करीत आहेत. शिवाय पोट भरण्याची जबाबदारी पुरुषांनीं आपल्या शिरावर घेतल्यानंतर त्याच कामाकरतां स्त्रियांनीं पुढें येण्याचें कारण काय? बरें, पुरुषांकडून काढून आपण ही जबाबदारी सर्वतोपरी पतकरणें हें स्त्रियांना शक्य तरी आहे काय? पुरुषी धंदे करण्याची हौस असणाऱ्या स्त्रियांनीं स्वतंत्र वसाहत करून ह्याचा प्रयोग करून पाहावा. पुरुषांवर घर सोंपवून स्त्रियांनीं बाहेरील पोट भरण्याचे धंदे करावे. असा समाज किती काळ टिकेल ह्याची कल्पनाहि करतां येणार नाहीं. बरें स्त्रीपुरुषांनीं मिळून पोटभरू धंदे करावे असें म्हटलें तर पुरुषांची टंचाई नसतांना स्त्रिया अशा धंद्यांत सामील झाल्यामुळें पुरुष रिकामे बसतील त्याची वाट काय? निकाम्या स्त्रीकडून प्रजोत्पादनाचें तरी काम होतें; निकाम्या पुरुषाचा काय उपयोग होणार? सारांश कोणत्याहि दृष्टीनें विचार केला तरी स्त्रियांनीं पुरुषी उद्योग केल्यानें जगाचा तादृश फायदा होणार नाहीं. पुरुषी धंदे नकोत म्हणून पुरुषी धंद्याचें शिक्षणहि नको. मग 'डिग्री'च्या कच्छपीं तरी आमच्या मुलींनीं काय म्हणून लागावें? परीक्षेचा शिक्का मारून घेण्याची एवढी अहमहमिका कशाकरतां पाहिजे? नोकरी मिळण्याकरतां परीक्षेची किंमत, पण ज्यांना नोकरी नको त्यांना परीक्षा कशासाठीं? परीक्षा देण्यांत कांहीं पाप आहे असें नाहीं. पण परीक्षेचा जाच होतो. पास होण्याच्या नादीं लागलें म्हणजे घोकंपट्टी करावी लागते. आणि घोकंपट्टी करीत बसलें म्हणजे खऱ्या विद्यार्जनांत व्यत्यय येतो. डॉ. जॉनसन विश्वविद्यालयाचा पदवीधर नव्हता. डॉ. रवींद्रनाथ टागोर ह्यांच्याहि नांवापुढें अक्षरें नाहींत.

पण दोघेहि जगद्विख्यात झालें नाहींत काय? परीक्षांना आमच्याइकडे फाजील किंमत देण्यांत येते.

असो. स्त्रियांनीं कितीहि आक्रोश केला तरी स्त्री-पुरुषांचा जो परस्पर-संबंध त्याचा विपर्यास करणें त्यांच्या आटोक्याच्या बाहेर आहे. वळचणीचें पाणी आढ्याला कसें जाणार? कांहीं काल समाजांत खळवळ उडून कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं अशी स्थिति होईल. पण ही स्थिति कायम राहणें निसर्गाच्या विरुद्ध आहे. केव्हांहि झालें तरी स्त्रिया त्यांच्या विद्वत्तेपेक्षां सौंदर्यामुळेंच प्रसिद्ध राहतील. पुरुषसंसर्गामुळें कोणतेंहि कृत्य स्वतंत्रपणें सतत करणें त्यांच्या हातून होणार नाहीं. व्यवहार एकदां आरंभला म्हणजे त्यांत खळ पडतां कामा नये. नाहीं तर कोणताहि व्यवहार यशस्वी होणार नाहीं. व्यवहारामध्यें सदैव दक्षता आणि अनुचिंतन अपरिहार्य आहेत. पण निसर्गापन्नसत्वा स्त्रीच्या हातून हें कसें घडणार? म्हणून क्षणैक चमकून अदृश्य होणाऱ्या ताऱ्यांप्रमाणें स्त्रियांच्या सर्व चळवळी होतील. नभोमंडलावर आज स्त्रिया चमकल्या तर उद्यां त्यांचा अस्त होईल. निसर्गापुढें त्यांचें कांहीं चालणार नाहीं. तेव्हां त्या पुरुषतंत्र तर राहणारच, पण पतितंत्र राहतील काय हाच प्रश्न आहे. सन १९४५ मधील स्त्री पुरुषावर वरचष्मा करण्याच्या भानगडींत न पडतां उपयुक्त शिक्षणाच्या योगानें अर्थतः गृहस्वामिनी होईल अशी अपेक्षा करणें अनुचित होईल काय? “स्त्रियो भ्रष्टा नष्टा-अहह कलिकालः प्रभवति” असें म्हणण्याचा प्रसंग येऊं नये.

---

# प्रेतापुढें विस्तवाचें मडकें कशासाठीं ?

विवाहविधि व समाजांतील स्त्रीचें स्थान ह्यांची चर्चा करण्यांत आमचे पुष्कळ दिवस गेले तरी सुद्धां ही चर्चा संपण्याचें चिन्ह दिसेना. पण एक दिवस चहाकरतां गच्चीवर जाण्याची व रस्त्यावरून प्रेत जाण्याची एकच वेळ आली. वेड्या वांकड्या बांबूंची ती तिरडी, प्रेताचें उघडें ठेवलेलें तोंड आणि पुढें मडक्यांत विस्तव घालून त्या मडक्याची शिंकाळी हातांत घरून तिरडीपुढें चालणारा व्योष्ठलोम माणूस, असा देखावा पाहून आमच्या गप्पा विवाहसंस्कारांवरून अचानक रीतीनें उडाल्या त्यांची झडप आतां अंत्यविधीवर येऊन पडली.

वेणूंची वक्रता व घट्ट आवळल्यामुळें पडलेले सुंभाचे करकोचे ह्यांनीं प्रेताच्या स्वतःसिद्ध भयानकतेंत अधिकच भर पडली. हा सर्व प्रकार पाहून आमच्या लोकांची विचारशक्ति सातां समुद्रांपलीकडे गेली असें वाटूं लागलें. प्रेतवहनाकरतां लोखंडाची अथवा पितळेची कायमची केलेली तिरडी लोकांनीं कां वापरूं नये याचा आम्हांस उलगडा होईना. पारशांमध्यें अशीच तिरडी वापरतात. हिंदूंनाहि तसेंच करतां कां येऊं नये ? ख्रिस्ती, जपानी व चिनी लोक पेटींत प्रेत घालून स्मशानांत नेतात. बाकीचे लोक बहुधा तिरडीच वापरतात. पण आमच्या तिरडी-सारखी भेसूर, अमंगल तिरडी कोणाचीच नसते. मुसलमानहि ह्या बाबतींत आमच्यापेक्षां बरे. प्रत्येकानें आपल्या घरीं लोखंडी तिरडी कायमचीच करून ठेवणें फार सोयीचें होईल. वेदकालीं प्रेतवाहनार्थ गाडीचा उपयोग करीत, ह्या गतरूढीचाहि उद्धार करणें वावगें होणार नाहीं. प्रेतवहन-कर्माला योग्य अशी एक गाडी मुद्दाम बांधून सर्व गांवच्या उपयोगाकरतां

ठेवली म्हणजे किती तरी लोकांचा त्रास व वेळ वांचेल बरें ? आणि शिवाय स्मशानयात्रेचें विक्राळ स्वरूप नाहींसें होईल तें निराळेंच. " इदं पूर्वमपरं नियानं येना ते पूर्वे पितरः परेताः । पुरोगवा ये अभिशाचो अस्य ते त्वा वहन्ति सुकृतामु लेकम् ॥ " असा वैदिक मंत्र आहे. त्याचा अर्थः ही पुढें असलेली गाडी पूर्वीपासूनचीच आहे. ह्याच गाडीनें तुझे मृत पूर्वज गेले. ह्या गाडीच्या पुढल्या भागीं जुंपलेले आणि गाडीबरोबर येणारे बैल पुण्यवानांच्या लोकाप्रत तुला नेतात( नेवोत ). गाडीवर प्रेत घालून नेण्यांत कमीपणा आहे ही सद्यःकालीन समजूत चुकीची दिसते. आश्वलायन गृह्यसूत्रावरूनहि प्रेत गाडीवर घालून स्मशानांत नेण्याची वहिवाट दिसून येते. शवाचें तोंड उघडें ठेवण्याची चाल आमच्यांत कां पडली समजत नाहीं. " शिरःप्रभृत्यङ्गुलपर्यंतं पादतलवर्जं प्रेत माच्छाद्य " असें प्रयोगकार सांगतात. म्हणजे प्रेत डोक्यापासून पायांपर्यंत वस्त्राच्छादित असलें पाहिजे. स्वच्छ पांढऱ्या वस्त्रानें आच्छादून लोखंडी तिरडीवर प्रेत चढवावें व पारशाप्रमाणें पांढऱ्या सुताच्या बंदांनीं तिरडीला जखडून टाकावें. सुंभानें हल्लीं बांधतात त्यानें प्रेतवहनकर्माचें गांभीर्य कमी होतें; व प्रेत विद्रूप दिसतें. अशा रीतीनें जिच्यावर प्रेत ठेवलें आहे अशी ती तिरडी गाडीवर ठेवून गाडी स्मशानाकडे न्यावी.

तसेंच मडक्यांत जळलेली गोवरी घालून हातांत मडकें धरून दाहकानें पुढें चालण्याची पद्धति असमंजसपणाची नाहीं काय? श्रौताग्नि ज्यावेळीं लोक बाळगीत त्यावेळीं ही चाल अन्वर्थक होती. पण सध्यां श्रौतस्मार्ताग्नीच्या अभावीं लौकिकाग्नीनेंच दहन करण्याचा प्रसंग आल्यावर घाणेरडें मडकें हातांत धरण्याचें प्रयोजन काय ? आपल्या गृह्याग्नीनेंच आपली दहनक्रिया व्हावी हा मूळचा उद्देश कांहीं वावगा नव्हता. पण आतां त्याचें काय ? आपण मडकें कां धरतों ह्याचा किती ' सुशिक्षित ' विचार करतात ? धर्मशिक्षणाची फारकत झाल्यामुळें असले वेडेचार

आमच्या हातून होत असतात. तेव्हां ही मडकें धरण्याची अर्थशून्य चाल तावडतोब बंद होईल तर बरें.

सूत्रांत क्षौराचें विधान नाहीं असें असून सध्यां शक्य तितकें विकच होण्याची रूढि आमच्यांत घुसली ह्याचें आश्चर्य वाटतें. पुढल्या धर्मशास्त्र-कारांनीं सुद्धां आमूलाग्र क्षौर सांगितलें नाहीं.

" प्रयोगे तीर्थयात्रायां पितृमातृवियोगतः । कचानां वपनं कुर्याद्यथा न विकचो भवेत् " ॥

ह्यावरून असें सिद्ध होतें कीं, क्षौर हें कृताकृत म्हणजे वैकल्पिक आहे. कारण तें सूत्रांत नाहीं. आणि कांहीं स्मृतिकारांनीं ( उ. लघु आश्वलायन ) जरी वपन सांगितलें असलें तरी मिशा काढण्याचें मुळींच कारण नाहीं. क्षौर आणि वपन वस्तुतः एकच. " क्षुरस्य कर्म इदं क्षौरं " म्हणजे वस्तऱ्यानें करावयाचें कृत्य त्याचें नांव क्षौर. आपस्तंबधर्मसूत्रांत तर विवाहितांनीं क्षौर करूंच नये असें एक मत ग्रथित केलें आहे. " न समावृत्ता वपेरन्नित्येके " ( १-३-१० ). एवढेंच नव्हे तर तरुणांनीं, ज्यांचें आईबाप आहेत त्यांनीं, मुंडन ( हजामत ) नेहमीं करूं नये असेंच शास्त्रवचन आहे. त्यांनीं केस कापावे. ( प्राग्वयस्कैः सपितृकैर्न कार्यं मुण्डनं सदा । मुंडनस्य निषेधेऽपि कर्तनं तु विधीयते ). लहान मुलांच्या डोक्या-वरील केस जरा वाढले म्हणजे क्षौर करून घेण्याची घाई आजच्या मूर्ख बायका करीत असतात ह्याचा विचार केला म्हणजे आमच्या धर्माच्या कल्पना किती बायकी झाल्या आहेत तें पाहून वाईट वाटतें.

अशाच जातीच्या मूर्ख कल्पनांचें आणखी एक उदाहरण देण्यासारखें आहे. प्राणोत्क्रमण झाल्यानंतर प्रेत घराबाहेर काढण्याच्या पूर्वीं नेसू असलेलें धोतर सोडून पुरुषाला मुद्दाम लंगोटी नेसवतात. हा धर्माज्ञेचा विपर्यास आहे. ' ईषद्वस्त्रावृतं प्रेतं शिखासूत्रसमान्वितम् ॥ दहेन्मन्त्रविधानेन नैव नग्नं कदाचन ॥' (लघुआश्वलायन २०-४): नग्नावस्थेंत प्रेताचें दहन

कधींहि करूं नये; थोडें तरी वस्त्र अंगावर ठेवावें, असा आचार ह्या स्मृतिकाराला संमत आहे. प्रेताच्या शरीरावर चिंधीच असावी हें सांगण्याचा उद्देश नाहीं. नग्नस्थितींत दहन करूं नये हें सांगण्याचा मुख्य हेतु; म्हणून थोडें तरी वस्त्र असावें असें विधान करावें लागलें. पण आमच्या अज्ञानामुळें आम्ही भलताच अर्थ करून विपरीत आचार सुरू केला. म्हणून अंगावरील वस्त्रें काढणें मूर्खपणाचें आहे.

आमच्यामधील दहनाची चाल सर्व जगाला अनुकरण करण्यासारखी आहे. ही चाल फार पुरातन आहे ही गोष्ट ऋग्वेदमंत्रावरून चांगली प्रत्ययास येते. कांहीं लोक—प्रायः अनार्य—वेदकालीं सुद्धा प्रेतें पुरीत, नुसतीं टाकून देत अथवा गिधाडांकडून खाववींत. ह्या सर्व रूढींचा उल्लेख खालील आथर्वण मंत्रांत केलेला आढळतो. ‘ ये निखाता ये परोप्ता ये दग्धा ये चोद्धिताः सर्वांस्तानग्न आवह पितृन् हविषे अत्तवे (१९-२-३४): जे जमीनींत पुरले गेले; ज्यांना दूर टाकून दिलें ( परोप्ताः दूरदेशे कष्टवत् परित्यक्ताः—सायण ), ज्यांना जाळलें; ज्यांना उंच जागयावर ठेवलें ( उद्धिताः ), त्या सर्व पितरांना हे अग्ने, हविरन्न भक्षण करण्याकरतां घेऊन ये.

इहलोकीं केलेलें दान परलोकीं मृताला उपयोगीं पडतें ही कल्पना वैदिक काळाइतकी जुनी आहे. ह्या कल्पनेचा विस्तार होऊन दानांत उत्तरोत्तर भर पडत गेली.

एतत् ते देवः सविता वासो ददाति भर्तवे। तत् त्वं यमस्य राज्ये वसानस्तार्प्यं चर ॥ (अ. १८–४–३१).

हे प्रेत, सर्वांचा प्रेरक जो देव तो तुला हें वस्त्र देत आहे तें सुखकारक वस्त्र परिधान करून तूं यमाच्या राज्यांत भ्रमण कर.

ह्यावरून दानांची कल्पना मागाहून ब्राह्मणांनीं काढली असें मानण्यास जागा नाहीं. संपत्तीबरोबर दानांचीहि वाढ होणें स्वाभाविक होतें.

## प्रेतापुढें विस्तवाचें मडकें कशासाठीं ?

दहनविधि हा एक संस्कार आहे, ही गोष्ट सतत ध्यानांत ठेवावी म्हणून तेंहि कृत्य आनंदानेंच केलें पाहिजे असा शास्त्राचा कटाक्ष आहे. "अतो न रोदितव्यं हि क्रियाः कार्याः प्रयत्नतः" असें कात्यायनाचें वचन आहे. ऋङ्मंत्रसुद्धां हेंच सांगतो. 'प्राचो अगाम नृतये हसाय द्राघीय आयुः प्रतरं दधाना'—आपण नाचण्याहंसण्यासाठीं आतां घरीं जाऊं या, असा मंत्र म्हणून सर्व मंडळींनें स्मशानांतून पाऊल काढावयाचें असतें. असें असतां भाडोत्री ऊर बडवून घेण्याची पद्धति आमच्यापैकीं कित्येक जातींत कशी घुसली ?

सर्वे क्षतान्ता निचयाः पतनान्ताः समुच्छ्रयाः। संयोगा विप्रयोगान्ता मरणान्तं हि जीवितम् ॥ हें खरें नाहीं काय ?

---

# एकत्र कुटुंबाचे दिवस भरले.

एकत्र कुटुंब हें मिताक्षरी हिंदूंचें वैशिष्ट्य आहे. जगांत अन्यत्र कोठेंहि अशा तऱ्हेची संस्था आढळणार नाहीं. नवराबायको व मुलें एवढ्या समूहालाच इतरत्र कुटुंब ही संज्ञा लाविली जाते. विवाहित भाऊ अगर चुलत भाऊ एकत्र राहतात तेव्हां सुद्धां त्यांचें कुटुंब मानण्याची रूढि हिंदु लोकांतच आहे. वैदिक वाङ्मयांत कुटुंब हा शब्द प्रायः आढळत नाहीं. आणि मनुस्मृतींत जरी तो असला तरी ह्या शब्दाचा विशेषसा उपयोग अर्वाचीन संस्कृतांतच केलेला आढळतो. कुटुंबाच्या पूर्वी गोत्र शब्द वापरण्यांत असे. कुटुंब शब्द मूळचा संस्कृत तरी असेल कां? शब्द कोठूनहि आलेला असो. समाजाचा घटक ह्या नात्यानें कुटुंबाचें महत्त्व समाजशास्त्रज्ञांना फार वाटतें. सध्यां समाजाचें घटकत्व व्यक्तीवर येऊन बसलें आहे. त्यामुळें ह्या दोन कल्पनांना अनुरूप अशा घडामोडी समाजांत होणें अपरिहार्य आहे. समाजरचना व्यक्तीवर झाल्यामुळें व्यक्तीचें प्रस्थ वाढत चाललें. स्त्रीस्वातंत्र्याला उत्तेजन मिळालें. उलट समाजाचा प्रारंभ कुटुंबापासून केला म्हणजे कुटुंबांतील व्यक्तींचा कुटुंबांत पूर्णांशानें लय होतो. पुरुषहि स्वातंत्र्यविहीन बनतात; मग स्त्रीस्वातंत्र्याची गोष्टच बोलावयास नको. कुटुंबसंस्थेंत सर्व व्यक्तींना आत्मसंयमनाचें वळण लागतें, तर व्यक्तिमूलक समाजांत आत्मप्रचोदनाला ऊत येतो. सध्यां प्राचीन कुटुंब-संस्था नष्ट झाल्यासारखीच आहे. हिंदुस्थानांत सुद्धां विवाहितांची जितकी संख्या आहे तितकीच घरांची आहे असें शिरगणतीवरून दिसतें. ह्यावरून भावांचीं कुटुंबें बनत नाहींत असेंच सिद्ध होतें. विभक्त होण्याला भाऊ बापाच्या मरणाचीच वाट पाहत असतात.

# एकत्र कुटुंबाचे दिवस भरले.

हल्लींच्या दिवसांत एकत्र कुटुंब टिकणें अशक्य झालें आहे. प्रत्येकांचें अर्जनसामर्थ्य निराळें. एक भाऊ आय. सी. एस. असेल तर दुसरा कचेरींत कारकून असेल; एक भिक्षूक असेल तर दुसरा दिवाण असेल. तसेंच शिक्षणाच्या योगानें प्रत्येकांचीं मतें निराळीं; आवडनावड, अभिरुचि, ह्यांतहि विलक्षणता. ह्या खेरीज एकत्रवासाचा असंभव, इत्यादि कारणें समाइक कुटुंबाचा अंत करण्यास पुरेशीं आहेत. तथापि बापाच्या पश्चात् आई दिवंगत होईपर्यंत कांहीं भाऊ एकत्र राहतात. पण सुखानें नांदणारीं कुटुंबें क्वचित्. घरांत नेहमीं कुजबुज, धुसफूस असावयाचीच; एकाचें तोंड पूर्वेस तर दुसऱ्याचें पश्चिमेस; बेदाद कारभार; अशी स्थिति कांहीं अपवादात्मक नसते. तशांत कुटुंबाच्या स्वास्थ्याची होळी करणारी आगजाळी वायको आणि ऋणायस्वरूपी पुरुष ह्यांची दुक्कल जुळली म्हणजे कांहीं पुसूंच नका. घरांत सदा कटकट; एवढ्याशा तेवढ्याशावरून भांडणें. नांवाचें एकत्र कुटुंब, पण सर्वच यजमान. पण हें यजमानत्व म्हणजे चाहेल तो खर्च करण्यापुरतेंच असतें. जबाबदारीला यजमान एकच. अशा स्थितींत एकत्र राहण्यांत कांहीं मौज नाहीं; पण राहणें भाग पडतें, त्याला अनेक कारणें असतात. उत्सुकतेनें कोणीच राहात नाहीं. सध्यां ब्राह्मणांची स्थिति तर फारच हलाखीची झाली आहे. महर्घतेमुळें वेगळें राहणें कांहीं दिवसांनीं परवडणार नाहीं, निराळें राहण्यानें खर्च फार वाढतो. कुटुंबाचा समाइकपणा मोडत चालला खरा; पण चमत्कार हा कीं, बाकींच्या बहुतेक व्यवहारांत समाइक तत्त्वाचा प्रसार होत आहे.

अर्थतः विभक्त राहून एकवट राहणें मात्र जुळण्यासारखें आहे. एकत्र कुटुंबाचे फायदे मिळावेत पण त्यापासून उद्भवणाऱ्या अडचणी नसाव्या अशी ज्यांची इच्छा असेल त्यांनीं उपरिनिर्दिष्ट पद्धतीचा अंगीकार करावा. कायद्यानें तरी बापाच्या मरणानंतर मुलगे आपोआप विभक्त

झाले असें कां मानूं नये? बंगालमधील पद्धतीच हल्लीं सर्वमान्य होण्यासारखीच आहे. पण परकी न्यायाधीशांना हिंदुधर्मशास्त्राचें रहस्य समजेल तेव्हां ना? बाप मरतांक्षणींच मुलांमध्यें Tenancy-in-Common समजली जावी. आतां, कोर्ट कांहीं करो, कांहीं मानो, पण आपणांस आपल्या मताप्रमाणें वागण्यास तर कोणाला बंदी करतां येत नाहींना? एकत्र राहणें अशक्य हें जाणून बापानेंच वस्तुतः आपण होऊन मुलांच्या वांटण्या करण्यास कांहींएक प्रत्यवाय नाहीं. असें केलें असतां किती तरी कलह मुळांतच नाहींसे होतील. वांटण्या न करतां मरणें म्हणजे मुलांच्या संबंधानें जें आपलें कर्तव्य तें आपण बजावलें नाहीं अशी समजूत आतां झाली पाहिजे. रहाटाच्या गाडग्याप्रमाणें कर्तव्याकर्तव्यविचार बदलत असतो. आज जें कर्तव्य आहे तें उद्यां अकर्तव्य होईल. एकत्र राहण्यांत पूर्वीं लोकांना मोठेपणा वाटत असे. ती एक लौकिकाची बाब होती. एकत्र राहण्यानें स्वभावाचें मार्दव, लोभाचें नियंत्रण, अनीतीचा संकोच इत्यादि गुणांचा परिपोष होत असे. नुसत्या पैशाच्या दृष्टीनें विचार केला तरी एकत्र राहणीनें बचत पुष्कळ होते ही गोष्ट निर्विवाद आहे. शिवाय नोकराचाकरांची वाण भासत नाहीं; असहाय स्थिति जाणवत नाहीं; कोणतीहि जोखीम शिरावर घेण्यास माणूस सुटा असतो. असें एक ना दोन अनेक गुण ह्या पद्धतींत आहेत. देशाचाहि त्यामुळें फायदाच होत असे. नवराबायको व लहान अर्भकें ह्यांचेंच सध्यां कुटुंब बनत असल्यामुळें, सूतिकागृहें काढावीं लागलीं. कारण बायकोच्या बाळंतपणांत दुसरें मनुष्य कोण उपयोगी पडतें? बायको आजारी पडली तर तिची चाकरी करण्यास कोण असणार? तेव्हां रुग्णालयें सर्वत्र उघडावीं लागलीं. घरांत करावयास कोणी नसल्यामुळें आयते तयार पदार्थ बाजारांतून आणणें भाग पडतें. तेव्हां तयार पदार्थांचा व्यापार सुरू झाला. तिसरें मनुष्य कुटुंबांत नसल्याकारणानें

धार्मिक कृत्यांचा बोजवारा उडाला. ह्याचा परिणाम म्हणजे भिक्षुकवर्ग नायनाटाच्या मार्गाला लागला. धार्मिक क्रियांचा लोप तर झालाच, पण अधर्म म्हणून न मानल्या जाणाऱ्या आचारानें ही धर्माची जागा पटकावली. कारण रजस्वला भार्येच्या हातचें खाल्लें नाहीं तर उपाशी राहण्याचा प्रसंग येतो तो कसा टळणार? एकट्या स्त्रीला घरीं टाकून पुरुष दूरवर कसा जाणार? अर्थात् त्याच्या कर्तृत्वाला प्रतिबंध झाला. कार्यवशात् देशांतरीं गेलेल्यांच्या स्त्रियांकरतां सरकारानें एक " प्रोषितभर्तृकागृह " उघडण्याची सूचना अद्यापि कोणी केली नाहीं ह्याचेंच आश्चर्य वाटतें. आजपर्यंत घरोघर सूतिकागृह असे; रुग्णालय असे; पदार्थ तयार करण्याचे कारखाने असत. आतां ह्या गरजा बाहेरून भागवून घ्याव्या लागणार. अशी राहणींत विलक्षण क्रांति परिस्थित्यनुरूप होत असते. अविभक्त कुटुंबपद्धति चांगली किंवा वाईट हा सध्यां प्रश्नच नाहीं. चांगली असो वा वाईट असो, विद्यमान परिस्थितींत ती जीव धरून राहणें शक्य नाहीं. एकत्र कुटुंबाची चाल सर्वस्वी गुणयुक्त नसली तरी तींत बरेच फायदे होते. सर्व गुण एकत्र कोठें आढळतात? "नैकत्र सर्वो गुणसंनिपातः". समाजांत क्रांति घडणार; ती घडणें न घडणें हें आपल्या आवाक्याच्या बाहेर आहे. नवीन नवीन शास्त्रीय शोध व आर्थिक स्थित्यंतरें ह्यांमुळेंच मोठमोठ्या उलटापालटी होत असतात. ह्या बदलेल्या परिस्थितीला अनुसरून धर्मशास्त्रहि बदलावें लागतें, त्यास उपाय काय? "शास्त्रे नृपे च युवतौ च कुतः स्थिरत्वम्"? शास्त्राला स्थिरत्व नाहीं हें म्हणण्याचा हेतु हाच. हल्लींचें एकत्र कुटुंब म्हणजे कायदेशीर विभक्त न झालेलें एवढाच त्याचा अर्थ. एकत्र कुटुंबाचें स्वारस्य कधींच निघून गेलें आहे. अविभक्त कुटुंबांत सर्वांचा पैसा एकत्र असतो. त्यामुळें लहान मोठा धंदा करण्यास घरचें भांडवल होतें. प्रत्येक घर अशा दृष्टीनें पाहिलें असतां एक प्रकारची पेढीच होय. यामुळें गांवोगांव पूर्वी पेढ्या

असून शेतकऱ्यांना कर्जाऊ पैशाचा पुरवठा त्यांच्याकडून होत असे. शहरांतील बँकांचें कार्य ह्या कुटुंबपेढ्या करीत असत. पण एकत्र कुटुंबांत विच्छेद झाल्यामुळें पुरेसें शिलकी भांडवल कोणाजवळच राहत नाहीं म्हणून पसरलेलें व निरुपयोगी म्हणून पडून राहिलेलें भांडवल संकलित करून तें कार्यक्षम करण्याकरतां बँका अस्तित्वांत आल्या व ह्या जगड्व्याळ भांडवलावर प्रचंड कारखाने उभारणें शक्य झालें. ह्या राक्षसी कारखान्यांनीं लहानसान धंदे ठार बसवले. सारांश, समाइक कुटुंब जाऊन व्यक्तिमूलक कुटुंब बनल्यानें ही विस्मयकारक क्रांति घडून आली. आतां कोणी कितीहि शोक केला तरी समाइक कुटुंबाचे दिवस भरले खास.

---

# वाटपांच्या दाव्यांकरतां स्वतंत्र कोर्टें पाहिजेत

विद्यमान युगांतील विशिष्ट परिस्थितीमुळें समाइक कुटुंबपद्धति जरी नामशेष झाली तरी तदंगभूत फायद्यांना आपण मुकणें अनर्थावह होणार आहे. ह्या पद्धतींतील दोष काढून गुणांचेंच जर संरक्षण केलें तर त्यापासून वैय्यक्तिक तसेंच सामुदायिकहि कल्याण झाल्याशिवाय राहणार नाहीं. समाइक कुटुंबांत एकच " कर्ता " पुरुष असतो व त्याच्यावरच सर्व कायदेशीर जवाबदारी असते. त्यामुळें वाकीच्या व्यक्ति अनुद्यमशील व उदासीन वनतात हा ह्या पद्धतीचा मोठा अवगुण आहे. एकानें कष्ट करावे आणि बाकीच्यांनीं त्याचा फायदा घ्यावा हा प्रकार अश्लाघ्य होय. एकंदरींत ही पद्धति म्हणजे आयत्या बिळांत घुसणाऱ्या नागोबांची वाढ करणारी सुपीक भूमि होय. वडिलार्जित मिळकतींत आपल्या श्रमानें जे भर घालूं शकत नाहींत त्यांना वस्तुतः कोणत्याहि वाढधनांत हिस्सा मिळणें युक्त नाहीं. वडिलार्जित मिळकत असेल तेवढ्यांतच त्यांना भाग मिळणें वाजवी आहे व तशा प्रकारचें स्मृतिवचनहि आहे. "यत्किंचित् पितरि प्रेते धनं ज्येष्ठोऽधिगच्छति । भागो यवयिसां तत्र यदि विद्यानुपालितः॥" (मनु). परंतु पैसे मिळवण्याची ज्यांच्यांत अक्कल नाहीं त्यांना ह्या वाढाव्याचा लोभ धरण्याचें कारण नाहीं, हा सिद्धांत जरी न्यायाचा असला तरी प्रत्येकाची अर्जनशक्ति बरोबर मापणें प्रायः अशक्यच आहे. आणि म्हणून वर उल्लेखलेला दोष टाळतां येणें शक्य नाहीं. तेव्हां समाइक कुटुंब नाहींसें करून भागीदारी पद्धतीवर कुटुंबाची स्थापना झाली पाहिजे. मिताक्षरी हिंदु समाजांतील कुटुंबें ह्या पद्धतीमुळें बसत चाललीं आहेत हें महाराष्ट्रीयांस तरी अननुभूत नाहीं. रिकामटेकडे भाऊ व चालढकलीचीं, चेंगट,

दीर्घसूत्रीं कोर्टें ह्यांनीं आजपर्यंत किती तरी कुटुंबें रसातळास गेलीं आहेत. वाटपांच्या दाव्यांचा निकाल वर्षानुवर्ष लागत नसल्यामुळें अनन्वित नुकसान होतें ह्याची आमच्यांतील शहाण्यांना कल्पना तरी आहे काय ? असल्या प्रकारच्या दाव्यांचा निकाल करण्याकरतां स्वतंत्र कोर्टें असावी अशी सूचना आजतागायत कोणीहि करूं नये ह्याचें आश्चर्य वाटतें. पण नुसते पैसे उकळणाऱ्या विवेकहीन कायदेपंडितांना पैशापलीकडे दिसेल तेव्हां ना ? भांडणानें दुर्लक्ष्य झाल्यामुळें मिळकतीची धुळधाण होते ह्याचा विचार कोणी कसा करीत नाहीं ? लोकांच्या पैशानें पण कोर्टें तपासण्याचें निमित्त करून इतस्ततः भटकून मजा मारणाऱ्या न्यायाधिकाऱ्यांना नमुन्याच्या कागदांतील हें सदर बदल, तें बदल, ह्यापलीकडे कांहीं एक समजण्याची अक्कल नसावी हें आमच्या देशाचें दुर्भाग्य समजलें पाहिजे. वाटपांचे दावे खरें पाहिलें असतां कोर्टांकडून चालवून घेणें मूर्खपणाचें आहे. कोर्टांनींहि ते चालवूं नयेत, दावा आला कीं तो गांवांतील पंच नेमून त्यांच्यावर सोंपवावा. पंच नेमण्याचा अधिकार कायद्यानें कोर्टाला दिला पाहिजे. ब्रिटिश अमलाच्या सुरवातीस कोर्टाकडे आलेले बहुतेक दावे पंचांकडे पाठविण्याचा प्रघात असे. ह्यामुळें सर्वच कज्यांचा निकाल लवकरच होई. स. १८२६ सालीं पुण्यास सदाशिव विनायक नांवाचे गृहस्थ सदरअमीन होते. डिसेंबर महिना भरत येतांच " हुजुर हुकमाप्रमाणें एकहि खटला शिल्लक राहूं नये " म्हणून सदरहु सदरअमीन यांनीं ज्या पंचांकडे दाव्यांचे कागद पाठविले होते त्यांस " सारोंषा " सुद्धां कज्याचे कागद ताबडतोब परत करण्याविषयीं लिहिलेलीं पत्रें अद्यापि लोकांच्या दफ्तरांत सांपडतात. कोण ही दक्षता ! आज शंभर वर्षांनंतर १९२६ सालीं आपण कोठें आहों ? चारचार पांचपांच वर्षे लोंबत पडलेल्या कज्यांची संख्या किती तरी भरेल ? वाटपाच्या दाव्यांत खरें काम वास्तविक बजावणींत असतें. पण बजावणीकामाच्या

निकालानें फारसें पुण्य मिळत नसल्याकारणानें व वाटपाच्या दाव्यांतील बजावणीचें काम नेहमींच भानगडीचें असल्यामुळें मानवी वृत्तीचा न्यायाधीश अशा कामांसंबंधानें बेफिकिर असतो ह्यांत चमत्कार तो कसला ? म्हणूनच ह्या कामाकरतां स्वतंत्र व फिरतीं कोर्टें स्थापणें अवश्य आहे. वाटपाच्या कामीं धारवाडी कांटा धरणें कधींहि शक्य नसतें. वाटपांत कमजास्तपणा टाळणें दुर्घट आहे. पण कोर्टांत गेल्यानें कोर्टें आपणांस रसातळास नेतात हें सर्वांनीं लक्ष्यांत ठेवावें. वाटपाच्या दाव्यांसंबंधानें वरील विधानांत यत्किंचितहि अतिशयोक्ति नाहीं. बाप मेल्यानंतर भावाभावांत परस्परांविषयीं अविश्वास उत्पन्न होतो आणि एकदां कां कोर्टांत भांडण गेलें म्हणजे ज्याच्या हातीं जें लागेल तें त्यानें लांबवावें असा प्रकार हमेशा घडत असतो. आतां ह्या गोष्टीस नाइलाज आहे असें माल नाहीं. बापानें मुलांचे हिस्से पृथक केले नाहींत तरी आपल्या सर्व स्थावरजंगम मिळकतीची यादी करून ठेवण्यास अडचण कसली ? अशा प्रकारच्या याद्या किती कुटुंबांस सांपडतील ? जगाचा इतिहास घोकावा आणि स्वतःच्या कुटुंबाचा इतिहास अनवगत असावा ही शहाणपणाची रीत नाहीं. हातचें कांकण आरशांत पाहण्याचा प्रसंग आला म्हणजे बेवकूबपणाची कमाल झाली असेंच म्हटलें पाहिजे.

सहकारी तत्त्वानुसार आमच्या कुटुंबांचा कारभार चालविला तर सर्व कुटुंबांना लौकिक, सुख आणि सुस्थिति लाधल्याशिवाय राहणार नाहीं. सध्यां आम्ही कुटुंब चालवतों हें म्हणणेंच खरें नाहीं. कुटुंब कसें तरी चालतें; मग परिणामीं कसें तरी झालें तर दुःख कां मानावें ? कुटुंब म्हणजे छोटेसें राज्य होय. मग राज्यांत जशीं निरनिराळीं खातीं असतात व त्यांवर निरनिराळे अधिकारी असतात तसे कुटुंबांतहि कां नसावेत ? एका माणसाचें लक्ष्य चोहोंकडे रहात नाहीं. घरांतील कामें बायकापुरुषांत व यथाशक्ति मुलांतहि वांटून घेण्याची आमच्यांत रीत दिसून

येत नाहीं. केर काढण्यापासून तों पैसे विल्हेस लावण्यापर्यंत प्रत्येक कामाला कोणीतरी धनी पाहिजे. खर्चाचें काम म्हणजे कोणाचेंच काम नाहीं ह्यामुळें अनास्था होते. पण काम करावेंच लागतें म्हणून तें करण्याचा बोजा एकट्या कर्त्यावरच पडतो. बायकांनीं गृहकृत्यें आपसांत वांटून घ्यावीं तशीच पुरुषांनींहि बाहेरील कामांची वांटणी करावी. शेती, सावकारी, घरें, घरखर्च, स्वच्छता, आरोग्य, मुलांमुलींचें शिक्षण ह्यांपैकीं एकेक काम कुटुंबांतील मनुष्यानें उचललें तर ह्या संघशक्तीच्या कार्यानें कुटुंबाचें कोटकल्याण होईल. एकएकटें राहून काम करण्याला जी संधि मिळत नाहीं ती समाइक कुटुंबांत अनायासें प्राप्त होते. ब्राह्मणांना तर इतःपर नोकरीच्या क्षेत्रांत वाव नसल्यामुळें एकत्र कुटुंबांचे फायदे त्यांनीं व्यर्थ दवडूं नयेत. विभक्त असून एकत्र राहाणें हेंच आपलें ध्येय असावें. वेगवेगळीं माणसें एकत्र होऊन उद्योग धंदे चालवीत नाहींत काय ? मग एकाच हाडारक्ताच्या माणसांनीं सरकतीनें धंदे करण्यास काय हरकत आहे ? आमचें चुकतें तें हें कीं, आर्थिक हितसंबंध आम्ही तुटक करीत नाहीं. समाइक कुटुंब म्हणजे अनेक गुणार्जनाची शाळा होय. परंतु कोणालाहि सुव्यवस्थित रीतीनें कुटुंब चालवतां येत नाहीं. दोघां भावांना जमवून घेतां येत नाहीं. त्यांनीं देशाची एकी घडवूं आणण्याच्या भानगडींत पडणें हास्यास्पद नाहीं काय ? “ संहतिः श्रेयसी राजन् विगुणेष्वपि बंधुषु ” हें वचन कांहीं अगदींच शून्य नाहीं. राज्यकर्त्यांना ज्याप्रमाणें पोलीस, गुप्त पोलीस ठेवावे लागतात त्याप्रमाणें कुटुंबचालकानेंहि करावयास पाहिजे. घरांत परकीय मनुष्य कोण आलें, केव्हां गेलें, ह्यावर सूक्ष्म नजर ठेवणारा प्रत्येक घरांत कोणीतरी जबाबदार मनुष्य असणें अगत्याचें आहे. सांप्रत आमचें कुटुंब म्हणजे बेशिस्तपणाचें ठळठळीत उदाहरण होय. समाइक भांडवलावर व्यापार करणाऱ्या मंडळीप्रमाणें एकत्र कुटुंबाचेहि जमाखर्च ठेवले गेले व दरसाल वर्षअखे-

## वाटपांच्या दाव्यांकरतां स्वतंत्र कोर्टें पाहिजेत !

रच्या खरड्यावर कुटुंबांतील माणसांच्या सह्या घेतल्या तर कोर्टांत उद्भ-वणारा घोटाळा पुष्कळच कमी होईल. तसेंच वर्षारंभीं जमाखर्चाचें अंदा-जपत्रक करून त्यावर संमतिदर्शक सर्व भावांनीं सह्या केल्या तर " कर्त्यानें " कुटुंबाच्या फायद्याकरतां खर्च केला नाहीं ह्या तकरारींना तोंड राहणार नाहीं. स्वतःचा खर्च वाटेल तितका कोणी केला तरी त्या-च्याच खात्यांत तो पडला म्हणजे इतरांस कुरकुरण्यास जागा राहात नाहीं. अशा रीतीनें एकत्र राहण्यानें मिळणारे फायदे हातचे घालवणें योग्य नव्हे. सरकारप्रमाणें घरच्या कारभारांतहि जर निरनिराळीं कामें निरनिराळ्या माणसांवर सोंपवायचीं तर सरकार जसें आपल्या अधिका-ऱ्यांना पगार देतें तसें एकत्रकुटुंबीयांनीं तरी कां करूं नये ? म्हणजे घरचें कामहि घरच्या माणसांकडून शक्य तेथें फुकट घेऊं नये. स्त्रिया स्वयंपाक करतात त्याचा मोबदला त्यांस कां मिळूं नये ? ह्यामुळें प्रत्ये-काला स्वतंत्र द्रव्यसंचय करतां येतो. पारतंत्र्यांतहि स्वातंत्र्य मिळतें; आणि काम अधिक उत्सुकतेनें केलें जातें. सारांश समाइक कुटुंबांतली मंडळी केवळ पंक्तिबारगीर बनणार नाहींत अशा प्रकारच्या योजना अम-लांत आणण्याचा प्रयत्न कोणी कसून केल्यास अंतीं त्याचा निरुत्साह होईल असें वाटत नाहीं. पण हें सर्व करण्यास अक्कल पाहिजे; सद्बुद्धि पाहिजे; तशीच हौस पाहिजे. परंतु ह्यांची पैदास कशी होणार ? घोडें पेंड खातें तें येथेंच.

---

# उधळें युग.

पन्नासपाऊणशें वर्षांपूर्वींचा समाज व आजचा समाज ह्यांची विहंगमदृष्टीनें तुलना करणाराला सुद्धां कळून चुकतें कीं, पूर्वींची पिढी मितव्ययी असून आजची पिढी अतिव्ययी आहे. अर्वाचीन समाजाला पैशाची महती यथातथाच समजते. पांढरपेशा मध्यम स्थितींतील गृहस्थांच्या घरांची झडती घेतली, तर पन्नास रुपेरी राजे ज्यांच्या घरांत हातीं लागतील असे कुबेराचे लाल किती निघतील? द्रव्यसंचयाकडे चालू पिढीची प्रवृत्ति दिसून येत नाहीं. आदा आणि खर्च ह्यांमध्यें कोठेंहि योग्य प्रमाण राखलें जात नाहीं. आद्याची गति स्तंभित, मंद व शनैः शनैः अशी असते, तर खर्चाची अनियंत्रित, शीघ्र व बेअटक असते. यामुळें लहानापासून मोठ्यापर्यंत सर्व ओढगस्त असतात. पैसा ही प्रचंड शक्ति आहे, ही गोष्ट आम्ही सध्यां विसरलों आहों. ही शक्ति जितकी त्या पैशांत असते, तितकी जिंदगींत नसते. याकरितां रोकड शिल्लक बाळगून असणें अगत्याचें आहे. " धनमूलं हि प्रभुत्वं " ही म्हण प्रत्यकानें सोन्याच्या अक्षरांत हृत्पटलावर लिहून ठेवावी. सगळीं सोंगें येतात, पण पैशाचें सोंग येत नाहीं. पैशामुळें सर्व जग वश करून घेतां येतें. अशा या पैशाचा अतिव्यय, अपव्यय वगैरे करणें हें मूढपणाचें लक्षण होय. निर्धनावर मढ्याची कळा येते. निर्धन आणि मृत ह्यांच्यामध्यें वस्तुतः कांहीं अंतर नाहीं. तरी पण हल्लीं दिवाळें वाजवणें हा एक शिष्टांचा आचार होऊन राहिला आहे. उधळेपणाचें बाळकडू लहानपणापासून मिळत असल्यामुळें असल्या गोष्टींची दिक्कत वाटेनाशी झाली आहे. लग्नादि कार्यांत वडेपणाच्या मोहाला बळी पडून फाजील खर्च

करणारे प्रौढ, व छानछोकींत अपव्यय करणारे तरुण, अशा दोघांकडून पैशाची हानि होत असते. पैसा हें साधन आहे, साध्य नव्हे, ह्या म्हणण्याला संमति कोण देणार नाहीं ? पण साधनाचें संरक्षण केलें नाहीं तर साध्य तरी संपादन कसें करतां येईल? चाहेल तेथें शत्रूवर आघात करतां यावा म्हणून शस्त्र आपल्याजवळ सतत सज्ज ठेवावयास नको काय ? साधनाच्या विसर्जनानें उद्दिष्ट सिद्धीस कसें जाणार ? म्हणून पैसा जतन करणें हें अत्यंत श्रेयस्कर होय. अमेरिकेनें सधनतेच्या जोरावर सर्व जगाचें लक्ष आपणाकडे वेधून घेतलें आहे, इतकेंच नव्हे तर सर्व राष्ट्रांचें कारस्थान आपल्या लगामीं ठेवलें आहे. चालू युग हें धर्मयुग नव्हे, आर्थिक युग आहे. ह्या युगांत नीतीचें, धर्माचें तेज पडणार नाहीं. सर्व कांहीं द्रव्याधीन, सर्व द्रव्यमय आहे. आर्थिक प्रश्नांच्या अनुरोधानें धार्मिक व सामाजिक प्रश्न सोडवावे लागतात, आणि आर्थिक क्रान्तीनें उद्भवणाऱ्या परिस्थितीला तोंड देण्याकरितां सर्व राजकारण खर्चीं घालावें लागतें. अशा ह्या युगांत पैशाची उपेक्षा करून कसें चालेल ? " धर्मादपि व्यवहारो गरीयान् " हें चाणक्यसूत्र विसरून आपलें कसें भागेल ? धनवश न होतां धनीपणा स्वीकारण्यांत सर्व नीतीचें बीज असतें.

पण हल्लीं पाहावें तों, अवाच्या सवा खर्च करणें हें श्रीमंतीचें लक्षण मानलें जातें. वस्तुतः चारखुंट जहागीर हातीं लागण्याचाच हा सुलभ मार्ग आहे. खर्च करण्याकरतांच पैसे मिळवावयाचे असतात ह्या अर्धांगी तत्त्वाचेच भक्त सांप्रत सर्व बनले आहेत. आपणांस अवश्य कराव्या लागणाऱ्या खर्चाकरितां आपण पैसे कमावतों. त्याचप्रमाणें प्रसंगानुसार अथवा अनपेक्षित कारणांनीं खर्चाची धाड आपणांवर येते, तेव्हांहि आपली तयारी असावी अशा हेतूनेंहि पैसा कमावणें अवश्य आहे. पण ह्या तत्वाची मात्र धरसोड केली जाते. मिळेल तो पैसा खर्च केला म्हणजे प्रसंगाला तोंड देण्यांस आपण असमर्थ होतों, आणि मग दुसऱ्या-

A 7991

जवळ तोंड वेंगडावें लागतें म्हणूनच सर्व पैसे खर्च न करतां कांहीं शिल्लक ठेवणें अपरिहार्य आहे. आवश्यक खर्चाकरितां लागणारे व कारणपरत्वें लागणारे पैसे वगळून बाकीच्या पैशाचा विनियोग यथाप्रमाण सुखसोयींचीं साधनें निर्माण करण्याकडे करण्यास प्रत्यवाय नाहीं. ज्या वस्तूपासून आपणांस अल्पांशानेंच सुख मिळतें त्या वस्तूंत पैसे दवडणें मूर्खपणाचें आहे. ह्या दृष्टीनें पाहातां कपड्यालत्त्यांत हल्लीं फाजील खर्च होतो असेंच म्हणावें लागतें. दोन डझन शर्ट, दोन डझन कोट, अर्धा डझन बूट अशा रीतीनें जिन्नस करण्यांत अगर विकत घेण्यांत आपणांस सुखाचें प्रमाण किती लाधतें ? फार काय, पण आवश्यक व अल्पावश्यक ह्यांतील फरकच तरुण वृद्धांना सध्यां समजत नाहीं असें म्हणण्यांत यत्किंचितहि अतिशयोक्ति नाहीं.

वर सांगितल्याप्रमाणें जे लोक खर्च करितात त्यांच्या घरांत प्रत्येक माणसाला निदान पावशेर तरी दूध पिण्यास मिळतें काय ? कपड्यालत्त्यांचें पोरकट वेड महात्मा गांधींनीं नाहींसें केलें ह्याबद्दल त्यांचें धन्यवाद गावे तेवढे थोडेच होतील. अनावश्यक पदार्थांचा संग्रह करण्यानें किंमती वाढतात व ती गोष्ट गरीबांना नाहक जाचक होते, ही साधी गोष्ट आमच्या सुशिक्षितांना कशी समजत नाहीं ? शहरांत कोणाच्याहि घरीं जा, अनावश्यक पदार्थांची रेलचेल आणि आवश्यक पदार्थांची कोताई, असाच आपणांस अनुभव येईल. डझनावारी बूट बाळगणाऱ्या थोर सुशिक्षितांस, त्यांच्या संग्रहीं एकहि पुस्तक नसलें, तर त्याची मात्र लज्जा वाटत नाहीं. विश्वविद्यालयांत 'फेलोज' म्हणून नेमणूक करण्यापूर्वी त्या विद्योपासकांच्या संग्रहाला किती ग्रंथ आहेत ह्याची चौकशी सरकारनें करावी, अशी एक सूचना आमच्यांपैकीं एकानें केली, ती मननीय नाहीं काय ? कारण नसतांना पदार्थ वापरणें, म्हणजे जगांतील उत्पादनशक्तीचा आपण दुरुपयोग करतों, असें होतें. स्टेशनपासून एक

# उधळें युग.

दोन मैलाच्या आंत गांव असला तरी गाडी केलीच पाहिजे; पायीं जाण्यांत हलकेपणा वाटूं लागला आहे. एक दोन मैलांकरितां सहा आठ आणे फेंकून देण्यास कोणीहि कचरत नाहीं, ह्यावरून पैशाची योग्यता आम्ही ओळखत नाहीं, असें सिद्ध होतें. वाहनांचा उपयोग निकडीच्या कामाकरितां आणि दुखणेकऱ्याकरितां आहे. बाकीच्यांनीं निष्कारण वाहनें वापरणें म्हणजे सामाजिक पाप करणें होय. ठाणें, कल्याण, पुणें, सोलापूर, धुळें वगैरे स्टेशनांवर जाऊन मौज पहा म्हणजे आमच्या लोकांची विवेकभ्रष्टता चांगली निदर्शनास येईल. सकाळ असो, संध्याकाळ असो, धडधाकट, तरणेताठे पुरुष चटकन् गाडींत बसून घरचा रस्ता धरतात. खरें म्हटलें तर स्त्रियांनीं सुद्धां अशा ठिकाणीं चालत जाण्यास हरकत नाहीं. असल्या ह्या चंदुलालपणाची चटक लागली म्हणजे मनुष्यांत कंटकपणा येत नाहीं, व मग कोणत्याहि रोगाला थारा मिळणें कठीण जात नाहीं. पण असल्या नादानपणाच्या कृत्यांतच आपण भूषण मानीत आहों.

लोकांनीं आपणांस श्रीमंत समजावें ही बलवत्तर व घातुक वासना सांप्रत प्रत्येकांत उद्भूत झाली आहे. ह्या वासनेचा उगम दारिद्र्यांत आहे, हें उघड आहे. दरिद्री लोकांनाच श्रीमंत दिसण्याची हौस फार. ह्या औद्योगिक युगांत नसत्या श्रीमंतीचें सोंग करणेंहि किफायतशीर होतें. ह्या कारणानेंच उधळेपणाची प्रवृत्ति वाढत्या प्रमाणावर दिसून येते. तसेंच चालू पिढीची माणसें वाऱ्याच्या झुळकीनेंहि डुलणारीं आहेत. त्यांच्यांत मनाचा ताठरपणा नाहीं. पूर्वीच्या माणसांत हा गुण प्रामुख्यानें वसत होता. कोणाच्याहि हांसण्याला अगर निंदेला ते जुमानणारे नव्हते. पण लोक काय म्हणतील हा बागुलबोवा आह्मांस आमच्या इच्छेप्रमाणें वागूं देत नाहीं, असें सध्यां झालें आहे. आणखी असें कीं, घरांत पूर्वीं यजमानाचा करडा अंमल जितका होता तितका सध्याच्या व्यक्तिस्वातंत्र्याच्या दिवसांत राहिला नाहीं. पूर्वीचा अधिकार आतां डळमळला



६

17 MAR 1990

आहे. पूर्वीचा एकसूत्रीपणा आतां राहिला नाहीं. त्यामुळेंहि फाजील खर्च करावा लागतो. बापाचा बापपणा मुलांनीं केव्हांच झुगारून दिला आहे. मूर्ख अशिक्षित बायकांनीं आपला पगडा नवऱ्यांवर बसविला आहे. अशा परिस्थितींत खर्चाला शंभर तोंडें फुटावीं हें स्वाभाविक आहे. लग्नमुंजींत आम्ही आडीच्यादिडी खर्च करतों, ह्यांतलें इंगित तरी हेंच आहे. पुण्यांत एक लग्न तरी जिलबीवांचून झाल्याचें कोणाच्या ऐकिवांत आहे काय ? पुण्यांतील सर्वच लोक जिलबी-श्रीमंत आहेत असेंच कां समजावयाचें ? पण प्रत्येक ठिकाणीं आम्हांला मनाचा कमकुवतपणा नडत असतो. लग्नांतील थाटमाट थोडा तरी क्षम्य म्हणतां येईल, पण मुंजीमध्यें त्याची जरूरी काय ? तो निवळ धार्मिक संस्कार आहे. कोणत्याहि मुंजीला पंचवीस रुपयांहून जास्त खर्च करणें पाप होय. जेवणावळीचे दिवस गेले. " सांगतासिद्धयर्थ " ब्राह्मणभोजन पाहिजे तर करावें. पण एकदमच सर्व ब्राह्मणांना अन्नसंतर्पण केलें पाहिजे असें थोडेंच आहे ? गरीब विद्यार्थी दररोज पंक्तीस घेऊन संकल्पित संख्या पुरी करतां येईल. शिवाय इतर अनेक धार्मिक कृत्यें आपण हिरण्यद्वारा करतों, मग ब्राह्मणभोजनासाठींहि आपण त्याच मार्गाचा अवलंब कां करूं नये ? सारांश, जरूर तेथेंच दिडकी खर्च करावी. अन्यत्र केली असतां त्याची महापातकांत गणना झाली पाहिजे. उधळपट्टीची राहणी तर मनुष्यत्वाचा ऱ्हास करते. ह्या गोष्टीचा विचार आमची तरुण मंडळी करील काय ? "तच्चित्रं यदि निर्धनोऽपि पुरुषः पापं न कुर्यात् क्वचित्" ह्या सुभाषितांतील संभवनीयतेकडे लक्ष देऊन तरी सधन होण्याचा प्रयत्न प्रत्येकानें करावा.

---

# सडका समाज.

मनुष्य स्वभावतःच सज्जन आहे, अथवा दुर्जन आहे, ह्याविषयीं पाश्चात्य तत्त्ववेत्त्यांत मतभेद आहे. कोणी तो सज्जन आहे असें प्रतिपादतात, तर दुसरे तो दुर्जनच निपजलेला आहे असा सिद्धांत मांडतात. पुनर्जन्म न मानणारांत असा विचारभेद असणें अपरिहार्य आहे. हिंदुतत्त्वज्ञानाप्रमाणें कांहीं माणसें जन्मतःच चांगलीं असतील आणि कांहीं वाईट असतील. हा विषय उपेक्षणीय नाहीं. त्याचें फार महत्व आहे. मनुष्यप्राणी परमेश्वरानें सुजन असाच निर्माण केला आहे असें मानलें, तर सरकारावर किंवा समाजावर, मनुष्याची सुधारणा होईल अशा संस्था राष्ट्रांत स्थापन करण्याची जबाबदारी पडत नाहीं. सज्जनाला दुर्जन करणाऱ्या संस्था नसल्या म्हणजे झालें. पण उलट पक्षीं, परमेश्वरानें येथून तेथून सर्व सृष्टि जर नरापसदांचीच निर्माण केली असेल, तर मूल उपजल्यापासून त्याला शुद्ध वातावरणांत ठेवण्याचे पराकाष्ठेचे प्रयत्न समाजाला करणें भाग आहे. परमेश्वरापाशीं झगडण्याची ही महत्त्वाकांक्षा अल्पबुद्धि मनुष्यप्राण्याला अभिमानास्पद नाहीं, असें कोणी म्हणावें? असो. तत्त्ववेत्त्यांच्या ह्या वादांत सत्यपक्ष कोणता ह्याचा निर्णय बाजूस सारला, तरी राष्ट्रांतील संस्थांचे समाजावर इष्टानिष्ट परिणाम होतात, ह्यांत तिळमात्र संशय नाहीं. आणि संस्था अस्तित्वांत आणणें ही बाब प्रायः सरकारच्या हातांतली असल्यामुळें, प्रजेला चांगलेंवाईट वळण लावण्याचें पापपुण्य सरकारच्या माथीं बसणें साहजिक आहे. ह्या दृष्टीनें "It is Government which makes men what they are" हें मॉंटेस्क्यूचें म्हणणें सयुक्तिक ठरतें, व "राजा कालस्य कारणं" हें वचन वरील मॉंटेस्क्यूसाहेबांच्या उक्तीशीं तंतोतंत जुळतें.

धार्मिक वाबींचा निकाल कोर्टांतून होणार नाहीं असें ठरवलें म्हणजे धर्माचा आपोआप ऱ्हास होतो. खुला व्यापार ठेवला म्हणजे मनुष्य उपाशीं मरतो. अशा रीतीनें कोणत्याहि सरकाराला प्रजेस आपल्या लगामीं निरंतर ठेवितां येतें. एवढ्याकरतां राजकीय सुधारणा अगोदर घडवून आणल्या पाहिजेत, हें उघड आहे. सामाजिक सुधारणा झाल्यावांचून राजकीय सुधारणा निरुपयोगी, असें म्हणणारे कार्यकारणाचा विपर्यास करतात. मनुष्याच्या जीवनाला विशिष्ट स्वरूप देण्याच्या कामीं राजसंस्थांत किती सामर्थ्य असतें, ह्याची कल्पनाहि पुष्कळांस नसते. राजकीय सुधारणा साध्य नव्हे, साधन आहे. इतकेंच नव्हे तर ते प्रमुख व आद्य असें साधन आहे. तशांत देशाच्या अवनतीमुळें राज्यसत्ता निरंकुश झाली, म्हणजे तर राजकीय सुधारणा विशेषच निकडीची होते.

निरंकुश सत्ता ही केव्हांहि झालें तरी अनिष्टकारकच होते. ह्या सत्तेखालीं नीतीचें वर्धन होत नाहीं, शील बनत नाहीं, ओज राहात नाहीं, कोणत्याहि खऱ्या सुधारणेचें बीज रुजत नाहीं, असन्मताची छाप सर्वत्र बसते. राष्ट्र विस्कळित होतें; अयोग्य माणसें पुढें येतात; सद्गुण जागच्या-जागींच जिरून जातात; दारिद्र्य घर करून बसतें; अनामय कोणाच्या वांट्याला लाभत नाहीं; आणि ह्या सर्वांवर कळस म्हणजे अशी स्थिति होते असें कोणाच्या लक्षांतहि येत नाहीं. परमेश्वराच्या मायाजालापेक्षांहि हें मायाजाल कठिण. परमेश्वरी माया सांत आहे, पण ही नरेश्वरी माया सादि असून असून अनंत दिसते. पण दोहोंमध्यें एक साम्य आहे कीं, ह्या दोन्हीहि मायांच्या मायावीपणांतच प्रत्येकास सुख वाटत असतें. "The greatest evil of slavery is that the slave does not feel that he is a slave." गुलामाला मी गुलाम आहे असें वाटत नाहीं हाच गुलाम-गिरींतला मोठा दोष होय. निरंकुश सत्ता बिनधास्त राखण्यास देशांत शांतता ठेवणें भाग असतें. त्याचा फायदा प्रजेस मिळतो. ह्याव्यतिरिक्त

अशा सत्तेपासून कांहींहि लभ्यांश होत नाहीं. व शांततासुख हाहि अप्रत्यक्ष फायदा आहे, प्रत्यक्ष नव्हे, हें ध्यानांत ठेवण्यासारखेंच आहे. प्रत्यक्ष फायदा असा एकहि सांगतां येणार नाहीं. नोकरीकरतां लोक पाहिजेत म्हणून थोडेंबहुत कारकुनी शिक्षण लोकांना देणें भाग पडतें, व ह्या पोटभरी शिक्षणांतूनच तडफदार माणसें अधिक शिक्षण प्राप्त करून घेतात. पण शिक्षणाकरितां शिक्षण दिलें जात नाहीं; शांततेकरितां शांतता राखली जात नाहीं; लोकांच्या सुखाकरितां विमानें आकाशांत उडत नाहींत; राष्ट्रांतील उद्योगधंदे वाढविण्याकरतां आगगाड्या रस्त्यावरून धांवत नाहींत. त्यांचा उद्देश निराळाच असतो. अगदीं आपलें स्वतःचें नडेल तितकें पाहावयाचें अशी राज्यकर्त्यांची वृत्ति असते आणि ती स्वाभाविक आहे. दुर्गुण, दुर्गुणी जन व अपात्र माणसें ह्यांना मात्र बेवंद सत्ता माशाला ज्याप्रमाणें जल त्याप्रमाणें होते. राजहित व लोकहित ह्यांत जितकें मोठें मैदान पडेल त्या मानानें वरील प्रकार कमजास्त घडून येतात. त्यांत राज्यकर्ते विधर्मी व विदेशी असले तर अनिवार्य असे अनिष्ट परिमाण झाल्यावांचून रहात नाहींत. हल्लींच पहाना, इंग्रजी ज्याला उत्कृष्ट बोलतां येत नाहीं त्याला फुटक्या कवडीचीहि किंमत कोणी देत नाहीं पण इंग्रजी चुरचुर बोलणाऱ्या अर्धवटांना उच्चस्थान पटकावतां येतें; नादान माणसें सूत्रचालक होतात. विश्वविद्यालयाकडेच पहाना; त्यांना राष्ट्रांत विद्वान कोण आहेत ह्याची वार्ता देखील नाहीं. कै. शंकर बाळकृष्ण दीक्षित ह्यांचें नांव तरी विश्वविद्यालयाच्या प्रचंड विद्वानांना ऐकून माहीत आहे काय ? रा. विश्वनाथ काशीनाथ राजवाडे हे हिंदुस्थानांत जन्मले हें त्यांचें कमनशीब नव्हे तर काय ? ज्यांच्यावर आमच्या विश्वविद्यालयाच्या एल्. एल्. डी. पदवीचा मुकुट चढवला ते राजवाड्यांच्या पासंगाला तरी पुरतील काय ? नुसत्या कर्तबगारीची जर किंमत असती तर कोणत्याहि प्रजाहितरत सरकारला अथवा देशी

विश्वविद्यालयाला प्रो. कर्व्यांची विस्मृति होणें शक्य झालें असतें काय ? मानांचा वर्षाव ज्यांच्यावर होतो त्यांनीं कर्व्यांच्या शतांशानें तरी कांहीं करून दाखविलें आहे काय ? अशी ही ठाकरी युनिव्हर्सिटी " शिक्षणामृत " पाजीत आहे असें म्हणणें धाडसाचें नव्हे काय ? शब्दाचा मार शहाण्यांना असें म्हणतात; पण शहाणपणाचा विटाळ ज्यांना झाला नाहीं त्यांना मार कशाचा कोणाला ठाऊक ! निरंकुश सरकारच्या कच्छपीं जो लागला नाहीं, अशा सरकारच्या तोंडाकडे बघून जो चालत नाहीं त्याला कुत्रासुद्धां भीक घालीत नाहीं, अशा राज्यांत विद्वान् आपल्या विद्वत्तेचा उपयोग राज्यकर्त्यांना खूष करण्याकडे करतात, असा सिद्धांत इतिहासकारांनींच लिहून ठेवला आहे. राजद्रोह हा गुन्हा ठरला तर देशद्रोहाला संमाननीयता प्राप्त होते. ह्यामुळें ढोंगीपणा वाढतो. टिळक मेल्यानंतर ज्यांनीं त्यांना मोठेपणाचें अनाहूत सरटिफिकीट दिलें त्यांनींच त्यांना खोटें बोलणारे, खोटे दस्तऐवज करणारे, दरोडेखोर, असें ठरवलें ह्यांत कांहींच विसंगति नाहीं काय ? मोठा असेल तो खोटें कर्म कसें करील ? आणि खोटें कर्म करणारा मोठा कसा ठरेल ? पण अशा छद्मी माणसांचीच निरंकुश सत्ता पोशिंदी असते. सारांश, कांहीं अंशीं वरील कारणांनीं सद्यःकालीन समाज अनीतिमान्, दुःशीलवान्, कर्तृत्वहीन, भेकड असा बनला आहे. सद्गुणांची किंमत जेथें नाहीं तेथें सद्गुणांची वाढ कशी व्हावी ?

पूर्वकालीन समाजापेक्षां विद्यमान समाज नीतिदृष्ट्या श्रेष्ठतर आहे, असें कित्येक म्हणतात, पण तो त्यांचा भ्रम आहे. अनाथ, अशिक्षित, विधवा बहिणीला ज्यानें फसवलें नाहीं असा एकादा तरी भाऊ कोणाच्या आढळण्यांत आहे काय ? "अङ्कमारुह्य सुप्तं हि हत्वा किं नाम पौरुषम् ". पण असेंच जवान फार. अज्ञानाची मिळकत हातीं लागल्यावर ती तशीच्यातशीच तो सज्ञान झाल्यावर त्याला परत देणारे प्रामाणिक विद्वान् किती निघतील ?

"स्वप्रियं तु परित्यज्य यल्लोकहितं भवेत्" ह्या नियमाला अनुसरून वागणारे हातावरच्या बोटांएवढ तरी देशी अधिकारीवर्गांत आढळतलि काय ? सार्वजनिक कल्याणाच्या मिषानें वर्गणी गोळा करून त्यावर कारखाना उभारून ज्यानें आपली तुंबडी भरली नाहीं असा एकादा देवमाणूस कोणाच्या अवलोकनांत आला आहे काय ? फसवण्याची संधि मिळाली असून ज्यानें दुसऱ्याला फसवलें नाहीं, असा एकादा साळसूद कोणाच्या परिचयाचा आहे काय ? लोकहिताला आग लागो, पण आपला व्यवहार न्यायानें व सरळपणानें करणारा कोणी हरीचा लाल असलाच तर देवळांत जाण्याऐवजीं त्याचेच प्रत्यहीं पाय धरण्याची वेळ आली नाहीं काय ? सारांश, शिक्षणाचा आमच्यावर कांहीं एक परिणाम झाल्याचीं चिन्हें दिसत नाहींत. विधवा स्त्रियांना मुली आहेत एवढ्याच सबबीवर त्यांच्याजवळ हजारों रुपये हुंडा मागणाऱ्या आमच्यांतील असंख्य सुशिक्षितांची पायरी दरोडेखोरांच्यावर खास लागणार नाहीं. आमचीं नीतितत्वेंच साफ बदललीं आहेत. व्यापारांत फसवणें पाप नव्हे. कोर्टांत खोटें बोलणें दोषास्पद नाहीं. गतभर्तृका भावजयीला लुबाडणें हा व्यवहारच आहे. ही नीति सध्यां शिष्टसंमत झाली आहे. प्रजासत्ताक राज्यांत इतर राष्ट्रांवर आपली छाप बसावी म्हणून आपल्या प्रजेचें शरीरबल, नीतिबल व बुद्धिबल वाढवणें हे राजाचें कर्तव्यच होतें. पण बेबंद सरकारापुढें हें ध्येय असणें संभवनीय नाहीं. प्रजेला गोगलगाय बनविण्याचेंच प्रयत्न ह्या सत्तेखालीं केलें जाणें स्वाभाविक आहे. ह्या धोरणाच्या विरुद्ध जाणाऱ्याच्या वाटेला हाल अपेष्टा ठेवलेल्या. "अभिभूतोऽप्यवज्ञातो यो राज्ञां द्वारि तिष्ठति। स तु राज्ञां श्रियं भुङ्क्ते नाभिमानी कदाचन."

---

# शिवाशीव.

—(*)—

नित्यनेमाप्रमाणें आम्ही चार वाजतां गच्चीवर चहापानार्थ गेलों आणि आपआपल्या जागेवर बसलों. चहाचे पेले टेबलावर येऊन थडकले. इतक्यांत आमचा गडी टपाल घेऊन आला. आमच्यापैकीं एकानें टपाल घेण्यास हात पुढें केला; पण तो गडी हातांत टपाल देईना व व टेबलावरहि ठेवीना. जमिनीवर ठेवून निघून जावें तर उद्दामपणा वाटेल; टेबलावर ठेवावें तर ब्राह्मणाच्या चहाला शिवण्याचें पातक लागेल, अशा पेंचांत तो बिचारा सांपडला. परंतु ह्या प्रसंगानें त्या दिवशीं आह्मांला शिवाशिवीची मीमांसा करावयास लावलें. आम्ही सर्व धर्मशास्त्र पालथें घातलें; धर्मशब्दाचा कीस काढला, इतर धर्माशीं हिंदुधर्माची तुलना केली व अखेरीस आमच्या उज्वल धर्माचा आमच्या लोकांनीं विपर्यास केलेला पाहून आमच्या धार्मिक अज्ञानाची आम्हांस लाज वाटली; क्षणभर अवाङ्मुख होऊन बसण्याचा प्रसंग आमच्यावर आला. कारण, आचारसंपन्न शूद्राचा इतका विटाळ मानण्याचें प्रयोजन नाहीं असें शास्त्र सांगतें. आपल्या घरीं ठेवलेल्या गड्याचे आचार जवळ जवळ यजमानासारखेच असतात. निदान हीनाचारी तो नसतो हें खास. तेव्हां गृह्यशूद्रांना घरांत सर्वत्र संचार करण्यास शास्त्राची आडकाठी नसते. अंथरूणपांघरुणाला लागूं नको, पाण्याला शिवूं नको, असें म्हणून मोलकरणींवर खवदळणाऱ्या आमच्या मूढ स्त्रियांनीं खालील शास्त्रवचन मुखोद्गत करण्यासारखें आहे : मूल्यकर्मकराः शूद्रदासीदासास्तथैव च। स्नाने शरीर संस्कारे गृह्यकर्मण्यदूषिताः॥ गृहस्वामिनीची वेणीफणी करणें, स्नानास पाणी देणें इत्यादि गृहकृत्यें मोलकरणीनें करण्यास प्रत्यवाय नाहीं. एवढेंच नव्हे तर आचारसंपन्न शूद्राला श्राद्ध करण्याचा अधिकार

आहे; व अशा श्राद्धी शूद्राकडे भोजन करण्यास शास्त्रानें कोणत्याहि द्विजास परवानगी देऊन ठेवली आहे. शूद्रोपि द्विविधो ज्ञेयः श्राद्धी चैवेतरस्तथा। श्राद्धी भोज्यस्तयोरुक्तो ह्यभोज्यस्त्वितरो मतः॥ आपल्या गड्याच्या हातचें अन्न खाण्यासहि शास्त्राची संमतीच आहे. स्वदासो नापितो गोपः कुंभकारः कृषीवलः॥ ब्राह्मणैरपि भोज्यान्नाः पंचैते शूद्रयोनयः॥ आपला गडी, न्हावी, गुराखी, कुंभार, शेतकरी यांच्याकडे ते शूद्र असूनहि ब्राह्मणांनीं भोजन करावें असें देवल म्हणतो. घरीं आलेलें शूद्राचें अन्न प्रोक्षण करून घ्यावें असें विष्णुपुराणांत सांगितलें आहेः संप्रोक्षयित्वा गृह्णीयात् शूद्रान्नं गृहमागतम्. आपस्तंबधर्मसूत्रांत तर आपआपल्या धर्माप्रमाणें वागणाऱ्या कोणत्याहि वर्णाच्या माणसाचें अन्नोदक वर्ज्य नाहीं असें विधान आहेः सर्ववर्णानां स्वधर्मे वर्तमानानां भोक्तव्यम्; मात्र "शूद्रवर्ज्यमित्येके" असें म्हणून शूद्रांकडे भोजन करूं नये असें जें कांहीं लोकांचें मत होतें त्याचा उल्लेख केला आहे. आमच्या स्त्रियांकरतां प्रस्तुत काळाला योग्य अशीं धर्मवचनें संकलित करून धार्मिक विकल्पनांचा लोप करण्याचें पुण्य कोणी संपादन करील काय?

समाजाच्या स्थित्यंतरांना अनुरूप असे निरनिराळ्या कालीं निरनिराळे नियम शास्त्रकारांनीं घालून दिलेले स्मृतिग्रंथांत संगृहीत केलेले आढळतात. म्हणून ते परस्परविरुद्धहि असतात. विद्यमानकालीं आपण कोणते आचार पाळणें इष्ट व हितावह होईल हें त्या त्या काळच्या शिष्टांनीं ठरवावयाचें असतें. ह्यांत पापपुण्याचा प्रश्न नसतो. पण सध्यां आमच्या स्त्रीपुरुषांच्या विचारशक्तीवर संक्रांत आल्यामुळें आमच्यांत तारतम्याचा उन्हाळा भासूं लागला आहे. आशौचाचेंच पाहाना? "न वर्धयेदघाहानि प्रत्यूहेन्नाग्निषु क्रियाः" आशौचाचें (सुतकाचे) दिवस वाढवूं नये; कारण त्या योगानें अग्निक्रियेचा लोप होतो, असा

सामान्यनियम मनूनें घालून दिला असतांहि हल्लींचें भिक्षुक सुतक वाढविण्यासाठीं धडफड करीत असतात. देशावर संकट आलें असतां ( देशविप्लवे ) अथवा कष्टप्रद स्थितींत ( आपद्यपि हि कष्टायां ), सुतकी बसण्याचें कारण नसतां, प्लेगइन्फ्लुएंझादि सांथींत लोकांनीं आशौच धरून दैवी आपत्तींत आपल्या मौर्ख्यजन्य आपत्तीची भर पाडली ह्याला काय म्हणावें ? शिल्पी, कारु, वैद्य, नोकरचाकर, न्हावी, राजे, दानाध्ययनशील विप्र, अग्निहोत्री इत्यादिकांस शास्त्रकारांनीं सद्यःशौचच सांगितलें आहे. पण सध्यां प्रत्येकानें भरपूर आशौच धरण्यांतच धर्म आहे असें मानणाऱ्या उपजत शहाण्यांचीच संख्या समाजांत फार आहे. राजाला सुतक नाहीं ( कारण "कार्यविरोधात्" ); त्याचप्रमाणें अमक्यानें, आशौच धरूं नये (यस्य चेच्छति भूमिपः) अशी राजाची इच्छा असल्यास त्यालाहि शास्त्रकाराप्रमाणें आशौचाचें बंधन नाहीं. पण हा शास्त्रनियम किती जणांना विदित असतो बरें ! दशाहांतला मनुष्य अन्य ठिकाणीं ( देशांतरस्थिते ) मृत झाल्यास स्नान करून मोकळें होतां येतें. अधिक काल आशौच धरण्याचें कारण नाहीं हें ऐकून पुष्कळांना अचंबाच वाटेल. पण तसेंच शास्त्र आहे.

खरोखर आमचें धर्मविषयक अज्ञान कांहीं असें तसें नाहीं. धर्माच्या नांवानें आम्ही शरीराची हेळसांड करतों. पण शरीरावांचून धर्माचरण कसें करतां येईल आणि धर्माचरणावांचून सद्गति तरी कशी मिळणार ? पाय तोडल्यावर पोहतां येईल काय ? म्हणूनच आमच्या शास्त्रकारांनीं आधीं स्वास्थ्य आणि मग धर्म असा असंदिग्ध उपदेश केला आहे. आशौचादि धर्माचार ह्या सर्व स्वस्थकालांतील गोष्टी आहेत असें दक्षस्मृतींत सांगितलें आहे. (स्वस्थकाले त्विदं सर्वमाशौचं परिकीर्तितम् ). वैय्यक्तिक, सामाजिक किंवा दैशिक पडत्या काळांत स्वस्थकालीन धर्माचरण करणें म्हणजे आपल्या हातीं आपली घटका घालण्यासारखें आहे. स्त्रियांच्या

बाबतींत असाच एक वेडगळ समज रूढ झाला आहे. मोठ्या तापांत स्त्रियांना साधारणतः रजःस्राव होतो. अशा वेळीं शुद्धाशुद्धतेच्या अवास्तविक कल्पनांनीं घेरलेल्या स्त्रिया आपलें बेसुमार हाल करून घेतात. पण आमचे शास्त्रकार कांहीं इतके व्यवहारशून्य व मूढ नव्हते. ते म्हणतात "रोगेण यद्रजः स्त्रीणामत्यर्थं हि प्रवर्तते । अशुद्धास्ता न तेन स्युस्तासां वैकारिकं हि तत्" हें वचन धुपणीपुरतेंच आहे असें नाहीं. विकारयुक्त रजःस्राव जेवढा असेल तेवढ्याचा ह्यांत समावेश होतो. सारांश, आमच्या धर्माचें तत्त्वच हें आहे कीं, कष्टमय स्थितींत धर्माचरण करूं नये. शरीर संभाळणें हाच अशा स्थितींत धर्म होय. देशभङ्गे प्रवासे वा व्याधिषु व्यसनेष्वपि । रक्षेदेव स्वदेहादि पश्चाद्धर्मं समाचरेत् ॥ ह्या तत्त्वाचा विसर पेशवाईत सुद्धां लोकांना पडला होता. स्मृतिग्रंथांत सांगितलेले आचार हे शारीरिक व मानसिक शुचिर्भूतपणा उत्पन्न करतात. स्वर्ग अथवा मुक्ति हें त्यांचें फल नव्हे. म्हणून " धर्म " पाळण्याकरितां देहाचे हाल करणें केव्हांहि न्याय्य होणार नाहीं. करतां विटाळ कालवला, विटाळ कालवला अशी ओरड करणें असमंजसपणाचें नाहीं काय ?

---

# गणमैत्री आणि राक्षसांचा महादेव.

वधूवरांच्या कुंडल्या पहातांना गणगोत्राला प्राधान्य असतें. गणगोत्र जमल्यास अधिक न पहाणारे लोक पुष्कळ आहेत. म्हणजे त्यांनीं विशेष पाहिलें नाहीं तरी ते गणगोत्र बघतातच. त्यांतहि गणापेक्षां गोत्राचें महत्त्व विशेष. गणांकडे दुर्लक्ष्य झालेलें एक वेळ खपेल पण सगोत्र विवाह कोणीहि होऊं देणार नाहीं. तथपि गोत्र जुळविण्यासंबंधानें कांहीं गूढ नाहीं. कुटुंबांतल्या कुटुंबांत विवाहसंबंध घडूं नये, तसें होणें अनिष्ट आहे, अशी प्राचीनांची समजूत होती. तेव्हां वधूवरांचीं गोत्रें पाहणें हें सकारण आहे ही गोष्ट आपल्या मनाला पटते. परंतु गण पहाण्याचें प्रयोजन काय या प्रश्नाचें उत्तर देणें कठीण पडतें. आमचा असा तर्क आहे कीं, गोत्र हा जसा कुटुंबविषयक, तसा गण हा जातिवंशविषयक प्रश्न आहे. निदान प्रथम त्याचें हेंच स्वरूप असलें पाहिजे.

देव, मनुष्य आणि राक्षस असे तीन गण असतात हें सर्वांना माहितच आहे. ज्योतिषशास्त्राप्रमाणें वधूवरांचा एकच गण असला तर ६ गुण येतात. तसेंच वर देवगणी असून वधू मनुष्यगणी असली तरीहि ६ गुणच मिळतात. पण देवगणी वराला राक्षसगणी वधू पाहिली तर १ गुण मिळतो. अर्थात या दोघांचा संयोग कमी प्रतीचा मानला गेला. आतां मनुष्यगणी वराला देवगणी कन्या दिली तर ५ गुण ठेवले आहेत. म्हणजे हाहि संबंध पहिल्या प्रतीचा लेखला गेला नाहीं. हा सर्व प्रकार प्रतिलोमविवाहासारखाच दिसतो. म्हणजे ब्राह्मणेतराची कन्या करण्यास दोष नसे, पण ब्राह्मणेतर वरानें मात्र ब्राह्मण वधू करूं नये, असा शास्त्रनिर्बंध होता. आतां चातुर्वर्ण्यांत ब्राह्मणाला शूद्रकन्येशीं लग्न लावण्यास कांहीं काल तरी प्रत्यवाय नव्हता. पण वरील गणांगुणांवरून असें दिसतें

कीं, देवांना मनुष्यकन्या पतकरे पण राक्षसकन्या पतकरत नसे. राक्षसांशीं एकरक्त होण्यास देव तयार नव्हते. मनुष्यगणाचा वर आणि राक्षसगणाची वधू अथवा राक्षसगणी वर आणि मनुष्यगणी वधू यांना वधूवरांच्या घटितांत शून्य गुण आहे. यावरून मनुष्य आणि राक्षस यांचा कोणत्याहि प्रकारानें विवाहसंबंध होऊं नये असा हेतु असावा असें उघड दिसतें. राक्षसगणाच्या मुलाला देवगणाची मुलगी केली तरीहि गुण १ च, याचा अर्थ असा दिसतो कीं देवांनीं राक्षसांबरोबर संबंध करण्यास थोडथोडी सुरुवात केली होती, पण मनुष्यांनीं तसें करण्याचें नाकारलें.

देव, मनुष्य आणि राक्षस असे तीन समाज पूर्वी होते. हे तीन निरनिराळे मानववंश असावे. हा सिद्धांत जर खरा ठरला तर जुन्या पुष्कळ गोष्टींचा उलगडा चांगल्या रीतीनें करतां येण्यासारखा आहे. राक्षस हा निराळा लोकसमूह होता ही गोष्ट पुष्कळांना पटेल; पण देव आणि मनुष्य या नांवाचे दोन समाज होते याला पुष्कळांकडून लवकर मान्यता मिळणार नाहीं. ह्मणून तत्संबंधी प्रमाणें देणें आवश्यक आहे.

“ यथा वा इदं मनुष्या उपासत एवमेतं देवा उपासत ”

( काठकसंहिता ८।१०।१० )

मनुष्यांनीं ज्याप्रमाणें याची उपासना केली त्याचप्रमाणें देवांनींहि केली.

“त्वमस्माकं नाम मा देवानां तन्तुश्छेदि मा मनुष्याणाम्” (का.९।९।९)

तूं आमचा आहेस. देवांचा व मनुष्यांचा वंश न तुटो.

“ इन्द्रस्य कुक्षिरसि सोमधान आत्मा देवानामुत मानुषाणाम् ”

( अथर्ववेद ७।११६।१ )

देवांचा आणि मनुष्यांचा तूं आत्मा आहेस.

“ ययोर्वधान्नापपद्यते कश्चनान्तर्देवेषुत मानवेषु ”

( अ. वेद ४।२८।५ )

ज्याच्या प्राणघातक शास्त्राच्या तडाक्यांतून देव किंवा मनुष्य यांपैकीं कोणीहि सुटत नाहीं.

या सर्व अवतरणांवरून देव आणि मनुष्य असे मानवी अथवा मर्त्य समाज होते असें सिद्ध होतें. काठकसंहितेंत तर पृथ्वीवर राहणारे, यज्ञ विध्वंस करणारे व यज्ञांत चोरी करणारे असें देवांचें वर्णन आहे. हें वर्णन देवांना लागू पडणारें नाहीं हें सांगावयास नको.

राक्षसांचाहि समाज होता हें राक्षसांचें जें पुराणांत वर्णन केलेलें आहे त्यावरून सिद्ध होतें. असुर आणि राक्षस एक नव्हत. दोघांना एकच समजण्यांत पुराणकारांनीं चुकी केली आहे. असुर हे देवांप्रमाणें यज्ञ करणारे होते. पण राक्षस यज्ञ करणारे नसावेत. क्वचित् ठिकाणीं ( उ.रामायण ) यज्ञाचा व राक्षसांचा संबंध जोडण्यांत येतो. पण अशीं स्थलें संशयास्पद मानण्यास जागा आहे. किंबहुना यज्ञ करण्याचें बंद पडल्यानंतर देव आणि राक्षस यांचा संबंध आला असावा. देव आणि असुर यांचा लढा यज्ञासंबंधीं असे; पण देव आणि राक्षस यांचें वैमनस्य उपास्यदेवतेवरून पडलें होतें. मूर्तिपूजा अथवा देवपूजा सुरू झाल्यावर देवराक्षसांचा संयोग झाला. अथवा इंद्र व वरुण या देवतांसंबंधानें देवासुरांत वितुष्ट असे; तर देवराक्षसांत विष्णु आणि महादेव या देवतांवरून भांडणें होत. राक्षसांचा देव महादेव अथवा शंकर. म्हणून दस्यु आणि राक्षस हेहि एक नव्हत. अकर्मन्, अदेवयु, अव्रत, अब्रह्मन्, अयज्यु असें दस्यूंचें वर्णन ऋग्वेदांत केलें आहे. पण रावण मोठा तपस्वी होता हें सर्वांस विदितच आहे. महादेव हा मूळचा वैदिक देव नव्हे. विष्णु हा वैदिक देव होता. पुढें राक्षसांनीं आपलें वर्चस्व चांगलेंच स्थापिलें. शंकराचें व्रत म्हणजे कधीं सुटतां कामा ये. विष्णूची एकादशी मध्येंच सोडली तरी चालेल, पण शिवरात्र सोडल्यास महादोष मानला जातो. हरिहरांचें ऐक्य दाखविण्याचे अटोकाट प्रयत्न

करण्यांत आले, पण जंगली महादेवाला आम्ही आपल्या डोक्यावर बसवला यांत कांहीं खोटें नाहीं.

ब्रह्मा, विष्णु, व महेश हे तीन समाजांचे तीन देव होते. देवांचा विष्णु, मनुष्यांचा ब्रह्मा व राक्षसांचा महेश. जसे समाजांचे गुण तसेच त्यांच्या देवांचेहि. देव हा समाज सत्त्वप्रधान तर मनुष्य व राक्षस हे अनुक्रमें राजस व तामस होते. मत्स्यपुराणांत (अ. ५३ श्लोक ६७-६८) विष्णु सात्विक, ब्रह्मा राजस व महेश तामस असें वर्णन आहे. तीन समाजांचें एकीकरण झालें तेव्हां ब्रह्मविष्णुमहेश असा सर्वांचा त्रिमूर्ति देव बनवावा लागला. एकीकरणाचे शिकस्तीचे प्रयत्न झाले तरी हें विष्णुमहादेवाचें भांडण पुष्कळ वर्षे चालू होतें. हिरण्यकशिपु व प्रल्हाद या पितापुत्रांत मुलानें विष्णूची उपासना स्वीकारली म्हणूनच कलह माजला. वैष्णव व शैव यांच्यांत अद्यापिहि हाडवैर कां वसत आहे हें आतां आपणांला नीट समजेल. देव, मनुष्य, गंधर्व, नाग, गरुड, पिशाच, राक्षस हे सर्व निर-निराळे समाज होते. वेदाभिमानीहि ते समाज असावेत. कारण रावणानें वेदांचीं खंडें केली अशी आख्यायिका आहे. देवांनीं सर्व समाजांत वैदिक संस्कृतीची छाप बसावी म्हणून प्रयत्न चालविले होते. गरुड हे देवांना लवकर वळले. ते विष्णुभक्त बनले. "दैवतं विष्णुरेतेषां विष्णुरेव परायणम्। हृदि चैषां सदा विष्णुर्विष्णुरेव सदागतिः॥ (महाभारत, उद्योगपर्व). विष्णूचें वाहन गरुड हें देवांनीं गरुड नांवाच्या लोकांवर मिळविलेल्या जयाचें सूचक आहे. राक्षसांनीं मात्र देवांना कसून विरोध केला आणि आपला महादेव त्यांनीं अखेरीस देवांवर लादलाच. नाग, सर्प, गंधर्व इत्यादि समाजांबरोबर देवांना फार लढावें लागलें नाहीं. पण राक्षसांनीं शत्रुत्व फार दिवस चालविलें म्हणून "सुरशत्रूणां दैत्यदानवरक्षसाम्" (वायुपुराण) असें वर्णन सर्वत्र आढळतें. दानव महान पराक्रमी होतें. "महौजसः" "महासाहसिनः" अशीं विशेषणें पुराणकारांनीं त्यांना लावलीं

आहेत ( भागवत ). हिरण्याक्ष, हिरण्यकशिपु, रावण, बली वगैरे दानव बलिष्ठ असून त्यांचीं साम्राज्यें होती.

या सर्व समाजांत थोड्याबहुत प्रमाणानें विवाहसंबंध घडत असत. राक्षसांसारखे जे लोक देवांना वश झालें नाहींत त्यांच्याबरोबर असे संबंध न होणें स्वाभाविक होतें. इंद्राचा सारथि मातलि हा नारदाबरोबर वरसंशोधनार्थ सर्व पृथ्वीभर हिंडला. त्यानें नागजातीचा वर आपल्या कन्येकरितां पसंत केला, पण राक्षसपुत्र नाकारला. मातलीनें नारदाला सांगितलें, देव आणि राक्षस यांचें वैर सदैव चालू असतां शत्रूबरोबर संबंध करणें मला आवडत नाहीं. देवांना ही गोष्ट रुचणार नाहीं. आणि देवांना अप्रिय असें मी कधीं करणार नाहीं.
देवर्षे नैव मे कार्यं विप्रियं त्रिदिवौकसाम्। नित्यानुषक्तवैरा हि भ्रातरो देवदानवाः। परपक्षेण संबन्धं रोचयिष्याम्यहं कथं " (म. भा. उ. पर्व)

मातलीच्या या आख्यानावरून एवढें व्यक्त होतें कीं देवसंस्कृतीचें अनुयायित्व मान्य करणारे लोक देवांत मिसळून गेले. त्यांची मैत्री झाली; त्यांचें संबंध जडले. राक्षसांची मात्र प्रतिक्रिया सुरू झाल्यानें ते अमित्र झाले. त्यांच्याबरोबर देवांची किंवा मनुष्यांची गणमैत्री कशी जमावी ? विवाहघटितांतील गणमैत्रीचें मूळ कोठें आहे हे आतां सहज समजण्यासारखें आहे. गण म्हणजे लोकसमूह,–जात. गणमैत्री पहाणें म्हणजे आपल्या अथवा आपल्याला मान्य अशा समाजापैकींच वधूवर आहेत अगर परसमाजांतील आहेत हें पहाणें. मूळ देवांची संस्कृति. देव हे उत्तरेकडून आले. खालीं आल्यावर ज्यांनीं त्यांची संस्कृति मान्य केली ते मनुष्य आणि ज्यांनीं विरोध केला ते राक्षस असें असण्याचा संभव आहे. असुर आणि राक्षस यांच्याशिवाय बाकीच्या समाजांकडून देवांना विरोध फारसा झालाच नाहीं. मनुष्यांचा मूळ पुरुष मनु. जेते देव, जित जेवढे तेवढे मनुष्य. देवांचा आणि मनुष्यांचा शरीरसंबंध

घडे तरी मनुष्यांना देवांनीं देव ही संज्ञा लावली नाहीं. अर्थातच त्यामुळें सर्व पृथ्वीवर तीन गण अथवा समाज झाले: देव, मनुष्य, आणि राक्षस. राक्षसांशीं शरीरसंबंध न करण्याचें देवांनीं ठरविलें त्याप्रमाणें त्यांचें अन्नहि ग्रहण न करण्याचें ठरविलें पाहिजे. मनुस्मृतींत ( अध्याय ४ श्लोक २०९ ) गणान्नभक्षण करण्यासंबंधानें निषेध आहे. " गणान्नं गणिकान्नं च विदुषां च जुगुप्सितम् ". हें गणान्न म्हणजे राक्षसांचें अन्न असेल काय ? हीन संस्कृतीच्या लोकांतील मुलगी वरिष्ठ संस्कृतीचें लोक करीत. पण याच्या उलट प्रकार फारसा घडत नसे. वृषपर्वा दैत्याची कन्या शर्मिष्ठा हिचा ययातीबरोबर विवाह झाला. कृष्णाचा नातु अनिरुद्ध यानें बाणासुराची कन्या उषा हिचें पाणिग्रहण केलें. भीमानें हिडिंबा बायको केली. अर्जुनानें उलूपी या नागकन्येबरोबर विवाह लावला. दैत्य कंस हा कृष्णाचा मामा हें प्रसिद्धच आहे. जरत्कारु ब्राह्मणानें सर्पजातीय वासुकीच्या बहिणीला वरिलें. पण विरुद्ध उदाहरणें फारशीं नाहींत. देव, मनुष्य, आणि राक्षस हे सर्व पुढें एक झाले यांत संशय नाहीं. पण देवराक्षसांमधली देवघेव उभयपक्षी असावी. त्यांनीं आपला महादेव देवांच्या गळी उतरविला, पण देवांनीं दानवांना वेदानुयायी केलें नाहीं काय ? हल्लींचा आमचा सांब म्हणजे वैदिक रुद्र अथवा शिव, राक्षसी हर आणि लिंगायतांचें लिंग, असें कडबोळें आहे. एकीकरणाचे हे प्रकार अर्वाचीन सुधारकांनीं मनन करण्यासारखे आहेत एवढें मात्र खरें.

देवलोकाहून राक्षसांचा प्रदेश निराळा होता. नागलोकाच्या मध्यभागीं दैत्यदानवांनीं वसलेला पाताळनामक सुप्रसिद्ध भूभाग आहे असें महाभारतांत वर्णन आहे. ( उद्योगपर्व. ) पण हें पाताल म्हणजे रसातल नसावें. कारण रसातल म्हणून सातवें भूमितल आहे असें पुढें याच पर्वांत नारदांनीं मातलीस सांगितलें आहे. असें जरी आहे तरी मत्स्य-

पुराणांत आमचा येथें कोणी त्राता नसल्यामुळें आम्ही आतां रसातळाला जातो असें दैत्य शुक्राचार्यांस सांगतात. " स्थातुं न शक्नुमो ह्यत्र प्रविशामो रसातलम्" (अ. ४७ श्लोक ६०). पण लगेच पुढें देवांनीं आम्ही ह्या दैत्यांना बळजबरीनें पाताळांत हाकलून लावूं असें म्हटलें आहे: " प्रसह्य हत्वा शिष्टांस्तु पातालं प्रापयामहे ". पातल व रसातल हे एकच भूप्रदेश आहेत अशी चुकीची समजूत पुढें झाली असावी असें दिसतें. कांहीं असो, सप्तपातालांत दैत्यांची वस्ती होती हें खास. हा भूप्रदेश काल्पनिक नव्हता. भागवतांत सुद्धां " ततोऽधस्ताद्रसातले दैतेया दानवा...हिरण्यपुरवासिनः " म्हणजे रसातलीं हिरण्यनगरांत दैत्य दानव रहातात, असें वर्णन आहे ( स्कं. अ २४ श्लो. ३० ). सारांश, देवलोक, मनुष्यलोक आणि दानवलोक हा नुसता कल्पनेचा बाजार नव्हे. शतकोटिपुराण देवलोकांत अद्यापि आहे; कार्तिकस्वामींनीं सांगितलेल्या पुराणास मनुष्यलोकांत स्कंदपुराण म्हणतात; रसातलीं विष्णूंनीं कूर्मपुराण सांगितलें; वगैरे वचनांचा अर्थ शब्दशःच घेणें अवश्य आहे. देवलोक म्हणजे आकाशांतील स्वर्ग असें समजणें चुकीचें होय. असो.

महादेवाच्या वर्णनावरून तो अनार्यांचा देव असावा. हल्लीं सुद्धां शंकराची पूजा अनार्यांच्याच हातीं आहे. श्रीशैल येथें परिया लोकांनीं देवाची पूजा केल्यावर मग ब्राह्मण देवळांत जातात अशी वहिवाट आहे. विष्णूचा पुजारी ब्राह्मण असावाच लागतो. पण शंकराचा पुजारी ब्राह्मण क्वचित् सांपडतो. अनार्य देवाचें महत्त्व फार वाढलेलें कट्टर वैष्णवांना न रुचणें स्वाभाविक आहे.

हल्लीं जन्मनक्षत्रावरून ज्योतिषशास्त्रांत गण ठरविले जातात. हा कल्पनेचा खेळ आहे किंवा गणनक्षत्रसंबंध सोपपत्तिक आहे हें समजण्यास मार्ग नाहीं. पण गणांची वर सुचविलेली उपपत्ति जर खरी असेल तर हा गणनक्षत्रसंबंध काल्पनिकच मानला पाहिजे. कोणतें जन्मनक्षत्र

असलें म्हणजे कोणता गण असतो, हें खालील कोष्टकावरून समजेल.

| देव | मनुष्य | राक्षस |
|---|---|---|
| अश्विनी | भरणी | कृतिका |
| मृग | रोहिणी | आश्लेषा |
| पुनर्वसु | आर्द्रा | मघा |
| पुष्य | पूर्वा | चित्रा |
| हस्त | उत्तरा | विशाखा |
| स्वाति | पूर्वाषाढा | ज्येष्ठा |
| अनुराधा | उत्तराषाढा | मूळ |
| श्रवण | पूर्वाभाद्रपदा | धनिष्ठा |
| रेवती | उत्तराभाद्रपदा | शततारका |

नक्षत्राच्या ज्या देवता दिल्या आहेत त्यांवरून कोणतेंहि अनुमान करण्यास साधन मिळत नाहीं. ज्यांच्यामध्यें जन्मकुंडल्या केलेल्या नसतात अशा शूद्रादि जातींत वधूवरांच्या आद्याक्षरांवरून जातक व गण ठरवतात. अ, क, च, ट, त, प, य, आणि श या वर्गांत कोठेंतरी प्रत्येकाचें नांव आलेंच पाहिजे. प्रत्येक वर्गाचा एक स्वामी असतो त्यास जातक असें म्हणतात. उ.

| वर्ग | जातक | वर्ग | जातक |
|---|---|---|---|
| अ | गरुड | त | सर्प |
| क | मांजर | प | उंदीर |
| च | सिंह | य | मृग ( हरीण ) |
| ट | श्वान | श | मेंढा |

स्ववर्गापासून अथवा स्वजातकापासून पांचवें जातक रिपुतुल्य असल्यामुळें वर्ज्य. यानंतर नांवावरून रास निश्चित करतात आणि राशीवरून गण ठरवितात. जसें:—

| | | | |
|---|---|---|---|
| अ, ल | मेष | ब, व | वृषभ |
| क, थ | मिथुन | ड, ह | कर्क |
| म, ट | सिंह | प, ठ | कन्या |
| र, त | तूळ | न, य | वृश्चिक |
| भ, ध | धन | ज, ख | मकर |
| ग, स | कुंभ | च, द | मीन |

वरील कोष्टकांत कांहीं अक्षरें नाहींत. उ. घ, ढ, वगैरे. घारु या नांवाचा मनुष्य गांवजोशाकडे घटितांकरतां गेला तर तो जोशी वरील आद्याक्षरांतच त्याला कोठें तरी घालील. आतां राशि आणि गण यांचा संबंध खालीं दिल्याप्रमाणें बसवला आहे.

| देव | मनुष्य | राक्षस |
|---|---|---|
| मेष | वृषभ | मिथुन |
| कर्क | सिंह | कन्या |
| तूळ | वृश्चिक | धन |
| मकर | कुंभ | मीन |

ही सर्व घटना काल्पनिक असावी असा ग्रह होतो. आधीं या वरील सारणीला कोणत्या ग्रंथाचा आधार आहे हें गांवजोशासहि सांगतां येत नाहीं.

वरील विवेचनानंतर गणाला हल्लीं जें महत्त्व देतात तें देणें योग्य होईल काय ?